विश्वनाथ खैरे

मराठी भाषेचे मूळ

संमत

विश्वनाथ खैरे

मराठी भाषेचे मूळ

संमत

मराठी भाषेचे मूळ
पहिली आवृत्ती : १९७९
दुसरी आवृत्ती : २००२
तिसरी आवृत्ती : २०१३

प्रकाशक
उमादेवी खैरे
संमत प्रकाशन, ३७४ सिंध सोसायटी, औंध, पुणे ४११ ००७

मुद्रक
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, आर्यभूषण भवन, पुणे - ४११ ००४

किंमत
८० रुपये

ISBN 81-85280-12-6

जेजूरीच्या खंडेराला

अनुक्रम

भूमिका : नव्या पिढीसाठी — सात

भूमिका — अकरा

ग्रंथसार — चौदा

१ अर्थ, ध्वनी — १–२४

१·१ मुळाचा शोध
१·२ भाषेचे पंचांग
१·३ निरखणांची बावरे
१·४ उत्तरमूल पूर्वपक्ष
१·५ अंगठा, अंगुली
१·६ 'अचाडा'ची चिकित्सा
१·७ व्युत्पत्तीचे ध्वनिक
१·८ ध्वनिकाची मुळाक्षरे
१·९ तमिळ-मराठीची संगती
१·१० अकावरून पुढे

२ लोक, भाषा — २५–५२

२·१ भाषा लोकांची
२·२ तमिळ प्रमाणरूपे, बोलीरूपे
२·३ शेतीतले दक्षिणी पीक
२·४ पाणिनींचा हवाला
२·५ हालाचे हलिक : महाराष्ट्री प्राकृत
२·६ बोलीभाषेची खोल मुळे
२·७ विपरीत व्युत्पत्तींचा विचार
२·८ निळाई हासेल

३ देश,काळ,रूप ५३–८०

३·१ व्याकरणाची राखण

३·२ प्राणिमात्रांचा लिंगविचार

३·३ तमिळ लिंगव्यवस्था

३·४ क्रियापदांचा रूपविचार

३·५ अपभ्रंश आणि तमिळ

३·६ देश आणि काल

३·७ मराठीचा दुवा

३·८ असंस्कृतांतून संस्कृत

३·९ ऊर्ध्वमूल अश्वत्थ

व्युत्पत्तिकोश ८१

शेतीतले शब्द ८८

संदर्भ ग्रंथ ९५

पारिभाषिक शब्द ९७

दखिनी शब्दसूची १०१

सामान्य सूची १११

भूमिका : नव्या पिढीसाठी

'मराठी भाषेचे मूळ' 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'तर्फे व्याख्यानरूपाने, आणि 'मराठी संशोधन मंडळा'तर्फे ग्रंथरूपाने, १९७९ सालात प्रकट झाले, त्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत मंडळाचे त्यावेळचे संचालक प्रा. रमेश तेंडुलकर यांनी म्हटले होते :

> महाराष्ट्रातली संस्कृती आणि मराठी भाषा यांमध्ये 'तमिळाई'चा पुरेपूर अंश भरलेला आहे, केवळ जुजबी किंवा गौण स्वरूपाचा नाही, याचे ठाशीव चित्र उभे करून त्याच्या आधारे मराठी भाषेला संस्कृत आणि तमिळ यांचा 'मधला दुवा' मानणारे जे नवे 'सं-म-त भाषिक' श्री. खैरे यांनी उभे केले आहे, तो त्यांचा प्रयत्न मात्र पूर्णतः नवा आहे. मराठीच्या भाषाकुळासंबंधी नवा विचार करायला लावणारा आहे.

ग्रंथप्रकाशनाच्या सभेत मुख्य प्रवक्ते प्रा. कृष्ण श्री अर्जुनवाडकर म्हणाले होते :

> विल्यम जोन्सनं युरोभारतीय भाषाशास्त्राच्या क्षेत्रात केलं त्यासारखं कार्य मराठी भाषाशास्त्राच्या क्षेत्रात करणारा माणूस आज मराठीला मिळाला आहे. ...या निरखणांतून केवळ मराठीचाच उलगडा होणार आहे असं नाही, तर आर्य आणि द्रविड या विरुद्धगोत्री मानलेल्या भाषाकुलांचं खूप जुन्या काळात एकच गोत्र होतं असंही त्याचं फलित निघण्याचा संभव आहे. ...'संमतदर्शन' मांडताना खैरे आपणाला पुष्कळ धक्के देतात, विचार करायला लावतात, शंकाही निर्माण करतात. ...खैऱ्यांच्या उपपत्तीचा आपण पूर्वग्रह सोडून विचार केला तर तिच्या पायावर आजवर न उकललेल्या अनेक गूढांची उकल होण्याचा मार्ग दिसू लागतो.

नवभारत मासिकातल्या परीक्षणात प्राचीन मराठी कवितेचे साक्षेपी अभ्यासक ज.शा. देशपांडे यांनी लिहिले होते :

> काही शब्दांच्या व्युत्पत्तीत अथवा काही बाबतीत श्री. खैरे यांच्याशी मतभेद होऊ शकतील, पण त्यांनी गेल्या शतकानंतर कोणी न केलेला अभ्यास करून भाषाशास्त्रात एक महत्त्वाचे दालन उघडले आहे व त्यामुळे पारंपरिक विचार परत तपासावे लागतील याबद्दल दुमत होणार नाही. हे कार्य भारतीय एकात्मतेकडे बोट दाखवीत आहे.

अशा रीतीने, आधीच्या पिढीतल्या विचक्षण अभ्यासकांनी 'संमतदर्शना'चे मर्म आणि महत्त्व आटोपशीर नेटकेपणाने मराठी अभ्यासकांसमोर मांडले होते. त्या सर्वांची आशा आणि अपेक्षा होती की,

> या संशोधन विचारांची भाषाविज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांकडून सर्वांगीण चिकित्सा होणे अगत्याचे आहे. -- तेंडुलकर
>
> खैऱ्यांनी पंडितवादाचा अवलंब करून आपलं म्हणणं मांडलं आहे, त्याचा मराठीच्या अभ्यासकांनी गंभीरपणानं विचार केला पाहिजे. मराठीच्या अभ्यासात त्याला योग्य ते स्थान दिलं पाहिजे. पटेल ते प्रांजलपणं स्वीकारलं पाहिजे, पटणार नाही त्याचा पंडितवाद पद्धतीनं प्रतिवाद केला पाहिजे, नुसतं नाक मुरडून नाही. -- अर्जुनवाडकर
>
> आता संस्कृत व उत्तर भारतीय भाषा यांचा दक्षिणेकडील भाषांशी केव्हा व कसा संबंध आला हे शोधण्याचा प्रयत्न करावा लागेल. -- देशपांडे

यातली कोणतीही आशा अपेक्षा पुरी होण्यासाठी भाषाविज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी, मराठीच्या अभ्यासकांनी किंवा प्राध्यापकांनी पहिली पावलेसुद्धा उचललेली नाहीत. 'संमतदर्शना'ला आजही महाराष्ट्रातल्या विद्यापीठांच्या मराठीच्या अभ्यासात स्थान नाही. त्याचा पंडितवाद पद्धतीनं प्रतिवाद कुठेही झालेला नाही. उत्तर-दक्षिणी भाषांच्या संबंधांचा अभ्यास भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत १९९९ साली नव्याने स्थापन झालेल्या 'भारतीय भाषा* आणि संस्कृती*'(*अनेकवचनी) विभागात होण्याची अपेक्षा होती, पण तो अजून सुरू झालेला नाही.

'मराठी भाषेचे मूळ' आणि 'अडगुलं मडगुलं' या ग्रंथांमध्ये भारतीय भाषा आणि संस्कृतींच्या अभ्यासाची जी दिशा उजळली त्या दिशेने माझा अभ्यास

मात्र अखंडित चालू राहिला आहे. ती दिशा मुळातच योग्य असल्यामुळे माझ्या प्रकाशित-अप्रकाशित पुस्तकांच्या आणि निबंधांच्या रूपातल्या अभ्यासाचे फलित या तेवीस वर्षांच्या काळात बरेच पुढे गेले आहे. याचा प्रत्यय चालू २००२ सालात प्रकट झालेल्या पुढील निबंधांवरूनही येईल :

१. प्रचलित भारतविद्या आणि संस्कृत पुराणकथा (परीक्षणलेख) : नवभारत मासिक, डिसें-जाने. २००१-०२

२. लोकसाहित्य आणि व्युत्पत्ती : पंचधारा त्रैमासिक जाने.-मार्च २००२

३. लोकसाहित्य आणि पुराणकथा : का.स.वाणी संस्थेचे पुराणकथाविषयक चर्चासत्र , अमरावती, फेब्रु. २००२

४-६ द्रविडियन लिंग्विस्टिक्स असोसिएशन वार्षिक परिषद

तिरुवनन्तपुरम् फेब्रु. २००२

मुरुगन् - ॲन इंडियन मिथ

महाराष्ट्र - द साउथ इंडियन कनेक्शन

साउथ इंडियन फॅमिली कनेक्शन - विथ मंगोलियन ऑर मराठी ?

७. पुराणकथांचे आकलन : गोमंतक मराठी अकादमी व्याख्यान फेब्रु.-०२

८. लोकदेव हनुमान : अतीत से वर्तमान तक - 'लोक' (पृष्ठ सात सौ) : भारतीय लोक-कला मण्डल, उदयपूर (पृ. ४०३-४१४)

९. मानवी विकास आणि भाषा : अंतःसंबंध - 'भाषिक नीती व व्यवहार' (पद्मश्री डॉ. अशोक केळकर गौरव) चर्चासत्र १-२ मे २००२

त्यामुळे त्या विचक्षण अभ्यासकांच्या आशाअपेक्षा पुरवण्यासाठी बऱ्यापैकी वाटचाल झालेली आहे :

महाराष्ट्रातली संस्कृती आणि मराठी भाषा यांमधल्या तमिळाईच्या अंशाचे चित्र आणखी ठाशीव झाले आहे.

आर्य आणि द्रविड या विरुद्धगोत्री मानलेल्या भाषाकुलांचं खूप जुन्या काळात एकच गोत्र होतं असं त्यांचं फलित दृष्टिपथात येत आहे.

हे कार्य भारतीय एकात्मतेकडे निश्चित बोट दाखवीत आहे.

या तेवीस वर्षांत अभ्यासकांची नवी पिढी आली, अभ्यासक्रमांत न आलेल्या संमतदर्शनाचा या पिढीला फारसा किंवा अजिबात परिचय नसेल. मराठीतून बोलतलिहीत जीवनव्यवहार करणारी, मराठी भाषेचा अभ्यास करणारी

आणि मराठी जनांचा व भाषेचा विकास करू इच्छिणारी ही नवी पिढी महाराष्ट्रात पुण्यामुंबईइतकीच जिल्ह्यांच्या, तालुक्यांच्या आणि इतर लहानमोठ्या गावाठावांमधून वसलेली आहे. या पिढीला राज्य, देश आणि जग या तिन्ही थरांवर मराठीच्या बाबतीत काहीशी थरकाप करणारी परिस्थिती वेढा टाकीत आहे. अशा परिस्थितीचा सामना करताना अनेक संकल्पनांच्या आणि व्यवहारांच्या मुळाशी जाऊन आपली नीती ठरवावी लागते. भाषेच्या मुळाशी जाऊन ती नीती ठरवताना आणि त्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी, या पिढीच्या पुढ्यात नव्या आवृत्तीत येत असलेले 'मराठी भाषेचे मूळ' मराठीवर आधारलेल्या अनेकविद अभ्यासाची दिशा दाखवील.

त्या दिशेने, 'भाषा मूळ अडाण्याची' या तत्त्वानुसार नव्या पिढीच्या अभ्यासकांना गावाठावांतल्या बोलींचा, लोकसंचिताचा आणि बदलत्या जीवन-व्यवहारांचा अभ्यास आत्मविश्वासाने करता येईल. महाराष्ट्रातल्या संस्कृतीशी त्यांचा नाळेचा संबंध चार हजार वर्षांपासून राहत आला आहे. त्यामुळे संस्कृतच्या भाषिक आणि सामाजिक दबावातून मुक्त होऊन, मराठी प्रमाणभाषेला यापुढेही मराठी माणसाच्या विकासासाठी समर्थ करण्याकरता बोलींकडून मिळावयाचा जीवनरस शास्त्रशुद्ध रीतीने पोचवता येईल. संस्कृत भाषा आणि पुराणकथा भारतीय लोकभाषांतूनच उद्‌भवल्या आहेत या इतिहासाचे भान करून देणारी नवी भारतविद्या, परंपरेने भेदग्रस्त केलेल्या भारतीय समाजाच्या 'अठरा धान्यांचे चरचरीत कोडबुळे म्हणजे एकमय लोक' महात्मा फुले यांच्या इच्छेनुसार करण्याला हातभार लावील.

अभ्यासाला पहिल्यापासून सामाजिक प्रयोजने कुणाला नको असली तर, निखळ ज्ञानप्राप्तीचा, नित्य नवे गवसल्याचा भरपूर आनंदही या शोधाभ्यासातून मिळत राहील हे मी स्वानुभवाने सांगू शकतो.

पुणे १० मे २००२

विश्वनाथ खैरे

भूमिका

मराठी भाषेचे मूळ शोधण्याचा हा ग्रंथयत्न मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या 'प्रा० अ वा गजेंद्रगडकर व्याख्यानमाले'च्या निमित्ताने केला. मालेतली तीन व्याख्याने २४, २५, २६ मार्च १९७९ या दिवशी दिली; त्यांमध्ये ग्रंथातला विषय बहुतांशी आला तरी आशयाचा तपशील निम्माही आला नाही. ग्रंथरूपात तो आता अभ्यासकांच्या पुढे येत आहे.

भाषिकाला म्हणजे भाषिक विज्ञानाला धरून लिहिताना, विवेचन निखळ विज्ञानिक स्वरूपाचे ठेवले आहे. तरी, हे सारे बोलावयाचे आहे याची जाणीव जागती ठेवून भाषा आणि विवेचन सुलभ आणि प्रवाही राखली आहेत. प्रा० अनंत काणेकर यांनी मालेच्या समारोप करताना 'व्याख्यानांच्या सुबोधते'चा खास उल्लेख केला. त्यावरून हा प्रयत्न सफल झालासे वाटते.

म्हणून येथे योजिलेले पारिभाषिक शब्दही व्याकरण-शिथिल वाटले तरी विशिष्ट तत्त्वाला अनुसरून बनवलेले आणि सहजपणे वापरण्याजोगेच आहेत. या सर्व नवीन शब्दांचे विवरण जेथल्या तेथे आणि शेवटी एका परिशिष्टात केले आहे.

येथे मांडलेले 'संमत' भाषिकही पूर्णतया नवीन असले तरी सहजसुलभ आहे. मराठी भाषेच्या संदर्भात भाषिक विचारांनी दक्षिणी भाषांचा, विशेषतः तमिळचा फारसा विचार केलेला नाही. तो विज्ञानिक रीतीने प्रथमच येथे येत आहे. येथे केलेले प्रत्येक निरखण पारखले जावे, पारखता यावे म्हणून बहुतेक आधार व संदर्भ विस्ताराने मराठीत दिले आहेत. आग्रह निष्कर्षांचा नाही, निरखणांचा आहे. ती पूर्वग्रहरहित वस्तुनिष्ठ पद्धतीने झाल्यास निष्कर्षही पुष्कळसे मान्यच होतील असा विश्वास वाटतो.

तमिळमधले आणि तमिळविषयक संदर्भ मुळावरून मराठीत अनुवादून दिले आहेत. तोल्काप्पियातले तमिळ व्याकरण मुळातून मराठीत प्रथमच अवतरत आहे. ते विस्ताराने देण्यातला एक मुख्य हेतू अधिकाधिक मराठी अभ्यासकांनी तमिळच्या अभ्यासाकडे वळावे हा आहे. हा अभ्यास थेट मार्गाने झाला तर इंग्रजी माध्यमामुळे तमिळ – मराठी संबंधांच्या आकलनात येणाऱ्या अनेक अडचणी दूर होतील. यासाठी व्याख्यानात आणि ग्रंथात अभिव्यक्ती पूर्णतया मराठी राखली.

'संमत' भाषिकाचा एक मुख्य आधार लोकभाषा किंवा बोलभाषा (म्हणजेच खास्या अर्थाने 'भाषा') हा आहे. प्रस्तुत अभ्यासातली ही महत्त्वाची अभिनवता. मराठी-पुरती ही बोलभाषा जन्मभूमी पुणे परगण्यात प्रचारात असलेली घेतली आहे. इतर बोलींचे ग्रंथगत उल्लेख घेतले आहेत. तमिळच्या बाबतीत स्वतःच्या ज्ञानावर न विसंबता तमिळ विद्वान सेतुपिळ्ळै यांच्या ग्रंथातून विस्तृत अनुवाद दिला आहे. त्याचा तुला-ध्वनिकाला उपयोग होईल.

तमिळ लिपीच्या विशेषांमुळे ती भाषा आणि तिचे साहित्य आपल्याला फार अपरिचित राहिली. त्या लिपीच्या वर्णांबद्दलही अनेक कल्पना आपल्यात प्रचलित आहेत. गेल्या दोन वर्षांत याविषयीच्या लेखन-मुद्रणात आणि या ग्रंथातही लिप्यंतराची जी पद्धत वापरली आहे ती अगदी सोपी, स्पष्ट आणि कसलाही गोंधळ न करणारी आहे. ऱ ऩ ऴ ही ठळक अक्षरे आणि एकार व ओकार यांच्यानंतरचा अवग्रह एवढीच जोड मराठी मुद्रणातल्या वर्णांना तमिळ लेखनासाठी द्यावी लागते. उच्चारानुसारी लेखन-मुद्रण करण्याची वेळ अजून आली नाही. तमिळचा अभ्यास मराठी जनांत जेव्हा वाढेल तेव्हा ती लवकर येईल. कुऱल्-कुरळ असे पर्याय वापरून अशा लेखनाची बानगी नंतरनंतर काही ठिकाणी दिली आहे.

भारतीय भाषाभ्यासाला संमत भाषिकाचा उपयोग होईलच. भाषाभ्यास मानविक विज्ञानाच्या अभ्यासालाही उपयुक्त असतो. या ग्रंथाने मराठी व्युत्पत्तीला हे परिमाण प्रथमच लाभत आहे. भारतीय संस्कृतीच्या मानविक अभ्यासाला संमत भाषिक तत्त्वांचा विशेष उपयोग होणार आहे. आपल्या मिथ्यकथा आणि परंपरागत आचारविचार यांचा प्रागितिहास या तत्त्वांनी चांगला उलगडतो असा अनुभव आहे. त्यातूनच भारतीय एकात्मतेचेही पुनर्दर्शन घडते.

या आंतरभारती दृष्टीनेच 'साधना'कार यदुनाथजी थत्ते यांनी या संमत अभ्यासाचा पहिल्यापासून पाठपुरावा केला आहे. हा ग्रंथही साधना प्रेसने छापावा असे वाटणे साहजिक आणि सोयीचेही होते. तीन भाषांतले शब्द, संदर्भांचे अंक, अवतरणे इत्यादी, फार कंस न वापरता आणि उपलब्ध सामुग्रीत छापण्याचे किचकट काम प्रेसने पार पाडले आहे.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे कार्यवाह श्री० अच्युत तारी आणि मराठी संशोधन मंडळाचे संचालक प्रा० रमेश तेंडुलकर यांनी आस्थापूर्वक व्याख्यानमाला, ग्रंथछपाई व प्रकाशन या सर्वच बाबतीत बहुमोल पाठिंबा दिला. त्यांच्याच प्रयत्नांनी ग्रंथावर चर्चाही होणार आहे ही संतोषाची गोष्ट आहे.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने 'प्रा० अ बा गजेंद्रगडकर व्याख्यानमाले' साठी या विषयाला मान्यता देऊन या नवीन संशोधनाला व्यासपीठ प्राप्त करून दिले, त्या निमित्ताने ग्रंथसिद्धी करविली आणि पुढे प्रकाशनाचीही जबाबदारी त्वरित पार पाडली याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच. मराठी संशोधन मंडळाने ग्रंथाचे प्रकाशन स्वतःकडे घेतले ही ग्रंथाच्या संशोधनपरतेची आणि नवतेची पावतीच मानली जाईल. मंडळाला मनःपूर्वक धन्यवाद.

या सर्वांचे मूळ कारण मंडळाचे पूर्वीचे संचालक प्रा० सुरेंद्र गावस्कर हे होते. मराठी भाषेच्या संशोधनाला हा संमत अभ्यास उपकारक आहे असे पाहिल्या-बरोबर, अभ्यासकाचा पूर्वपरिचय वगैरे काहीही नसताना त्यांनी या व्याख्यानमालेची निश्चिती करविली. ग्रंथ तर व्याख्यानाच्या वेळीच प्रसिद्ध करावा अशी त्यांची मनीषा होती. मद्रासासारख्या ठिकाणी मराठी संदर्भसाहित्य मिळणे कठीण म्हणून तेही त्यांनी पुरविले. त्यांना काळाने अचानक नेले आणि व्याख्यानमालेची सुरुवातच त्यांना श्रद्धांजली वाहून करण्याचा प्रसंग ओढवला. हा ग्रंथ प्रकाशित होण्याने त्यांना दिलेला शब्द पाळला जात आहे ही कृतज्ञतेची जाणीवच मनात आहे.

गावस्करांनी बोलताना मराठीचा नवा व्युत्पत्तिकोश सिद्ध करण्याचीही कल्पना मांडली होती. अशा भव्य भावी प्रकल्पांच्या संकल्पांचे मूळ जरी या अल्पाक्षर आणि काहीशा सीमित ग्रंथामुळे रुजले तरी त्याचे सार्थक होईल.

मद्रास, २९ ८ '७९ — विश्वनाथ खैरे

ग्रंथसार

१ अर्थ, ध्वनी

मुळाचा शोध घेणे ही मानवी शोधप्रवृत्तीचीच वरची पायरी आहे. ज्ञानेंद्रिये निरखीत असतात, त्या निरखणांची व्यवस्था लावून विज्ञान सिद्ध करतात. त्याच्या उत्कर्षातूनच या सान्याचे मूळ काय, असा शोध सुरू होतो. मुळाचा शोध हा भूतकाळाचा प्रवास असतो. आपण लहानपणापासून मिळवलेल्या भाषेला मायबोली असे भावनोत्कट नाव देत असलो तरी तिच्याही मुळाचा शोध या विज्ञानिक भूमिकेतूनच घेता येतो. दोन हजार वर्षांपूर्वीच व्याकरण–महाभाष्यकार पतंजलीने सांगून ठेवले आहे, " अथ यो वाग्योगवित् ! विज्ञानं तस्य शरणम् ।– आणि जो वाग्योगी असतो त्याला विज्ञान हाच आसरा ! "

या विज्ञानानुसार भाषेचे ' पंचांग ' असते : त्यात शब्द, रूपे, अर्थ, श्रुती आणि व्याकरण या पाच अंगांनी भाषेचे निरखण होत असते. देश, काळ आणि लोक यांच्यामुळे भाषेत बदल घडून येत असतात. गेल्या वर्ष दोन वर्षांत, मराठी भाषा, संस्कृती, स्थळनामे या सर्वांमध्ये तमिळचा अंश मोठ्या प्रमाणात असावा, अशी निरखणे पुढे आली. त्यांनुसार मराठी भाषेच्या मुळाचा नवा शोध घेण्याची गरज आहे.

अंगठा, अंगुली, अघाडा

' मराठीचे मूळ संस्कृत ' या सिद्धान्ताला धरून मराठीच्या पंचांगांची फोड करणारे ग्रंथ झालेले आहेत. त्यांतल्या शब्दव्युत्पत्तींपासून या शोधाची सुरवात करता येते. ' अंगठा ' याचे मूळ ' अंगुष्ठ ' हे आपण जाणतच असतो, पण त्याचा ' अर्थ ' काय ? संस्कृत कोशात ' अङ्गु ' म्हणजे हात असे दिले असले तरी त्यावरून निघणारे अर्थ सपाट आहेत. आद्य तमिळ व्याकरण ' तोल्काप्पियम् ' ग्रंथात आहे. त्यातल्या सूत्रांवरून ' अङ्कै ' म्हणजे तळहात, त्यावरचे कूट्टै म्हणजे आखूड जाणीचे बोट तो अंगठा आणि त्यावर ' उगवतात ' अंगुळी. शरीरावयवांचे शब्द भाषेतले प्राथमिक शब्द असतात. त्यांच्यावरून मूळ भाषेची कल्पना येते.

अघाडा ही साधी वनस्पती आहे, पण फार औषधी गुणांची आहे. लव असलेली पाने आणि लवबरीत फळे हे अघाड्याचे विशेष. फळे जनावरांच्या अंगाला चिकटतात म्हणून त्याला शेतकरी लांडगा म्हणतात. याच्या नावाचे मूळ आघाट असे देतात. पण अमरकोशात तो शब्दच नाही ! उलट तमिळ नाव लांडगा याच अर्थाचे, फक्त नाव

'किंवा चावण्यावर उपयोगी' अशा अर्थाचे. शब्द, ध्वनी आणि धार्मिक रूढींचा विचार केला तर अधाडाचे मूळ अक्करम् = मुळदाह या तमिळ शब्दात सापडते.

असे हे शब्द संस्कृतमूल नसल्यामुळे त्यांच्यावरून ध्वनींच्या बदलाचे जे नियम बसवले आहेत त्यांचाही फेरविचार करावा लागतो. मग पडसाद, पडछाया यासारख्या शब्दांतल्या 'पड 'चे मूळ 'प्रति 'मध्ये न मिळता तमिळ 'पड ' म्हणजे' –च्यासारखे ' यात दिसते.

या अशा निरक्षणांची व्यवस्था लावण्यासाठी, पंचांगांपैकी ध्वनींचे विज्ञान (ध्वनिक) नव्याने बसवावे लागेल. त्याचा आधार दक्षिणी भाषा असतील. जुन्या ध्वनिकातल्या अडचणी नव्या ध्वनिकाला सोडवाव्या लागतील. भाषेच्या मुळाशी संबंध जोडायचा तर, शक्य तितक्या प्राचीन आधारांवरच विसंबावे लागेल.

ध्वनिकाची मुळाक्षरे

असा प्राचीन आधार 'तोल्काप्पियम्' या तमिळ ग्रंथाचा मिळतो. त्याचे नाव 'आदिकाव्य' असे अनुवादिता येईल. त्याचा काळ सनपूर्व दुसरे किंवा तिसरे शतक धरतात. त्यात सरल भाषेत रचलेली १६३० सूत्रे आहेत. वर्ण, शब्द आणि अर्थ असे तीन 'अधिकार' म्हणजे भाग आहेत. ग्रंथ तमिळ असला म्हणून संस्कृतशी विरोध नाही. उलट वर्ण–अधिकारात म्हटले आहे की नाभीपासून ओठापर्यंत श्वास येईतोवर काय काय होते ते विप्रांच्या संस्कृत शास्त्रात सांगितले आहे, तो बाहेर ध्वनिरूपाने आल्यावर काय होते ते येथे सांगतो. ते सांगितले त्यात वर्णांचे वर्ग वेगळ्या प्रकाराने पाडले आहेत. बारा ऱ्हस्वदीर्घ स्वर, दोन अतिऱ्हस्व स्वर, विसर्ग असे पंधरा; आणि 'कठोर, मऊ, मध्यम' असे प्रत्येकी सहा म्हणजे व्यंजनांचे अठरा असे एकूण तेहतीस वर्ण आहेत. सध्या तीस वर्णच प्रचारात आहेत. मऊ व्यंजने म्हणजे अनुनासिके. कठोर : क च ट त प ऱ. तर मध्यम म्हणजे य र ल व ळ ऴ. ग घ, ब भ सारख्या उच्चारांची स्वतंत्र चिन्हे नाहीत. क प यांच्यावरच काम भागते. यात तसे विशेष काही नाही इंग्रजीत हे सर्रास चालते आणि बंगालीत 'रवीन्द्र 'चा उच्चार रोबीन्द्र होतो. त्यामुळे तमिळ 'कांती' म्हणजे 'गांधी' असणे मोठे विचित्र नव्हे!

दक्षिणी शब्दकोश

एवढ्या जुजबी ज्ञानावरसुद्धा तमिळ–मराठी शब्दांच्या तुलना करणे शक्य होते. कारण पुष्कळ मराठी शब्द तसेच्या तसे तर आणखी पुष्कळ शब्द थोड्याफार ध्वनि-बदलांनी त्या भाषेच्या कोशात सापडतात. मद्रास विद्यापीठाने सात खंडात प्रसिद्ध केलेला सवा लाख शब्दांचे इंग्रजी आणि तमिळ अर्थ देणारा कोश फार उपयोगी आहे. आपल्या साहित्य-संस्कृति मंडळाने प्रकाशिलेला तमिळ मराठी कोश त्यावरच आधारलेला

आहे. बरो व एमेनो यांनी वीस दक्षिणी भाषांतले-बोलीमधले हजारो शब्द एकत्र देणारा एकखंड व्युत्पत्तिकोश केला आहे, तो प्रमाणग्रंथच आहे. दोघेही संपादक मूळचे संस्कृतचे अभ्यासक. हा उल्लेख याचाठी की संस्कृत-तमिळ यांच्यांत विरोधीभाव विद्वेच्या वावरात कोणी मानीत नाही हे स्पष्ट व्हावे. तमिळ लिपीही नागरीप्रमाणेच ब्राह्मीमधून निघालेली, म्हणून पुष्कळ सारखी. जर तिचा बाऊ वाटत असला तर या दोन्ही कोशांत रोमन लिपीत छापलेले शब्द वाचावेत.

२ लोक,भाषा

भाषा म्हणजे ध्वनी, तो प्रकटतो लोकांच्या मुखांनी. म्हणून भाषा असते लोकांची. पतंजली म्हणतात, 'लोक थोडा थोडा अर्थ भरून शब्दप्रयोग करतात. ज्याला घड्याचे काम आहे तो कुंभारवाड्यात जाऊन म्हणतो 'घडा बनव'. तसा काही व्याकरणकाराच्या घरी जाऊन कोणी 'शब्द बनव' म्हणत नाही!' म्हणून भाषा खरी लोकभाषा असते. प्रमाणभाषा हीच बनीव असते. तरी म्हणताना मात्र आपण निरक्षरांच्या बोलीभाषेला अशुद्ध म्हणतो! 'वळख' अशुद्ध आणि 'ओळख' शुद्ध मानतो! व्युत्पत्ती आपण कोशातल्या शब्दांवरून ठरवतो म्हणजे बनीव शब्दांवरून! वास्तविक, एखाद्या व्यवसा-यातले शब्द, ग्रामीण शब्द हे इतर संस्कारांच्या अभावी आपल्या प्राचीन रूपांना अधिक जवळ असण्याचा संभव. म्हणून व्युत्पत्तीसाठी दोन भाषांतल्या शब्दांची तुलना त्यांच्या प्राचीन, प्रमाण आणि बोली रूपांवरून केली पाहिजे. इतिहासकाळात शब्दांचे उच्चार कसे बदलत आले असतील याचीही कल्पना त्यावरून येते.

तमिळ बोली आणि प्रमाणभाषेतील रूपांची तुलना करून डॉ. सेतुपिल्ले यांनी बरेच नियम बसवले. ते पाहिले तर आपल्या अपभ्रंश भाषेतल्या बदलांशी त्यांचे साम्य दिसते. तसेच आपल्या ग्रामीण भाषेतल्या बदलांशी. काही बोलीरूपे मोठी चिंतनीय आहेत.

शेतीतले दक्षिणी पीक

तमिळ चेय् म्हणजे शेत. चेयूति म्हणजे व्यवसाय. अर्थात शेतीचा. हा जुना शब्द. आजच्या तमिळमध्ये शेतीला विवसाय म्हणतात! चेयूति चा उच्चार चेऽति करतात तो 'शेती' सारखाच आहे. इतर काही दक्षिणी भाषांत चे च्या जागी के येतो— कारण या सगळ्यांचे मूळ आहे कै म्हणजे हात, कर.

शेतकरी 'गाय ईली' म्हणतो, साक्षर 'गाय व्याली' लिहितो. कोश 'विणे' हा मूळ धातू आणि 'विधनन' हे संस्कृत मूळ रूप म्हणून देतो. तमिळ ईन् म्हणजे विणे, मराठी लोकभाषेला जवळचे आहे. ई म्हणजे देणे. गाय ईते किंवा विते म्हणजे वासरू देतेच.

निशाणी नांगर

ऋग्वेदात ‘ सीता ’ याचा अर्थ ‘ कृषिदेवता ’ तसाच ‘ नांगराचे तास ’ हाही आहे. दक्षिणी ची (धातुसाधित चीच) = उकरणे याच्याशी तो जुळता आहे. हे उकरणे नांगराचा फाळ करतो. वेदात फाल आहे. दक्षिणीत पाल् = तुकडा, पालम् = याच्यातली धातू , पाळ् = भग्न होणे. पालचा मराठीत पाल्ह होतो आणि पाळवरून पाळेमुळे खणण्याचा वाक्प्रचार आला. अशी फाळाची कुळकथा .

बोलभाषेची खोल मुळे

पुष्कळदा खरी व्युत्पत्ती प्रमाण शब्दापेक्षा बोलीतल्या शब्दावरून आपल्याला मिळते. नागर भाषेत वरवंटा म्हणतात तो बोलीत वरुटा होतो. वरवंटा चा शोध संस्कृत परिपंथ, परिवंटन, वरवृत्त असल्या शब्दांत झाला. वास्तविक तमिळ उरुट्टि = रुळाप्रमाणे फिरवणे; त्यातला मूळ धातू उरुळ्, त्यात आपला ‘ रुळ ’ दिसतो आणि पुण्याजवळच्या उरुळी या ग्रामनामाचा अर्थ चाक असा आहे. ‘ पाटा ’चे मूळ त्याच्या सपाटपणात आहे. असाच शहाणा म्हणजे खरोखर ‘ सरळ ’ असावा, ‘ सज्ञान ’ नव्हे. कारण बोलीत श्येना असे रूप होते ते तमिळ चेऽन् = सरळ याच्याशी जुळते. म्हणून तर ज्ञानेश्वर ‘ चातुर्य शहाणें जालें ’ म्हणतात. बोलताना बाहुलीला बाउली, भावली म्हणतात. तिचे मूळ पार् = पाहणे यावरून आलेल्या पावै मध्ये आहे. डोळ्यांतल्या बाहुलीत जशी प्रतिमा दिसते तशीच बाहुली; ती आद्य मूर्ती आहे.

विपरीत आणि खऱ्या व्युत्पत्ती

मराठेशाहीत हत्तीखान्याला फीलखाना म्हणत. फील हा अरबी–फारसी समजतात. पण मूळ द्रविडचा. जुन्या तमिळमध्ये पिळिरु = हत्तीचे गर्जणे असा मूळ शब्द आहे. ‘ नक्कल ’ चाही फारसी नक्ल शी संबंध जोडतात. नकला तर माणसे वन्य अवस्थेपासून करीत आली. तर, तमिळ नक्कल् = हास्य, व्यंग आणि त्याचे मूळ नकु = हसणे !

आपल्या शब्दांचे दक्षिणी मूळ असे शोधाअंती दिसते. उलट प्रयोगही करता येतो. अग्नि किंवा आग या अर्थाचे चौदा तमिळ शब्द आहेत. त्या प्रत्येकाशी जुळता मराठी शब्द आहे. हाळ, होळी, कोलीत, चूड, तळपणे, तीट, वेताळ अशा परिचितां-बरोबर नेरवा, वेवट अशाही शब्दांचा त्यात समावेश आहे.

पतंजलींच्या महाभाष्यात म्हटले आहे, “ हे सारेच शब्द देशांतरी प्रचारात आहेतच. ‘ पण ते मिळत नाहीत. ’ मिळवण्याचा यत्न करावा.” उपलब्धौ यत्नः क्रियताम् ।

३ देश, काल, रूप

शब्द कुठलेही असले तरी भाषेची अस्मिता रूपांवरून आणि वाक्यरचनेवरूनच सिद्ध होते. डॉ. केतकरांनी म्हटले आहे, " आपण जेव्हा प्रचलित मराठी ऊर्फ घाणेरडें मराठी बोलतों तेव्हा आपली वाक्यरचना व इंग्रजी शब्द यांचे मिश्रण वापरतों. 'डिफेंडंटने अफिडाविट फाइल केले नाही ' ही आपण मराठीच म्हणूं. 'पटेल हॅज नॉट मेड पक्का बंदोबस्त ' हें इंग्रजी वाक्य आहे. "

भाषेच्या पंचांगातल्या या अंगांनी मराठीचे मूळ कोठे आहे ? तिची वाक्यरचना संस्कृतसारखीच आहे. पण संस्कृत आणि दक्षिणी भाषांच्या वाक्यरचनांमध्येही म्हणण्यासारखा फरक नाही. त्यामुळे अमुकच मराठीचे मूळ असे म्हणता येत नाही. मग शब्दांची वाक्यातली रूपे, पदांमधले बदल वगैरे गोष्टींचा विचार मुख्यतः करावा लागतो.

लिंगविचार

चहा, कॉफी आणि दूध या तीन पदार्थांना तीन वेगळी लिंगे बहाल करणारी मराठी लिंगव्यवस्था 'बेबंद' आणि 'मनःपूत' आहे असे कोणीकोणी म्हटले आहे. याचे कारण आपण जीवसृष्टीतल्या लिंगांचा भाषेशी मेळ घालू पाहतो हे आहे. खरे तर, असा मेळ मुळीच नसतो. व्याकरणातला शब्दांचा मेळ दाखवण्याची एक व्यवस्था असे लिंगाचे स्वरूप आहे. म्हणून तर काही भाषांत लिंग हा प्रकारच नाही, तर काहीत पंचवीस लिंगे आहेत !

तमिळमध्ये मनुष्य, देव यांना 'उच्च वर्ग' म्हणतात आणि त्यांच्यांतच तेवढा जैविक लिंगाचा भेद करतात. इतर सर्व 'अवर्ग' म्हणतात. त्यातही असे सांगतात की सगळे आद्य नामशब्द लिंगहीनच आहेत. यांचे अन्त्य वर्ण किंवा प्रत्यय तु रु डु असे असतात. आपल्या वकरू करडू अशा शब्दांत हे दिसतात. प्रत्ययापेक्षाही अर्थाचे साम्य अधिक आहे.

उदा० कुत्रं असे म्हणताना आपण कुत्रा-कुत्री या दोघांचाही जोड उल्लेख करीत असतो. तुच्छतेचा किंवा हीनत्वाचा म्हणजेच अवर्गपणाचा भागही त्यात असतो. 'बैलऽ पाण्यावर गेली ' असे शेतकरी म्हणतो तेव्हा बैल या शब्दाचे अवर्ग अनेकवचन तो वापरतो. त्यात दीर्घ अ असा जो प्रत्यय आहे तो तमिळमध्येही आहे. स्त्रीपुल्लिंगांना लागणारे ई, आ (आन्) हे प्रत्ययही तमिळमध्ये आहेत.

क्रियापदांचा रूपविचार

निव्वळ प्रमाणभाषेतली रूपे सोडून बोलीतली क्रियापदरूपे विचारात घेतली म्हणजे त्यांचे प्राचीन तमिळ रूपांशी साम्य आहे हे कळते. 'मी जातु, मी करेन, तू जातांय,

त्यो जातु, आम्ही जातां ' यांतल्या सर्व क्रियापदांमधले प्रत्यय त्या त्या पुरुष-वचनांसाठी तोल्काप्पियात दिलेले आहेत. ' पाहं, धरूं, आईकसि, राखां ' अशी ज्ञानेश्वरांच्या काळची रूपे-त्यांचेही प्रत्यय जुन्या तमिळमध्ये दिसतात. चक्रधर स्वामी स्वतःचा उल्लेख ' हें ' म्हणून करतात. त्याचे मूळ तमिळ एऽन् म्हणजे मी. तेच ' करेन 'मध्ये आले; कारण तमिळमध्ये पुरुषवाचक सर्वनामाचाच अंश जोडून क्रियापद सिद्ध करतात. अशा रीतीने नुसताच संस्कृत प्रत्ययाशी मेळ बसवण्यापेक्षा, मराठी प्रत्ययांचा खरा अर्थ कळण्यासही दक्षिणी भाषांचीच मदत होते. ' होईल, खाईल ' यांतला जो ल आहे तो संस्कृतवरून लागतच नाही. पण तमिळमध्ये ल् असाच असल्यामुळे त्याचेही गूढ उकलेल.

देश आणि काल

यातून नवे गूढ उद्भवते की या महाराष्ट्र देशात हीं भाषा कधी काळी प्रचारात होती काय ? येथल्या गावांची नावे, गावगना पसरलेल्या लहानमोठ्या दैवतांची नावे आणि कुलाचार, आमच्या नात्यागोतांच्या चाली, या सगळ्यांचा विचार करता याचे उत्तर ' होय ' असे द्यावे लागते. निरनिराळ्या निबंधप्रबंधांत याचा ऊहापोह केलेला आहे. नुसत्या भाषिकाचाच नव्हे तर मिथ्य, वनस्पती, खगोल या सर्वांचा अशा मानविक अभ्यासात आधार घ्यावा लागतो. भाषेत शब्दांनी जतन करून ठेवलेल्या सांस्कृतिक अर्थविशेषांनी त्याला सुसंगत पुरावा मिळत जातो हे महत्त्वाचे आहे.

' चावुण्डराये करवियले ' हे हजार वर्षांचे जुने वाक्य हा मराठीचा लेखी पुरावा. असे लिखित पुरावे जेवढे जुने उपलब्ध होतील तेवढे आपण त्या भाषेचे वय जास्त समजतो. वास्तविक पुरावे अलिखित, पण लोकसंस्कृतीत जतन झालेले, कितीतरी आहेत. त्यांतल्या अगस्त्य, मुरुगन् यांच्यासारख्या कथांचा वृक्षपूजेशी आणि खगोल-स्थितीशी मेळ घालता, ही लोकसंस्कृती बीजरूपाने इसवी सनपूर्व सुमारे तीन हजारपासून चालत आली असावी असे अनुमान होते.

मराठीचा दुवा

मराठी लोकभाषेत दक्षिणी भाषांसारखे सिथियन-तुराणियन शब्द आहेत असे मत मोल्सवर्थच्या कोशाच्या प्रस्तावनेत डॉ. विल्सन यांनी मांडले होते. ते १८५७ पासून दुर्लक्षितच राहिले. त्या शब्दांच्या संस्कृत व्युत्पत्तीही पुढे आल्या. त्यांची मूळरूपे तर दक्षिणी भाषांत आहेत. म्हणजे मराठी हा या दोन्हींमधला उत्तम दुवा होतो. महाराष्ट्र आणि मराठी ' मध्ये महाभारतम् ' उभी असल्याचें जाणवते.

पतंजलीने संस्कृतात शवति-गति-रंहति असे एका अर्थाचे अनेक बोलीशब्द नोंदून ठेवले आहेत. तोलकाप्पियात तमिळच्या बारा लोकभाषांचा उल्लेख आहे. शवति-

चा–जाणे असे संबंध जोडून दाखवता येतात. मग डॉ. केतकरांचे मत आठवते : 'संस्कृत भाषा स्थानिक भाषांवर संस्कार होऊन तयार झाली. आर्य–द्रविड संबंध इसवी सनपूर्व २००० च्याही अगोदर आला असणे शक्य आहे. त्या काळची स्मारके आज जरी सापडत नसली तरी उद्या सापडतील अशी दृढ आशा आहे.'

केतकरांनी आशा केली ती स्मारके मराठी भाषा आणि संस्कृतीत आपल्याला सापडतात. या 'संस्कृत–मराठी–तमिळ' साखळीत मराठी हा दुवा आहे।

ऊर्ध्वमूल अश्वत्थ

या सं-म-त भाषांमधला भेद नेमका कोणता ? यास्क आणि पाणिनी सर्व शब्द धातूंपासून निघाले म्हणतात; तोलकाप्पिय सर्व शब्द नामशब्द आहेत असे म्हणते. संस्कृतात दुधाला दुग्ध = धार काढून मिळवलेले असे म्हणतात; दक्षिणी भाषांत तु (दु)=अन्न यावरून तुतै=दुधाचे भांडे, तुप्प=तूप असे दुधाशी संबंधित शब्द आहेत तु हे मूळ, धार काढण्याच्या संस्कृतीच्या पूर्वीचे असले पाहिजे आणि ते दुदु दूद सारख्या मराठी शब्दांनी जतन केले आहे. या विज्ञानसिद्ध समन्वयी भूमिकेतून पाहिले तर हा सं-म-त भाषावृक्ष ऊर्ध्वमूल अश्वत्थासारखा भासतो. त्याचे वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे.

आणि अधि फांकलीं डाळें। तियें चि होति मूळें।
तेयातळिं पघळे। वेलि पालौ॥
परि येरां रुखासारिखा। तळिं मूळें वरि शाखा।
तैसा न्हवे म्हणौनु लेखा। नेए कव्हणा॥

१ : अर्थ, ध्वनी

१.१ मुळाचा शोध

मुळाचा शोध घेण्याची ओढ ही मानवी शोधप्रवृत्तीतलीच एक वरची पायरी आहे. जे जे आहे त्याचे ज्ञान माणूस करून घेतो. ज्ञानेंद्रिये निरखीत असतात, त्या निरखणांची नोंद करतात, व्यवस्था लावतात, काही नियम सिद्ध करतात. पुढे जाऊन या व्यवस्थेची, नियमांची उकल व्हावी म्हणून तत्त्व, मानीव, सिद्धांत अशा अधिकाधिक 'शुद्ध' विचारकल्पांनी ज्ञानाचे भांडार वाढवीत जातात. या सर्वांच्या मुळाशी काय असावे हा प्रश्नही त्याच न्यायाने हाताळतात.

सूर्य, चंद्र, पृथ्वी यांच्याविषयीचा शोध हे याचे परिचित उदाहरण म्हणून घेता येईल. सूर्यचंद्रांचे उगवणे–मावळणे, त्यांचे नियमित वागणे इत्यादी अनेक निरखणे माणसांनी शतकानुशतके केली. त्यावरून 'पृथ्वी हे केंद्र, त्याभोवती साऱ्या ज्योती फिरतात' असे एक मानीव मांडले. मांडणारांच्या लेखी ते सिद्धांतरूप पावले. पुढे कोपर्निकस म्हणाला, 'असे नाही. पृथ्वी आणि इतरही अनेक ग्रह सूर्याभोवती वर्तुळ-मार्गाने फिरत आहेत.' त्याने ज्या निरखणांचा आधार घेतला होता त्यांचाच खोलवर अभ्यास करून केपलरने सिद्ध केले की यांचे मार्ग वर्तुळ नसून दीर्घवर्तुळ आहेत. 'ते असेच का ? चंद्र पृथ्वीभोवतीच का फिरतो ?' असल्या प्रश्नांचा शोध घेताना न्यूटनने जडओढीचा विश्वल सिद्धांत मांडला. त्यावरून मग निष्कर्ष निघू लागले. निरखणांवरून सिद्धांत काढणे ही विगमनाची पद्धती, सिद्धांतावरून नवे निष्कर्ष काढणे ही निगमनाची पद्धती. दोन्हींचा वापर होऊ लागला. जडओढीच्या सिद्धांतावरून नव्या ग्रहउपग्रहांच्या अस्तित्वाची भविष्ये झाली आणि ती निरखणाने खरी ठरली. त्यामुळे त्या सिद्धांताची विश्वलता अबाधित मानली जाऊ लागली. पेदोनशे वर्षांच्या विज्ञानयात्रेनंतर, निरखणांची वावरे अणूहून अणीय आणि महताहून महीय झाली. तेव्हा सिद्धांतातल्या त्रुटी लक्षात आल्या. आइनस्टाइनने सापेक्षतेचे गणित मांडून त्या त्रुटी सुधारल्या. संचिताचा अव्हेर न करता हे सारे होत गेले. त्याचे दुय्यम परिणाम म्हणून विज्ञानाचे संचित केवढे तरी वाढले. विश्वविषयक विचारात उलथापालथी झाल्या. 'या साऱ्याचे मूळ काय ?' हा प्रश्न पूर्वी होता त्यापेक्षा कदाचित आणखी कठीण झाला आहे. पण विज्ञानिकांना त्याची फिकीर नाही. विज्ञानयात्रेच्या येरझारांत त्यांना आनंद आहे, मोक्षाची चाड नाही.

मराठी भाषेच्या मुळाचा शोध आपण याच भूमिकेवरून घेणार आहोत. भाषा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झालेली असते. लहानपणापासून शिकलेल्या, दोन ते पाच या वयात मिळवलेल्या भाषेतून आपला विचारही चालत असतो आणि तिला 'मातृभाषा' 'मायबोली' अशा भावनोत्कट नावांनी आपण ओळखीत असतो. तरीही तिच्या मुळाचा किंवा इतरही विचार करीत असतांना आपली भूमिका श्रद्धाळू भक्ताची नसून चिकित्सक विज्ञानिकाची असली पाहिजे. व्याकरण-महाभाष्यात पतंजलीने दोन अडीच हजार वर्षांपूर्वीच सांगून ठेवले आहे : 'आणि जो का वाग्योगी त्यास विज्ञान आसरा! अथ यो वाग्योगवित्। विज्ञानं तस्य शरणम्।' विज्ञानाचा आसरा घेतला म्हणजे रूढरूढ सिद्धांत, गोडगोड गृहीते इत्यादिकांनी न चळता नवी निरखणे, वेगळे विचार यांना आपण सिद्ध होतो. त्यात पूर्वसूरींच्या मताचा विरोध असेल पण अनादर नव्हे, त्यांचे म्हणणे मानलेले नसेल पण त्यांच्या यत्नाचे मोल कमी लेखलेले नसेल.

१.२ भाषेचे पंचांग

भाषा हे माणसाचे सामाजिक, संस्कृतिक अर्जित आहे. समाजात उदय पावते म्हणून सामाजिक, संस्कृतीशी अतूट संबंधित म्हणून संस्कृतिक. रंग-रूप-बुद्धी यांच्या-प्रमाणे सहजप्राप्त नव्हे तर सामाजिक परिसरातून प्रयासाने मिळवलेले असते म्हणून अर्जित. हे अर्जित व्यक्तीगणिक किंचित वेगळे असले तरी विशिष्ट गटाच्या, समुदायाच्या किंवा समाजाच्या बाबतीत अनेकांशी नेमके असते. म्हणून महाराष्ट्रातली भाषा, कर्नाटकातली भाषा, गावरान भाषा, असे प्रयोग शक्य होतात. पण इतकेच. अशा दोन भाषिक गटांच्या संपर्काच्या जागी भाषांच्या सीमाही एकातएक मिळून जातात. नुसत्या भाषेवरून व्यक्तीच्या किंवा समाजाच्या बाबत इतर कोणत्याही विषयातले भेदक विधान करता येत नाही. उदाहरणार्थ सारे कोकणी बोलणारे अमुक एकाच वंशाचे आहेत असे म्हणता येत नाही. या अर्जिताचा विज्ञानिक अभ्यास समाजिक, मानविक, इतिहासिक अशा विज्ञानांच्या शाखांमधून होत असतो.

भाषिक (म्हणजे भाषिक विज्ञान) भाषेचा भाषा म्हणून अभ्यास करण्याचे विज्ञान होय. भाषिकाच्या संदर्भात, भाषा हे समाजिक विचारवहनाचे ध्वनि-माध्यम होय. 'जो उच्चारल्याने द्रव्य-क्रिया-गुण-आकृतींचा प्रत्यय येतो तो शब्द. अथवा ज्याच्या पदांचा निश्चित अर्थ प्रतीत होतो तो शब्द. म्हणून ध्वनी 'शब्द' होय.' ही पतंजलीने केलेली व्याख्या भाषिकाला मान्य आहे. ध्वनी उच्चारला जातो तसा ऐकलाही जातो. अनेक शब्द संहित करून विधाने होतात. शब्द संहित होताना त्याची रूपे होतात. या रूपांचे, त्यांच्या संबंधांचे नियम बसून जातात ते भाषेचे व्याकरण असते. भाषेतल्या ध्वनींना अर्थ असतोच, म्हणून अर्थविचार हाही भाषिकाचा एक भाग असतो. अशा तऱ्हेने भाषेचे पंचांग पुढील संज्ञांनी मांडता येईल :

१. ध्वनिम (अनेकवचन ध्वनिमे)	: उच्चारलेले शब्द	: ध्वनिक.
२. रूपिम (अ. व. रूपिमे)	: ध्वनिमांची विविध रूपे	: रूपिक.
३. अर्थिम (अ. व. अर्थिमे)	: रूपिमांचा वस्तुजाताशी संबंध जोडणारी.	: अर्थिक.
४. श्रुतिम (अ. व. श्रुतिमे)	: ऐकलेला ध्वनी	: श्रुतिक.
५. व्याकरण	: रूपिमांची व्यवस्था	: व्याकरण.

वरती प्रत्येक ओळीत त्या त्या अंगाच्या उपविज्ञानाचे नाव दिलेले आहे. म = मत् हे लक्षात घेतल्यास परिभाषा स्पष्ट होईल. विज्ञान आणि उपविज्ञानांच्या नावांमधला '–इक' वा 'क' हा 'विषयक' '–संबंधी' या अर्थी. म्हणताना 'श्रुतिक विज्ञान'च्या ऐवजी 'श्रुतिक' असे थोडक्यात म्हणावयाचे. श्रुतिक विज्ञानिकांनाही 'श्रुतिक'च म्हणता येईल.

या पंचांगात लिपी, लिखित भाषा, शुद्ध-अशुद्ध भाषा इत्यादी संकल्पनांना स्थान नाही हे दिसून येईल. 'प्रमाण भाषा' हा प्रकारही भाषिकाने ठरविलेला नसून समाजिक, राजकीय वगैरे कारणांचा परिणाम असतो. भाषिकात तिचा अभ्यास होतोच.

भाषिकाच्या शिस्तीला धरून भाषेचा अभ्यास करावयाचा म्हणजे या पाच अंगांनी तो केला पाहिजे. विशिष्ट नावाने ओळखली जाणारी भाषा, खरोखरी अमुक एका भेदक रूपात अस्तित्वात नसते. तिची देश, काल आणि लोक यांच्यानुसार विविध रूपे असतात. पैकी काल–परिमाणाचा आणि कालपरिणामाचा विचार करता, एका विशिष्ट काळी भाषेचे जे स्वरूप असेल त्याच्या विश्लेषणाला 'एकाल' (एककाल) विश्लेषण म्हणता येईल; तर, पुरातन काळापासून तिची जी वेगळाली रूपे वेगळाल्या काळी प्रचारात होती त्यांचा अभ्यास 'कालभेदी' विश्लेषण म्हणता येईल.

अखेरपक्षी भाषेतले बदल घडून येतात ते लोकांच्यामुळे; कारण भाषा हे लोकांचे अर्जित असते. लोक काही साच्यातून काढल्याप्रमाणे एकसारखे नसतात. त्यामुळे त्यांच्या उच्चारणात, श्रवणात, पुनरुच्चारणात बारीकसा का होईना पण भेद असतोच. एकेका काळात तो फक्त देशांतरी व लोकांतरी ध्यानात येऊ शकतो. कालांतरी बदल होतात ते मात्र कालावधीनेच समजू शकतात. अशा बदलांचा विविध भाषांच्या आधारे अभ्यास करून भाषिकांनी निष्कर्ष काढले ते इतिभाषिकात (इतिहासिक भाषिक-विज्ञानात) मोडतात.

गेल्या शतकात भाषिक म्हणजे इतिभाषिक असेच जवळजवळ समीकरण होते. अनेकानेक भाषांचा अभ्यास करून त्यांच्यातली साम्ये व विरोध पाहावे, त्यांचे कालभेदी विश्लेषण करून भाषांचे वेगळाले वर्ग करावे, सारखेपणांवरून भाषांची कुळे ठरवावी ही

भाषिक विज्ञानाची कर्तव्ये मानली जात. या अभ्यासातून भाषिकांनी पुष्कळ भाषाकुलांची निश्चिती आणि मांडणी केली. नंतरच्या काळात वनजातींच्या ज्या भाषा भाषिकांना उपलब्ध होत गेल्या त्यांचीही गणना यांतल्या एका ना एका कुळात होत गेली. भारतातल्या भाषा सामान्यपणे चार कुळांत विभागल्या गेल्या : भारतार्य, द्रविड, मुंड आणि चीन-तिबेटी. मराठी भाषा भारतार्य कुळातली ठरली. 'एक मराठी सोडली तर विंध्याच्या दक्षिणेस फक्त द्रविड कुळातल्या भाषा प्रचारात आहेत' हा मान्य सिद्धांत झाला. त्यातून निगमनाने महाराष्ट्रातल्या संस्कृतीबद्दलचे उपसिद्धांत निघाले. भाषा आणि संस्कृतीविषयीचे जे तपशील या सिद्धांताशी जुळत नसतील ते देशी किंवा द्रविड किंवा परदेशी यातल्या एका वर्गात टाकले जाऊ लागले. एरवी भाषेच्या सर्व अंगांचा संबंध संस्कृत या आर्यभाषेला भिडवणे हे भाषिकाचे सूत्र झाले.

१.३ निरखणांची वावरे

या रूढ मतानुसार, 'मराठी भाषेचे मूळ' हाच मुळी, उकरून काढलेला विषय ठरेल. कारण, ते संस्कृतात आहे हे भाषिकाने केव्हाच प्रस्थापित केलेले आहे. भाषिक विज्ञानाचा मात्र अशा आक्षेपाला पाठिंबा मिळणार नाही. कारण हे विज्ञानच विगमनावर आधारलेले आहे. विगमनाची आधारभूमी निरखण. निरखणाचे वावर वाढले तर आधीचे विगमनजन्य निष्कर्ष बदलण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी वावरे वाढवून आधीच्या मर्यादित वावरी निरखणांचे निष्कर्ष पडताळून पाहणे हा विज्ञानिकाचा छंदच आहे. अंती काय निघेल याचा विचार करण्याचे किंवा अंदाज घेण्याचे कारण नाही. किंबहुना तसे न केले तरच आपला तपास वस्तुनिष्ठ राहील.

असे पूर्वी झालेले आहे. अठराव्या शतकापर्यंत युरोपीय भाषिकांचे वावर युरोपातल्या भाषांपुरते मर्यादित होते. लातिन आणि ग्रीक भाषा त्या सर्व भाषांच्या मूलधारा असे ते मानीत होते. दोनशे वर्षांपूर्वी त्यांचे वावर अचानकपणे वाढले. विल्यम जोन्स यांनी संस्कृत भाषेचा आणि तिच्या लातिन-ग्रीक यांच्याहूनच्या प्राचीनतेचा शोध त्यांना लावून दिला. भाषिक विज्ञानच मुळापासून बदलले. नवे निष्कर्ष निघाले आणि भाषाकुळांची तत्त्वे पुढे आली. यातूनच आर्य भाषाकुळाची मांडणी झाली आणि मराठीचे नाते शेजारच्या कानडीपेक्षा ध्रुवाजवळच्या स्वीडिश भाषेशी जडले.

पण निरखणांचे वावर नित्य मर्यादितच राहिले. भाषाकुळांची व्यवस्था हीसुद्धा त्याला एकप्रकारे कारण होती. भाषेच्या नात्यागोत्यांची गाठ फक्त 'सहकुटुंब सहपरिवार' कन्हाडासमोर बांधली जात होती, 'इष्टमित्रांना' त्यात स्थान नव्हते. भाषिक निरखणे त्या त्या भाषाकुळापुरती, त्यामुळे निष्कर्ष आधीच चिंतिल्याप्रमाणे मिळत होते आणि जुन्या सिद्धांताला पुष्टी देत होते. काही कानामात्रेचा फरक पडेल तेवढाच. या

शतकाच्या आरंभी भारताची भाषिक पहाणी झाली. तिचे फलित दहा हजार पृष्ठांच्या ग्रंथसंभारात उपलब्ध आहे. पण ती पहाणी 'भारतीय' भाषांची नसून 'भारतार्य' भाषांचीच बहुधा होती – दक्षिणी भाषांचा पट्टा तिच्यातून वगळलेला होता. सुनीतिकुमार चटर्जींसारख्या एखाद्या भाषिकाने भारतीय भाषाभ्यासात दक्षिणी भाषांच्या अभ्यासाची, निरखणांचे वावर दक्षिणेपर्यंत विस्तारण्याची गरज नित्य प्रतिपादिली– ती आजही तितकीच तातडीची आहे.

मराठीपुरते हे वावर गेल्या वर्ष दोन वर्षांत तमिळच्या काठाशी पोचले आहे. 'अडगळं मडगुलं' ही 'साधना'मधली लेखमाला, 'द्रविड महाराष्ट्र' हे ग्रंथक, 'इतिहासपूर्व मराठमोळी' हा 'मराठी संशोधन पत्रिका' मधला निबंध यांच्यामधून महाराष्ट्रातली भाषा, वसाहत, मिथ्ये आणि लोकसंस्कृती इत्यादिकांत तमिळ अंश किती मोठ्या प्रमाणात आढळतो याचे दिग्दर्शन झाले. 'अगस्त्य' 'मराठी शब्दांत तमिळ दन्तमूल वर्ण' 'भारतीय संस्कृतीतल्या चुकल्या दुव्याचा शोध' 'महाराष्ट्रातली तमिळ संस्कृती?' या इंग्रजी प्रबंध – निबंधांतून भाषिक, संस्कृतिक, मिथ्य आदि विज्ञानांच्या आधारे महाराष्ट्रातल्या भारतीय संस्कृतीत द्रविड म्हटल्या जाणाऱ्या दक्षिणी संस्कृतीचे अस्तित्व प्रागितिहास काळापासून असल्याची चुणूक मिळाली. या ईषदभ्यासांतूनही मराठी भाषेविषयीच्या दृढमूल गृहीतांचा फेरविचार करण्याची गरज जाणवू लागली. ती पद्धतशीर स्पष्ट करण्यासाठी, भाषिक निरखणांचे वावर उत्तरी भाषांच्या बाहेर दक्षिणी भाषांपर्यंत वाढविण्याच्या उद्देशानेच 'मराठी भाषेचे मूळ' शोधण्याचा नम्र बाज मांडावयाचा आहे.

१.४ उत्तरमूल पूर्वपक्ष

भूमितीतल्या प्रमेयांची सिद्धता करताना 'दिलेल्या गोष्टी' या अर्थाने 'पक्ष' शब्द वापरतात. पूर्वपक्ष म्हणजे येथे पूर्वसूरींनी मांडलेली निरखणे, काढलेले सिद्धांत, धरलेली मानीवे वगैरे. त्यांतल्या एका मानीवानुसार विंध्य पर्वतश्रेणी ही आर्य आणि द्रविड वांशिकांच्या वसाहती विभागणारी सीमा होती. सामान्यपणे भारतार्य आणि द्रविड भाषाकुळांच्या क्षेत्रांचीही हीच सीमा मानली जाते (आणि मराठीच्या क्षेत्राला काहीसे संयोगक्षेत्राचे स्थान देण्यात येते.) मॅक्सम्यूलर सारख्या आद्य भाषिकांपासून आजतागायत अनेकांनी वारंवार कंठशोष करून सांगितले तरी लोकमनात आणि काही विद्वानांतही, आर्य आणि द्रविड या वंशांशी भाषाकुलांचे अभेद्य साहचर्य असल्याचे गृहीत धरले जाते; संस्कृतिक इतिहास वर्णन करताना या गृहीताचा वापर झाला आहे, होत आहे. हे सारे विज्ञानसिद्ध नाही. म्हणून या वंशदर्शक नावांपेक्षा उत्तरी आणि दक्षिणी (उत्तर आणि दक्षिण) ही उपपदे आपण भाषांसाठी वापरणार आहोत.

म्हणून मराठी भाषेचे मूळ संस्कृत या उत्तरी भाषेत आहे हा उत्तरमूल पूर्वपक्ष

होय. या पूर्वपक्षातली निरखणे भाषिकाच्या दोन मराठी ग्रंथांमध्ये सविस्तर आली आहेत. पहिला ' मराठी भाषेचा विकास ' (ब्लोक : अनुवादक परांजपे १९४१ १). दुसरा ' यादवकालीन मराठी भाषा ' (तुळपुळे १९७३ २). पहिला कालभेदी अभ्यासाचा तर दुसरा एकाली अभ्यासाचा असे म्हणता येईल. ख्यातीच्या विद्वानांनी या दोन्ही ग्रंथांवर दिलेले अभिप्राय पाहता, ते भाषिकाच्या मान्य तत्त्वांना धरून लिहिले आहेत याची खात्री पटावी.

ब्लोक यांनी आरंभालाच सांगितले आहे की मराठी संस्कृताहून वेगळ्या भाषेपासून ' निघालेली असावी असे दिसत नाही ' आणि ' मराठीचा इतिहास लिहिणे काय किंवा संस्कृतच्या विशिष्ट भाषिक रचनेमध्यें कालवशानें जे फेरफार झाले त्यामुळे मध्य हिंदुस्थानात प्रथम अनेक प्राकृत भाषांची कशी उत्पत्ति झाली व त्यानंतर ती कशी निर्माण झाली हें दाखवणें काय, दोन्ही एकच आहे.' (१ ९) तुळपुळे यांना ही परंपरा साधारणपणे मान्य असली तरी ' केवळ संस्कृत-प्राकृतावर विसंबून चालणार नाही ' हे ध्यानी घेऊन अपभ्रंश ग्रंथांतली भाषाही त्यांनी तपासात घेतली आहे. म्हणजे प्राकृत आणि मराठी यांच्या मधले निरखणाचे थावर त्यात अंतर्भूत केले आहे. भाषेच्या घटनेबाबत त्या दोघांच्या मतामध्ये फारसा फरक नाही. शब्दसंग्रहाची चर्चा करताना हेमचंद्राच्या ' देशी नाममाला 'चा आधार दोघांनीही घेतला आहे. हेमचंद्राने नोंदलेले शब्द वास्तविक मूळचे संस्कृतेतर असले पाहिजेत असे वाटत असूनही ब्लोक यांनी त्यांची संस्कृतसदृश रूपेही दिली आहेत. म्हणजे सगळ्या मराठी शब्दांचे मूळ पुन्हा संस्कृतच. तुळपुळे यांनी ' देशी ' शब्दांची संख्याच मर्यादित मानली आहे.

या विचारांवर दोन शंका घेता येतात. पहिली : संस्कृतमध्ये बदल झाले ते ' कालवशाने ' म्हणजे ध्वनिकाच्या नियमांनी सिद्ध करता येण्याजोगे. हे नियम पुन्हा यान्त्र कुळातल्या भाषांच्या अभ्यासाने सिद्ध झालेले. त्यामुळे उत्तरी शाखाभाषांमधल्या रूपांचा परस्परांशी मेळ घालण्यासाठी ते कदाचित उपयोगी पडले तरी ' देशी ' नामांसारख्या आगंतुक शब्दरूपांना ते लागू पडतीलच असे नाही ही एक. दुसरी : हे सर्व बदल केवळ ध्वनिबदलांनी घडावेत, इतर कसलाच प्रभाव त्यांच्यावर पडू नये इतकी संस्कृत भाषा कवचबंद होती काय? ती तशी नव्हती, अगदी वेदकाळापूर्वीपासून तिच्यावर लोकभाषांचा परिणाम होत होता हे ब्लोक यांनी जागजागी सांगितले आहे. त्याखेरीज गंगोत्रीपासून कावेरीपर्यंत समान संस्कृतीचा धागा कसा का होईना तग धरून होता हेही त्यांना मान्य आहे. मग या सर्वांचा म्हणजे ' काल ' तत्त्वाबरोबरच ' लोक ' व ' देश ' या तत्त्वांचाही परिणाम त्या भाषेवर झालेला आपल्याला विचारात घेतलाच पाहिजे. तसा तो न घेतल्यामुळे देशी, प्राकृत किंवा अपभ्रंश शब्दांची मूळ संस्कृत रूपे म्हणून जी आपल्याला भेटतात ती ध्वनिकाच्या दृष्टीने कदाचित बरोबर असली तरी अर्थाच्या दृष्टीने अनेकदा दूरान्वयी भासतात. ' ध्वनिकाचे नियम जे येथे उपपादिले आहेत ते अबाधितपणे

आणि सर्वसाधारणपणे लागू पडतात ' असेही प्रत्यक्षात दिसत नाही. भाषेच्या इतिहास-ग्रंथात भाषेतल्या सगळ्या शब्दांची उपपत्ती कोणीच अपेक्षीत नाही. तरी मराठीचा शब्दकोश साठ हजारांचा (मोलस्वर्थ १८५७) किंवा लाखाभराचा (दाते १९३८) त्यातल्या बहुसंख्य शब्दांच्या व्युत्पत्ती या ग्रंथांतल्या दोन-तीन हजार शब्दव्युत्पत्तींसाठी काढून दिलेल्या नियमांनी मिळत नाहीत. त्यामुळे ' मराठी व्युत्पत्तिकोश ' (कुलकर्णी १९४६) अनेक व्युत्पत्ती आपल्याला देऊ शकत नाही. मराठी आणि प्राकृत शब्दरूपांबद्दल ही स्थिती असल्यावर मूळ संस्कृत ध्वनिमांतल्या ध्वनींच्या अर्थानुसारी उपपत्ती मिळत नाहीत हे सरळच आहे.

ज्या दक्षिणी भाषांमधले शब्द मराठीत, देशीत किंवा संस्कृतातही आले असे सर्वच विचारांचे मत, त्यांच्या शब्दऋणाचा बारीक शोध झालेला नाही. ' देश 'तत्त्वाच्या ढोबळ उपयोजनाने, मराठी मुलखाला निकट असलेल्या कन्नड व तेलुगु भाषांचे ऋण थोडेफार मानले आणि शोधले गेले आहे. तमिळचे ऋण मात्र अक्षरशः बोटांवर मोजता येण्याइतक्या शब्दांचेच मानलेले आहे. भाषाकुळांच्या संकल्पनेशी ही भूमिका अजिबात सुसंगत नाही. दक्षिणी भाषांमध्ये प्रथमता पावलेल्या तमिळ सारख्या भाषेला वगळून आपण अशा शब्दांच्या व्युत्पत्ती अखेरटोकापर्यंत पोचवू शकत नाही. सुदैवाने आता आपल्याला द्रविड व्युत्पत्तिकोश उपलब्ध आहे (बरो व एमेनो १९७० ३) त्यात एकाठायी दक्षिणी कुळातल्या वीस बोली व भाषांमधले जुळे आणि जुळते शब्द मिळतात. ते मराठी शब्दांशी आपल्याला ताडून पाहता येतात. या सर्व भाषांपैकी तमिळचा खूप विस्तृत कोश (मद्रास युनिव्हर्सिटी १९२४–३८) हाही तमिळमधल्या सवालाख शब्दांचे अर्थ सोदाहरण देत आहे. त्याचा ' लोक ' तत्त्वाच्या उपयोजनाला उपयोग होतो सामान्यतः एका संस्कृतीचे परंतु वेगळ्या भाषा बोलणारे लोक एका संकल्पनेला कोणते ध्वनी किंवा ध्वनिमे कशी वापरतात याची तुलाकल्पना आपल्याला त्यावरून येते.

एका अर्थी, अशा तुलनेने आपण शब्दांचा इतिहासपुरावे म्हणून उपयोग करू लागतो. सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे इतिहासाचे पहिले पान आपल्याला कधीच उपलब्ध नसते. साधार इतिहास तर पुराव्यांवरच उभा राहू शकतो. तुळपुळे म्हणतात, ' भाषेचा उत्पत्तिकाल ठरवण्याची साधने मुख्यतः दोन प्रकारची. एक, ऐतिहासिक स्वरूपाचे उल्लेख व दुसरे, प्राचीन कोरीव लेख आणि ग्रंथ. ' (४) पण उत्पत्ति-कालरूपी ' पहिले इतिहासाचे पान ' वाचायचे तर या वस्तुमय पुराव्याचे प्राणतत्त्व जे शब्द त्यांच्यात साकळलेला इतिहासही आपल्याला वाचता आला पाहिजे. भाषा हे प्रागितिहासाचे विज्ञानिक साधन मानलेले आहेच. ते शब्दांमधून, त्यांच्या अर्थ-ध्वनींमधून काही अंशांनी आपल्याला उभे करता येईल. त्यासाठी, अशोकाचे शिलालेख वाचण्यात जशी द्विभाषिक लेखांची मदत झाली तशीच मदत दक्षिणी भाषांची, शब्दांचे अर्थ लावण्यात होऊ शकेल. कारण द्विभाषिक शिलालेखातला आशय जसा एकच

होता तसाच अनेक शब्दांमधला प्रागितिहास, संस्कृतिक आशयही येथे एकच असणे शक्य आहे.

आपण सुरुवातीच्या शेवटाशी आलो आहोत. मराठी भाषेच्या निरखणांचे वावर वाढवणे हा आपला उद्देश आहे. त्यातून निघणारी बुद्धिगम्य अनुमाने आपण पत्करू. या वावराचे क्षेत्र मुख्यतः दोन प्रकारांनी वाढवायचे आहे. भाषाकुळे वेगळी मानली असली तरी अन्य कुळात निरखणे करण्यास आपली हरकत नाही. नुसत्या ध्वनिकाच्या किंवा नुसत्या भाषिकाच्या तत्त्वांना वा तत्त्वींना धरून आपण राहणार नाही; विज्ञानाच्या इतर शाखांमधूनही, आपली निरखणे व्यापक आणि सूक्ष्मही करण्यासाठी लागेल ती सर्व सामुग्री आपण उचलणार आहोत. मराठी भाषेचे घटक हा आपल्या निरखणांचा पदार्थविषय राहणार आहे.

१.५ अंगठा, अंगुली

संस्कृत गीतेने अकाराला अक्षरांमधल्या ईश्वरी विभूतीचे स्थान दिले आहे. तमिळ तिरु क्‌ कुरळ्‌ चा आरंभच ' अकरमुदलवेळुत्तेल्लाम्‌ : अकार–आदि अक्षरे सारी, आदिपकवन्‌ मुदऱ्‌ऱे यु उलकु : भगवंत मूळ जगताचे ' अशा तुलनेने होतो. मुळाक्षरांच्या मुळाशी असलेल्या या आद्य स्वराने आरंभ होणाऱ्या काही शब्दांचा समग्र असा विचार आता करू.

पहिला अंगुलिनिर्देश ' अंगठा, अंगुली ' या शब्दांकडे. गुजराती, हिंदी वगैरे भाषांतल्या समान शब्दांच्या आधारे याचे मूळ ' अंगुष्ठ, अंगुलि ' या संस्कृत शब्दांपर्यंत पोचते. त्यांचे अर्थ काय ? कोशातल्या उपपत्तीनुसार

अङ्ग्‌ + उन्‌, अङ्ग्‌ + उलच्‌, अङ्गुः हात;
अङ्ग्‌ + उलि अङ्गुलि अङ्गु + स्था + क अङ्गुष्ठ

अमरकोशात अंगुलीला करशाखा म्हटले आहे तेव्हा हातवाचक शब्दावरून उपपत्ती योग्यच आहे. पण अङ्गु हा केवळ कोशगत शब्द असावा. उलच्‌ या तद्धित प्रत्ययाने '–ने भरलेला ' असा अर्थ प्रतीत होतो तो अङ्गुलि शब्दाला तेवढा समर्पक वाटत नाही. ' हातावर स्थित ' हे अंगुष्ठाचे वर्णन खास विशेषाचे बोधक नाही; पाची बोटे हातावरच असतात.

तमिळमध्ये ' बोट ' ला सध्या विरल्‌ शब्द आहे. अंगठा कट्टै विरल्‌, पेरु विरल्‌-पेरु विरल्‌ म्हणजे मोठे किंवा जाडे बोट. या सर्वांचा मराठी शब्दांशी तसा सुतराम संबंध दिसत नाही. ध्वनीचे साम्य पाहता मात्र, कट्टै चा '–गठा ' शी काही मेळ

लागवतो. । ग । हा ध्वनी दाखवण्यासाठी तमिळ लिपीत क चाच उपयोग होतो आणि 'कोठार' हा शब्द कोट्टार असा लिहिला जातो यांवरून या कल्पनेचे समर्थन होते.

द ९६२ कट्टु घट्ट होणे, साकळणे
द ९६५ कट्टै आखूड चण

यावरून '–गठा' या शब्दांगाची पटण्याजोगी उमज पडते. तळहाताकडे पाहिले तर 'हे घट्ट चाडे बोट उंचीला सगळ्यात आखूड चणीचे' आहे हे पटते. आणि 'अं–' या शब्दांगातून तळहाताचा बोध होतो याला तमिळ आधार भरपूर आहे.

तोल्काप्पियम् (संपादक केऽचिकन् १९७५ ५) या आद्य तमिळ साहित्य-ग्रंथातले 'एळुत्तु अतिकारम्' (अक्षर अधिकरण) यामधले सूत्र ३१६ असे आहे :

अकमेन् किलविक्कु क् कैमुन् वरिनै
मुतनिलै योळिय मुन्नवै केटितलुम्
वरैनिलै यिन्ऱे आचिरियर्क्क
मेल्लेळुत्तु मिकुतल् आवयिनान

'अकम्' हा शब्द 'कै' या शब्दाच्या पूर्वी आल्यास 'अ'कारात काही बदल होत नाही. त्यापुढील 'क, म्' यांचा लोप करणे किंवा त्यांना राहू देणे आचार्यांच्या मनावर आहे. लोप केल्यास अनुनासिकाचा आगम होतो. [उदा. अङ्कै, अकङ्कै. यातले अकम् म्हणजे अंतर्भाग, कै म्हणजे हात]

म्हणून,

द ८ अङ्कै, अकङ्कै तळहात (हाताची आतली बाजू)

असा अर्थ सिद्ध होतो. अनुनासिकोत्तर क चा उच्चार । ग । असतो हे पाहता अङ्गु म्ह. हात या संस्कृत शब्दाशी अङ्कै चे साम्य दिसून येते. त्याला

द ५९९ उल् असणे, –ला किंवा –चे असणे
द ६०० उल् आत, अंतर्भाग; सप्तमीचा प्रत्यय

या उल्चा संयोग झाला तर अङ्गुलि या शब्दाचीही फोड होते. पुढे जाऊन संस्कृत अंक, तमिळ अंकै या दोन्ही शब्दांचा तळहाताच्या बोटांवर आकडे मोजण्याच्या पद्धतीशी मेळ घालता येईल. अंक ची पूर्वपाठिका अशी उमगल्यावर 'आंकडा' शब्दातला अनुस्वार व्युत्पत्तिदृष्टीने बरोबरच होता असे वाटेल.

शरीर-अवयवाचे वाचक म्हणून हे दोन्ही शब्द भाषिकात आणि विशेषतः द्रविभाषिकात महत्त्वाचे निर्देशशब्द आहेत. त्यांचे मूळ संस्कृतच आहे अशी आजवरची

भाषिकांची खात्री आहे. निरखणाचे बावर वाढवल्यावर दक्षिणी भाषांतही त्याचे मूळ सापडते हे दिसून आले तमिळ व संस्कृत यांच्या पूर्वापरतेच्या वादात न शिरता या सारांशावरच तूर्त समाधान मानू.

१.६ 'अघाडा'ची चिकित्सा

'अघाडा' या तृणविशेषाच्या नावाची गोष्ट थोडी निराळी आहे. ब्लोक यांनी त्याच्याशी जुळता संस्कृत शब्द म्हणून दिलेला 'आघाट' या वनस्पतीच्या अमरकोशात दिलेल्या सात-आठ नावांमध्ये आढळत नाही. 'इतिभाषिक दृष्टीने, खास भारतीय वनस्पतींची भारतार्य संस्कृतातली नावे किंवा त्यांची जुळती रूपे, भारत-युरोपीय किंवा भारत-इराणी पूर्वभाषेत सापडणार नाहीत कारण ती भारतार्यांनी येथल्या लोकभाषांतून उचलली असली पाहिजेत' असा दृष्टिकोन बरो यांच्या संस्कृत भाषेवरील ग्रंथात मांडलेला आहे. म्हणजे 'आघाट' हे मूळ संस्कृतरूप असण्यापेक्षा उद्भ्रंश रूप असावे. त्याचे मूळ दक्षिणी भाषाकुळात शोधण्याला असा समर्थक आधार आहे.

प्रथम 'अघाडा'ची पूर्ण माहिती (६) ते (१०) या संदर्भग्रंथांवरून घेऊ. हे माठाच्या कुळातले तण महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटकात उकिरड्यावर, ओसाडीत व कुंपणांमध्ये वाढते, भारत आणि समशीतोष्ण आशिया-आफ्रिका-अमेरिका खंडांत याचे वसतिस्थान आहे. कमरभर उंचीच्या या वानसाचे खोड ताठ आणि शाखा दंडगोलाकार निमुळत्या होत जाणाऱ्या किंवा चौकोडी रेसवट असतात. याची पाने थोडी, एका पेरावर समोरासमोर दोन अशी असतात. ती मऊ-केसाळ असतात. खोडाच्या अग्रभागी अर्धा-मीटरभर लांबीचे तुरे येतात त्यांत बारीक बारीक फुले असतात. फुलांना छदे उपछदे (म्हणजे पानासारखे भाग) काटेरी असतात. पाकळ्या हिरवस असतात. केसरामधले केसरकल्प फणीसारखे दिसतात. फळे पाकळ्यांच्या परिदलात बंदिस्त असतात. फळे तयार झालेले तुरे हातभरदेखील लांब असतात. फळे परिदलासह निखळून, घासून जाणाऱ्या प्राण्यांच्या अंगास बिलगतात.

हे झाड औषधी आहे. त्याच्या मुळाचा काढा पोटाच्या तक्रारींवर, आतले स्नायुतंतू आकसून ढाळ थांबवण्यासाठी देतात. सबंध झाडाचा काढा मूत्रल म्हणून लघवी थांबण्यावर देतात, त्वचेवरच्या पुरळ-फोडांवरही वापरतात. पानांची पूड आणि मध यांचा काढा, आव अतिसार यांच्या प्रथमावस्थेत उपयोगी असतो. ताजी पाने मिरे आणि लसूण यांच्या बरोबर वाटून खावरोधी म्हणून देतात. पानाचा लगदा विषारी किडेमाकुंडे चावल्या जागी लावल्यास आराम पडतो. याच्या राखेत पोटॅश असते.

राखेचा उपयोग विषमज्वरावरील औषधात करतात. राख आणि तिळाचे तेल यांचे 'अपामार्ग तैल' कानदुखीवर वापरतात.

बहुधा या आणि आणखी काही औषधी गुणांमुळेच अघाड्याला धार्मिक महत्त्व आणि पावित्र्यही आले आहे. चातुर्मासमाहात्म्य अध्याय २२ यात अघाडा हा बुद्धाचे रूप आहे असे सांगितले आहे. स्मृतिसार ग्रंथात म्हटले आहे की याच्या काड्या दात घासण्यासाठी वापराव्या कारण त्यांतला रस निरोगी असतो. व्रतराज सांगतो की ऋषि-पंचमीच्या दिवशी बायकांनी अघाड्याच्या १०८, अडले नडले तर निदान सात काड्यांनी दात घासावेत; शिवाय त्याचे पान दरवेळी डोक्यावर ठेवून १०८ वेळा न्हावे. अघाड्याच्या काड्या समिधा म्हणून वापरतात. गणेशचतुर्थीला अघाड्याची पाने गणपतीला वाहतात. श्रावणमाहात्म्याची शिफारस आहे की श्रावणी चतुर्थीलाही गणेशाची अघाड्याच्या पानांनी पूजा करावी.

ध्वनि-वर्णांतरांच्या घटपटापेक्षा या माहितीच्या आधारे अघाड्याच्या नाम-रूप-रसांच्या एकरसतेची ओळख जास्त चांगली होते. वनस्पतीच्या भाषिक आणि परिभाषिक नावांत पाने-फुले-फळे यांचा बहुधा संदर्भ असतो. उदा. अघाडा याचे आधुनिक लातिन परिभाषिक नाव अकिरान्थस अस्पेरा : अगलित – परिदल – खरफल : परिदल न गळता राहिलेले खरखरीत फळ असणारे झाड, असे आहे. या खरतेमुळे ही फळे जनावरांना चिकटतात, लांडग्यासारखी. किंबहुना त्यांना आणि म्हणून अघाड्याला सुद्धा 'लांडगा' हे ग्रामीण मराठी नाव आहे आणि ते आजही प्रचारात आहे. मोल्-स्वर्थच्या कोशात हे नाव दिले आहे पण महाराष्ट्र शब्दकोशात गळले आहे.

'लोक' एकप्राय गोत्राचे असले तर शब्दभाव सारखे असतात याचा प्रत्यय अघाड्याच्या 'नायुरुवि' या नावावरून येतो. याची संभाव्य व्युत्पत्ती नायु + उरुवि = 'कुत्र्याच्या रूपाची' अशी आहे. (त २२२३). 'लांडगा' या अर्थी ओऽनायु हा शब्द आहे; तसाच उन्नुवि हाही आहे. उन्नुवि शी जुळता कन्नड हुले – तो जुन्नरच्या महादेव कोळ्यांच्यात वाघ या अर्थी वापरतात. उन्नुवि>उरुवि असा क्रम असल्यास नायुरुविचा लांडगा हा अर्थ आणखी सिद्ध होतो. उरुवि एवढेच अघाड्याचे नावही आहेच. त्याच्या राखेतून मिळणाऱ्या क्षाराला उरुवियुप्पु(उरुवि + उप्पु = मीठ) असाही शब्द आहे. (त ४४९).

लोकनी सुचवलेला संस्कृत उद्भ्रंश 'आघाट' याच्यापेक्षा 'अपामार्ग' हा अधिक वापरातला असावा कारण तो 'देशी नाममाला'च्या टीकेत आला आहे. अमर-कोशात त्याचे पुढील पर्याय आहेत : अपामार्ग शैखरिक अधामार्गव मयूरक प्रत्यक्पर्णी केशपर्णी किणिही खरमंजरी. (८ १००) हे सर्व पर्याय 'शब्द' नसून 'व्याख्या-शब्द' किंवा 'परिभाषा शब्द' आहेत, हे त्यांच्या अर्थाचा थोडा खोलात शोध केला

तर दिसून येते. सटीक अमरकोश (थत्ते १८७७ ८) या संदर्भग्रंथातल्या टीकेत संस्कृत स्पष्टीकरणे आणि मराठी पर्यायही दिले आहेत. त्यांवरून आणि वर दिलेल्या वर्णनमाहितीवरून हे असे पडताळता येते :

अपामार्ग : अपसारक, जलशोधक ?
अधामार्गव : अधोभागाचे मार्जन करणारा ?
शैखरिक : शेखर म्हणजे मस्तकी माला धारण करणारा.
मयूरक : मोर, शैखरिक. फुलोऱ्याच्या तुरकांडी वरून ?
प्रत्यक्पर्णी : पाने एका पेरावर दोन अशी समोरासमोर म्हणून.
केशपर्णी : पाने मऊ-केसाळ.
खरमंजरी : ' फुलांना छदे-उपछदे काटेरी असतात ', असेरा.
किणिही : किण हनन करणारी. वरण्ड, किण, घुण हे एका अर्थाचे शब्द. वरंड = मुखरोग, वदनव्यथा. किग = मांसग्रंथिभेद. कुदळ, काठी वगैरे घासल्याने तो हातावर उमटतो, अर्थात व्रग किंवा सोलून निघणे. (८ १६४).

या सर्वांवरून हे सिद्ध आहे की अघाडा हा शब्द संस्कृतातून आलेला नाही.

देशी नाममाला मधले आणि त्यावरील टीकेतले उल्लेख श्लोकानीच दिले आहेत:

अग्घाडम्मि मउरमउरन्दा; मउरो तथा मउरंदो अपामार्गः ।

यातले मउर, मउरन्द हे मयूरक चे जुळे आहेत. मात्र त्यामुळे ते संस्कृतोद्भव होत नाहीत. कारण मयूर हाच संस्कृतला दक्षिणी ऋणशब्द आहे. त्याचे मूळ तमिळ मयिर् म्हणजे केस, पिसे इत्यादी आणि मयिरकम् म्हणजे पुन्हा नायुरुवि (त ४०७७). शेवटी अग्घाड हाच एक शब्द राहतो आणि ध्वनीबरोबरच अर्थाची चिकित्सा मानल्यास त्याचे दक्षिणी मूळ आपल्याला सिद्ध करता येते.

संस्कृतातल्या आठ कोशगत नावांपैकी अपामार्ग हे एकच जास्त प्रचारात राहिले. कोणत्या गुणाशी संबंधित नाव असे टिकून राहील याचा नियम असा नाही. तसा दृष्टीने ' आघाट ' या शब्दाला अघाड्याच्या गुणांच्या संदर्भात अर्थ असता तर प्रचारातून गेलेले शब्दमूळ असे त्यालाही म्हणता आले असते. ' आघाट ' तसा नाही. तसल्या परीचा दक्षिणी शब्द मात्र आपल्याला मिळतो. दक्षिणी भाषांमधली अघाड्याची नावे अशी :

(तमिळ) कटलाटि । कडलाडि । द ९४०.
कदाचित कटल् = समुद्र वरून. त ६६०

वास्तविक हा शब्द बहुधा कटि। कडि। = चावणे, चावल्याचा व्रण (कटि। कडि। : 'कडकडून' चावणे मातला); कटम्बै। कडम्बै। = गांधिलमाशी यांच्याशी संबंधित असावा. अशा चावण्यावर अघाड्याचा पाला लावतात यावरून.

कन्नड, तेलुगु उच्चणि द ५२९

याच्या मुळाशी बहुधा उच्चि = प्रतिस्पर्धी, खेळगडी, बोडीचा गडी. 'प्रत्यक्पर्णी' याशी अर्थ-संबंधित.

अशाच प्रकारे अघाड्याच्या 'किणिही' म्हणजे मुखरोगपरिहारक गुणाचे निदर्शक एखादे नाव असले पाहिजे. बरेच जुने असले पाहिजे, कारण ऋषिपंचमीला थोड्या-थोडक्या नव्हे १०८ वेळा अघाड्याच्या काड्या चावाव्या असा आचारधर्म त्याच्याशी निगडित झाला आहे. द २२ ची नोंद आहे :

(तमिळ) अक्करम् } एक मुखरोग, अग्नि, ॲप्थाय्, परजीवी
(मलेयाळम्) अक्कारम् } कीटाणूमुळे होणारा मुखदाह रोग.

देशी 'अग्घाड' तमिळमध्ये 'अक्काट' असा लिहिला जाईल हे लक्षात घेतल्यास अक्करम्, अक्कारम् > अग्घाड, अघाडा अशी व्युत्पत्ती बसते. तमिळ लिहिण्यात द्वित्त कठोर अक्षरे आली तरी बोलण्यात त्यांचे उच्चार मृदू (सघोष किंवा अघोष) करण्याकडे प्रवृत्ती असते हेही या संदर्भात महत्त्वाचे आहे.

'अघाडा'च्या मुळाकडे आपण शक्य तेवढे गेलो. त्याचा दुसरा एक अर्थ आहे नायकांच्या केसांची अग्रे (बांधणे, विंचरणे, घालणे या संदर्भात). त्या अर्थाला मयिर्, मउर, मयूरक इत्यादी सर्व भाषांतले शब्द अर्थदृष्ट्या जवळचे आहेत. केसांच्या लांब-सडकपणाशी रूपकाने तमिळ अक्कम = दोरी, धागा यांचा संबंध लागतो. मिथ्यामधून आलेला संबंधित आचारधर्म 'डोक्यावर पान ठेवून १०८ वेळा न्हावे' यात समावला आहे. द २७ मध्ये तमिळ अक्क, कन्नड अग्ग, अग्गणे, हग्ग यांच्याशी तुल्य मराठी-गुजराती पाग (=घोड्याला लावलेली दोरी) याचा उल्लेख आहे आणि त्यालाच 'आघाडी' असा दुसरा मराठी शब्द आहे.

अघाडा हा शब्द दक्षिणी-मराठी आहे.

१.७ व्युत्पत्तीचे ध्वनिक

'कालवशाने' संस्कृत वर्णध्वनींमध्ये झालेल्या बदलांचे नियम हेच मराठी व्युत्पत्तीचे ध्वनिक धरून ब्लोक यांनी त्याचे विविध नियम दिले आहेत. त्यांतल्या चार नियमांशी 'अघाडा'तल्या ध्वनींचा संबंध लागला आहे.

◻ आघाडाच्या जोडीनं आघेडा हा कदाचित् गुजराथीतून आलेला असेल. (१ ११६)

◻ मराठीत अघोष आणि घोष वर्णांमध्ये अदलाबदल जवळ जवळ नाहीं. (१ १३१)

◻ शब्दारंभी : सं. घ च्या ठिकाणी घ- येतो. सामासिक शब्दांच्या प्रथम पदाच्या आरंभीही तेंच होतें; उदा. विघडणें, कदाचित् आघाड.

आद्याक्षरीं येणारा घ दोन भिन्न अक्षरांच्या अलीकडे झालेल्या एकीकरणामुळें होतो : घोव < दे. गोहो. (१ १३७)

◻ शब्दांतर्भागीच्या ड–चे पुढीलप्रमाणे मूळ असते : सं. आणि प्रा. अनुनासिकानंतरचा : प्रा. ड सं. ट पासून झालेला : अघाडा (अघाट) अडुळसा (अटरूष). प्रा. ड र– योगाने मूर्धन्य झालेल्या सं. त–पासून झालेला : पड–आणि तद्भव शब्द. (सं. प्रति–)

अक्करम् वरून अघाडा आला असला तर घा–चे हा दक्षिणी भाषांतही शोधता येईल. आ–ए असे स्वर एकाच शब्दाच्या दोन रूपांत येणे फारसे असाधारण नाही. आणखी एक गोष्ट या संबंधात लक्षात घेण्यासारखी आहे. ज्या मराठी शब्दांच्या संस्कृत मूल व्युत्पत्ती काहीशा न पटणाऱ्या वाटतात त्यांचे जुळते शब्द उत्तरी भाषांपैकी गुजरातीत मात्र बहुधा सापडतात. उदा. ओळख (सं. अवलक्षण !). याला अर्थात रूढ मतानुसार प्रादेशिक साहचर्य आणि विंध्याची दक्षिण ही कारणे दिली जातील. पैकी दुसऱ्या कारणाला दक्षिणी–भाषा–मूल व्युत्पत्तींचा पाठिंबा मिळेल. काही असो, शब्दग्रहणाच्या बाबतीत चालू भाषिक सीमांना आणि साहचर्याला महत्त्व देण्याने व्युत्पत्तीचे ध्वनिक बंदिस्त होते याचा विचार व्हायला हवा.

नवे व्यापक ध्वनिक विचारात घेतले तर घोष-अघोष वर्णांच्या बाबतीतला नियमही बदलावा लागेल. दोन स्वरांच्या मधले अघोष व्यंजन घोष होण्याची दक्षिणी भाषांची प्रवृत्ती आहे. लिहिताना मात्र अघोष व्यंजनाचीच मुद्रा वापरली जाते. उदा. अकम् चा उच्चार अगम् होईल, अघम् ही होईल. अशा शब्दांशी जुळते शब्द मराठीत जे दिसतात त्यांच्यात हे घोष उच्चार आढळतात. कधी अघोष तसेही राहतात. बहुधा अनेक लोकभाषांच्या संकराने हे घडले असावे. म्हणून अघोष-घोष बदल मराठीत अजिबात होत नाही असा निरपवाद नियम करता येणार नाही.

आघाट असा प्रचारातला संस्कृत शब्दच नसल्यामुळे त्याला सामासिक म्हणणे आणि त्याचे उदाहरण ध्वनींच्या तुलनेसाठी देणे हे तर्कसंगत होत नाही. घो > गोहो हे उद्धृत येथे अघाडा शी खास संबंधित नसले तरी मुद्दामच घेतले आहे. चालू

शब्दाची कुळी देशी शब्दाला मिळवली की काम झाले अशा एकपार्यंडा मराठी व्युत्पत्तीत पडला आहे. वास्तविक पुढे जाऊन देशी शब्दाचेही मूळ तपासायला हवे. येथे गोहोचे मूळ काय ? तमिळ कोऽ म्हणजे देव, पती, धनी; त्यावरूनच कोऽइल् म्हणजे देवाचे स्थान किंवा देऊळ आणि कोऽपुरम् म्हणजे गोपुरम्—ज्याच्या उच्चारात क चा ग होतो. हे समजले तर घो < को = पती हे सरळ दिसते. संभव असा आहे की बोलभाषेतल्या । घो । लाच वाङ्मयीन देशी मध्ये गोहो असे रूप दिले गेले. नसले तरी घ चा । ग ह, हग ग्रामीण भाषेत अजून होत असतो (' हा वहाग आहे '), त्यावरून घो > गोहो सिद्ध होईल.

शब्दांतर्भागीच्या ट चा ड — अघोषाचा घोष — ही क्रिया तमिळसारख्या भाषेत सर्रास चालू असते. त्यामुळे मराठी शब्दामधला ड तमिळ शब्दामधल्या । ड । शी ' तत्सम ' असू शकतो. जेथे मराठी — ड — युक्त शब्द तमिळ — ट — = — । ड । — युक्त शब्दाशी तुल्य असेल तेथे ' संस्कृत तद्भव 'पणापेक्षा ' तमिळ तत्सम 'पणा अधिक ग्राह्य मानावा लागेल. म्हणून म. अडुळसा < सं. अटरूष ही व्युत्पत्ती अग्राह्य मानावी लागते. अघाड्याचे वनस्पतिक, औषधी (आणि ध्वनिकही) विशेष ध्यानी घेतले त्याच दिशेने अडुळसा चे विश्लेषण करता येते. त्याचे सार असे की हा शब्द कन्नड अडुसोगे याच्याशी जुळता आहे; त्यातल्या अडु शी संबंधित दक्षिणी शब्द :

द ८७ अट्टु (अट्टि)	पू होऊन वाहणे, मधाप्रमाणे झरणे, ओतणे.
(मलैयाळम्) अटियुक	(डोळा) अति झरण्याने बरा नसणे.
(तुळू) अट्टुनि	मुतणे.

मराठी पडसाद पडछाया यांसारख्या शब्दांतला ड ' सं. प्रति मधल्या र-योगाने मूर्धन्य झालेल्या सं. त-पासून झालेला ' ही व्युत्पत्ती विनाकारण घळसेदार आहे. वास्तविक पड या शब्दाला मराठीत जेवढे म्हणून अर्थ आहेत ते बहुतेक सारे दक्षिणी (प + स्वरांकित ट) = । प + स्वरांकित ड । या ध्वनीमधून आपल्याला मिळू शकतात. त्यामुळे सं. प्रति कडे वळण्याचे कारणच नाही. दुसरे : प्रति चा मराठीत पै होतो असे पैसणं, पैज, पैठण, पैंग, पैल या शब्दांवरून सांगितले आहे (१ ९४); त्याच्याशी प्रति > पड याचा मेळ बसत नाही.

पट : (निपातशब्द) < पडु एक तुलनेचा शब्द (ओऽर् उवमवुरुपु = एक उपमेचे रूप) उदा. । मलैपड वरिन्दु । पर्वताप्रमाणे अडविता. त २४३०

पडु : (अकर्मक) अस्तित्वात येणे. दिसणे.

(सकर्मक) — सारखे असणे, मिळते असणे, संबंधित असणे त २४४०

या नोंदींवरून दिसेल की अर्थ आणि ध्वनी या दोन्ही बाबतीत मराठी पद हा दक्षिणी आहे, संस्कृत नाही. अर्थात प्रति हे पद चे मूळ नाहीच.

आणि ते पै येही मूळ नसावे. पच्-, पय्-, पेऽ-, पै अशा अनेक दक्षिणी शब्दध्वनींमध्ये वेगवेगळ्या मराठी शब्दांमधल्या पै चे मूळ आहे असे बारीक शोधाअंती आपल्याला दिसून येईल.

ब्लोक यांनीच दुसऱ्या एका ठिकाणी म्हटले आहे : 'व्युत्पत्ती एकतर उघड असतात नाहीतर सुचवणाराच्या श्रद्धेच्या गोष्टी'. संस्कृतवरून काढलेल्या पुष्कळ व्युत्पत्ती श्रद्धेच्या गोष्टी आहेत. दक्षिणी भाषांवरून आपल्याला उघड व्युत्पत्ती मिळू शकतात.

१.८ ध्वनिकाची मुळाक्षरे

व्युत्पत्तीच्या ध्वनिकाचा फेरविचार करायचा तर मुळाक्षरांपासून सुरुवात केली पाहिजे. संस्कृत वर्णमाला फार थोड्या फरकांनी मराठी लेखनासाठी वापरात असल्यामुळे आणि तिच्यात बहुतेक सर्व ध्वनींना वेगवेळी वर्णचिन्हे असल्यामुळे वर्ण आणि त्यांचे संस्कृत ध्वनी यांची एकरूपता आपल्या मनात ठसलेली असते. उदाहरणार्थ क या लिखित वर्णाचा उच्चार ग होणे हे आपल्याला असंभाव्य वाटते. इंग्रजीतले एका लिखित वर्णांचे विविध उच्चार किंवा बंगालीतली 'रवीन्द्र' लिहून 'रोबीन्द्र' उच्चारण्याची पद्धत यांचा परिचय आपल्याला असतो त्यामुळे असे प्रकार असंभाव्य वाटू नयेत. 'क' चा उच्चार 'ग' होणे किंवा । ग । या उच्चारासाठी क या वर्णाचा प्रयोग होणे या तुल्य गोष्टी आहेत. त्यातली दुसरी मानली तर तमिळसारख्या भाषांमधल्या लिखित शब्दांचे ध्वनिमूल्य नेमके कळू शकते. शब्द म्हणजे ध्वनी असे असल्याने, भाषेचे खरे स्वरूप कळण्यासाठी हे फार जरूरीचे आहे. दक्षिणी भाषांमध्ये मराठी शब्दांच्या व्युत्पत्ती शोधण्यासाठी त्यांच्या मुळाक्षराचे ज्ञान आवश्यक आहे, कारण ती आपल्या नव्या ध्वनिकाची मुळाक्षरे होत.

कालभेदी व्युत्पत्तीसाठी दोन भाषांमधली शक्य तितकी पुरातन रूपे घेतली पाहिजेत. दक्षिणी भाषांपैकी तमिळचे वाङ्मय सगळ्यात पुरातन आहे. तिच्या तोल्-काप्पियमला आदिग्रंथाचा मान आहे. त्यातला वर्णविचार आपण या ध्वनिकासाठी माहीत करून घ्यायला हवा. या दृष्टीने त्यातल्या 'एळुत्तु' (= वर्ण) या 'अधिकार' मधील पहिल्या काही 'चूत्तिरम्' (सूत्रां) चा अनुवाद खाली दिला आहे. अनुवाद इंग्रजी अनुवादाच्या आधाराने पण मुळावरून केला आहे. सबंध तोल्काप्पियम्चा यथामूल प्रमाण अनुवाद होणे मराठीच्या भाषिकासाठी अवश्य आणि महत्त्वाचे आहे. येथे आपल्या विषयापुरती वानगी मात्र दिली आहे. तमिळची लिपी नागरीप्रमाणेच

ब्राह्मी लिपीशी निगडित असल्यामुळे पुष्कळ वर्णांच्या लेखनात साम्ये दिसतात. शिवाय लिखित वर्णांचे किमान एकएक ध्वनिमूल्य दोन्हीकडे सारखेच आहे. त्यामुळे तमिळ वर्ण आपल्या लिपीत लिहिण्याने किंवा लिहिण्यात काही अडचण येत नाही. अतिऱ्हस्व इ आणि उ, आपल्या विसर्गासारखे पण तीन पोकळ बिंदूंनी दाखवले जाणारे 'आयुतम्', दीर्घ ए आणि ओ, ट ळ आणि न ही तीन दन्तमूल व्यंजने एवढीच तमिळमध्ये जास्त आहेत. व्यंजन अकाराच्या संयोगाने पूर्णोच्चारी होणे मराठीसारखेच आहे. पण व्यंजनान्त -शब्दांचे अस्तित्व तमिळमध्ये टिकून असल्याने शब्दांतीची व्यंजने 'पाय मोडून' लिहिणे जरूर आहे. हे 'पाय मोडणे' तमिळ लिपीत व्यंजनावर 'पुळ्ळि' म्हणजे बिंदू देऊन दाखवतात.

वर्ण अधिकार (एळुत्तु अतिकारम्)

ग्रंथरीती

१. वर्ण म्हणतात ते, अपासून न पर्यंत तीस सांगतात; इतरांना जोडूनच येणारे तीन वगळून.

२. ते तीन म्हणजे आखूड इ, आखूड उ, आणि तीन बिंदूंनी दाखवला जाणारा विसर्ग, वर्णांसारखेच आहेत.

३. त्यांतले अ इ उ ए ओ हे पाच, एक मात्तिरै (मात्रा) उच्चार असलेले, ऱ्हस्ववर्ण म्हणतात.

४. आ ई ऊ एऽ ऐ ओऽ औ हे सात, दोन मात्रा उच्चार असलेले, दीर्घवर्ण म्हणतात.

५. तीन मात्रा उच्चार असलेला एकही वर्ण नाही.

६. प्लुती पाहिजे असल्यास त्या मात्रेचा ध्वनी त्यात मिळवावा असे पंडित म्हणतात. [उदा० आअ.]

७. पापणी लवण्याचा वा चुटकीचा काळ, ती मात्रा : शास्त्राच्या जाणत्यांचे हे सांगणे आहे.

८. औ-कारान्त बारा वर्णांना उयिर् [स्वर, आत्मा] म्हणतात.

९. न-कारान्त अठरा वर्णांना मेय् [व्यंजन, देह] म्हणतात.

१०. व्यंजनांना जोडल्यामुळे स्वरांचे स्वरूप बदलत नाही.

११. व्यंजनाची मात्रा अर्धी असे सांगतात.

१२. वगळलेले तीन त्याच स्वरूपाचे असतात. [सूत्र २ मधील. उदा० केऽणू-मिया, नाकु, एःकु]

१३. दुसऱ्या व्यंजनाबरोबर उच्चारलेल्या म काराची अर्धी मात्रा पाव होते. बारकाईने पाहिल्यास हे विरळ असते. [उदा० पोऽन्म्]

१४. अक्षरा-आत बिंदू हे त्याचे [म् चे] लिखित रूप.

१५. बिंदूसहित असणे हे व्यंजनाचे स्वरूप होय. [आपण नागरी लिपीत व्यंजनाचा पाय मोडतो, तमिळमध्ये त्याच्यावर बिंदू देतात.]

१६. ए ओ यांचे स्वरूपही असेच. [यांच्यावर बिंदू देणे सध्या रूढ नाही.]

१७. बिंदू न दिलेली लिखित व्यंजने, त्यांचा अकारयुक्त ध्वनी दाखवतात. इतर स्वर जोडल्यावर त्यांचे रूप बदलते. स्वर जोडण्याचे हे दोन प्रकार आहेत. [मराठीप्रमाणेच.]

१८. व्यंजनाच्या ध्वनीनंतर स्वराचे स्थान असते.

१९. कठोर वर्ण म्हणतात ते क च ट त प ऱ

२०. मऊ वर्ण म्हणतात ते ङ ञ ण न म ऩ

२१. मध्यम वर्ण म्हणतात ते य र ल व ळ ऴ

२२. या तीन षट्कांची [अठरा वर्णांची] प्रचलित रूपे दोन प्रकारची दिसून येतात : अन्य व्यंजनांशी संयोग आणि द्विरूप.

२३. ट् ऱ् ल् ळ् यांच्यापुढे क च प येणे प्रशस्त आहे.

२४. त्यापैकी ल् ळ्, यांच्यानंतर य व येऊ शकतात.

२५. ङ् ञ् ण् न् म् ऩ् यांच्यानंतर त्यांच्याशी संगत कठोर वर्ण [क च ट त प ऱ] येतात.

२६. त्यापैकी ण् न यांच्यानंतर क च ञ प म य व हे सात येणे प्रशस्त आहे.

२७. ञ् न् म् व् यांच्यानंतर य येणे अप्रशस्त नाही.

२८. म् नंतर व सुद्धा येऊ शकतो.

२९. य् र् ऴ् यांच्यानंतर, शब्दाच्या आद्याक्षरी येणारे वर्ण आणि ङ ही येऊ शकतात.

३०. व्यंजनांची स्थिती पाहता, र् ल् सोडून चारी द्वित्त होऊ शकतात.

३१. अ इ उ हे तीन, दर्शक सर्वनामेही आहेत.

३२. आ ए ओ हे तीन, प्रश्नार्थक आहेत.

३३. पंडितांच्या मते, स्वर आणि व्यंजनाची मात्रा स्वर– आणि वाद्य-संगीताच्या ग्रंथानुसार, वाढू शकते.

शब्दरीती

४१. शब्दात ध्वनी कमी पडला तर दीर्घ स्वरानंतर संगत ऱ्हस्व स्वर येऊन प्लुती होते. [उदा० आअ ऊउ ओऽओ]

४२. ऐ औ या दोन वर्णांची प्लुती इ आणि उ यांनी होते. [उदा० ऐइ, औउ.]

४३. सात दीर्घ स्वरच, एकाक्षरी शब्दही असतात. [त्यांना स्वतंत्र अर्थ असतो.]

४४. पाच ऱ्हस्व स्वर मात्र, शब्द म्हणून येत नाहीत.

५३. पंडित सांगतात ,की, वर्ण शब्दात उच्चारला काय स्वतंत्र उच्चारला काय, त्याचे स्वरूप बदलत नाही.

५४. अकार आणि इकार मिळून ऐकार होतो.

५५. अकार आणि उकार मिळून औकार होतो.

५६. अकारोचर य् मिळून ऐ हा दीर्घवर्ण होतो.

५८. इकार आणि य् कार शब्दांती विकल्पाने येतात.

६१. क त न प म ही पाच व्यंजने कोणत्याही स्वरासह आद्याक्षरी येतात.

६२. च काराचे तसेच आहे – अ ऐ औ या तीन स्वरांना सोडून. [च चै चौ हे आद्याक्षरी येत नाहीत.]

६३. उ ऊ ओ ओऽ या चार स्वरांनी युक्त व शब्दारंभी येत नाही.

६४. आ ए ओ या तीन स्वरांनी युक्त ञ शब्दारंभी प्रशस्त होय.

६५. आ–युक्त नसल्यास, य शब्दारंभी येत नाही.

६९. औ-खेरीज स्वर शब्दान्ती येतात.

७०. क आणि व ला जोडून औ ही येऊ शकतो.

७१. ए हा स्वर व्यंजनाला जोडून शब्दान्ती येत नाही.

७२. ओ तसाच; न चा अपवाद करून. [नो शब्दांती चालेल.]

७८. ञ ण् न् म् न् य् र् ल् व् ळ् ऴ् हे अकाराच शब्दांती येतात.

८९, ९०, ९१. [या सूत्रांमध्ये क ङ, च ञ, ट ण यांची उच्चारस्थाने दिली आहेत.]

९२. हे सहा वर्ण तीन वेगळ्या प्रकारांनी उच्चारतात.

[या सूत्रात जिभेचे मूळ, अग्र आणि मध्य यांचा निर्देश आहे असे मानून 'त्याची गरज नाही सबब ते प्रक्षिप्त असेल' अशी टीप इंग्रजी अनुवादात आहे.]

९४. उचललेले जिभेचे टोक टाळूवर आघात करते तेव्हा ऱ आणि ऩ हे दोन वर्णध्वनी उत्पन्न होतात.

९५. जिभेचे टोक उचलून टाळूला घासल्यावर र कार आणि ऴ कार हे दोन उद्भवतात.

९६. जिभेच्या बाजू फुगून दातांच्या जवळच्या स्थानाला जेव्हा अशा स्पर्शतात की तिचे टाळूवर अनुक्रमे स्पर्श आणि घर्षण होते तेव्हा ल आणि ळ हे उद्भवतात.

१.९ तमिळ-मराठीची संगती

आपल्या विषयाला निकडीची अशी सूत्रे वर दिली आहेत. तमिळ आणि मराठी ध्वनिकात तसा फार फरक नाही हे त्यांवरून दिसून येईल. खुद्द तोल्काप्पियाच्या १०२–१०३ या सूत्रांत म्हटले आहे की 'नाभीपासून निघणारा श्वास वर्णरूपाने बाहेर येईपर्यंत काय काय क्रिया होतात ते विप्रांच्या गुपित शास्त्रात (अन्तनर् मरैचे) सांगितले आहे. त्याचा मी येथे विचार करीत नाही. वायू बाहेर आल्यावर ध्वनींच्या मात्रा आणि अर्थ काय ते मी निवेदिले आहे.' संस्कृत आणि तमिळ ध्वनिकाचाही असा मेळ आद्य तमिळांनीच घालून ठेवला आहे. त्यामुळे मराठी–तमिळ शब्दांची आणि वर्णांची संगती सहज लागत जाते. तरीही तमिळचे काही विशेष आहेत त्यांचा थोडक्यात विचार करू.

स्वरसंख्या बारा आहे; बाराखडी या आपल्या संज्ञेशी जुळती दिसते. तीन अति ऱ्हस्व स्वर आहेत. व्यंजने अठराच आहेत; त्यांचे वर्गही वेगळ्या तत्त्वावर केलेले आहेत. ऱ ऩ ऴ या तीन दंतमूल वर्णांचे विशेष महत्त्व त्यांच्या वेगळेपणामुळे आहे. त्यांची संगती अनुक्रमे मराठीतल्या ऱ्ह ऩ्ह आणि ऴ्ह या ध्वनींशी लागते आणि या तिघांतल्या महाप्राणाचे मराठी शब्दांत पुष्कळदा वर्णांतरही होते. याची उदाहरणे

पूर्वोक्त इंग्रजी निबंधात आहेत. ट ण हे वर्ण तमिळमध्ये शब्दारंभी येत नाहीत. मराठी ट ठ ड ढ ज्या शब्दांच्या आरंभी येतात त्यांची संगती त ने आरंभ होणाऱ्या तमिळ शब्दांमध्ये लागते. य र ल तमिळ शब्दारंभी येऊ नयेत म्हणून इ किंवा उ ची आधीच मिळवणी करतात. म्हणून य र ल यांनी सुरू होणाऱ्या मराठी शब्दांची संगती इ उ ने सुरू होणाऱ्या आणि य र ल हे द्वितीय स्थानी असलेल्या तमिळ शब्दांत शोधता येते. तमिळेत.शब्दाच्या शेवटी व्यंजने येतात; प्राकृत, अपभ्रंश, मराठी या सर्वांनी व्यंजनान्तांचा त्याग केला आहे. या बाबतीतही मराठीची संगती संस्कृतसारखीच तमिळशी लागते. तमिळ शब्दांमध्ये द्वित्त वर्णांचे प्राबल्य आहे. संगत मराठी शब्दांत कठोर महाप्राण किंवा मृदु (घोष किंवा अघोष) वर्ण त्यांच्या जागी दिसतात. दोन स्वरांमधल्या कठोर वर्णाचा तमिळ उच्चारांत घोष वर्ण होतो तो मराठीत तसाच दिसून येतो. तमिळमध्ये शेवटी एकार नसतो आणि मराठीत असतो याचे कारण लोकभाषा सोयीनुसार बरेच बदल करतात हे आहे. एकंदरीने पाहता, इतक्या अगणित तमिळ-मराठी शब्दांचे अर्थध्वनी दृष्टीने साम्य आहे की, तमिळ-मराठी-संगतीचे ध्वनिक वसवणे फार कठीण नाही आणि त्यासंगी मार्मिक त्याचे विगम सहज बसवू शकतील.

दक्षिणी भाषांपैकी कन्नडमध्ये ह या महाप्राण वर्णाला आणि ध्वनीला स्थान आहे. तमिळमध्ये या वर्णाला चिन्ह नाही; उच्चारणात त्याचा अस्प असा भास होत असतो. सामान्यतः क या लिखित वर्णाने ह चा ध्वनी दर्शविला जातो. मराठीत या वर्णाला आणि ध्वनीला पक्के स्थान आहे. तमिळ-मराठी संगतीच्या संबंधात ह चा विचार जरूर ठरतो.

पैकी शब्दाच्या अंतर्भागी येणाऱ्या ह ची संगती र न ल या दन्तमूलांच्या अस्तित्वाशी तसेच वर्णांतरणाने उद्‌भवणाऱ्या महाप्राणाशी लावता येते. शब्दारंभीचा ह स्वरयुक्तच असतो. तोही याच प्रकारांनी येऊ शकतो. शिवाय मराठी बोलणारांची लकब म्हणून आद्यस्वरात ह पुष्कळ ठिकाणी आलेला दिसतो.

संस्कृताधार ध्वनिकातही ही क्रिया मान्य केलेली आहे. अपभ्रंशात व्यंजनध्वनींचा लोप करून त्यांच्या जागी स्वर घालण्याची प्रवृत्ती अतिरेकाला गेली होती, अपभ्रंशातील अशा शब्दांमध्ये महाप्राण घालून मराठीने ते उच्चार ठसठशीत केले असे तुळपुळे यांनी सांगितले आहे. तोच न्याय तमिळ शब्दांना लावता येतो. किंबहुना हा न्याय लक्षात घेतला तर अपभ्रंशाच्या बांधणीचे मूळ कारणही आपल्याला उमगते; देशीतले किंवा अपभ्रंशातले शब्द मुळात दक्षिणी असले पाहिजेत हा सारांश निघतो.

वरील सर्व विवेचनाची सिद्धता म्हणून, मांडलेल्या प्रमेयांचा मस्तुपाठ म्हणून (१) आणि (२) या संदर्भग्रंथातील व्युत्पत्तिकोशातल्या अकारादि शब्दांच्या दक्षिणी भाषाधारित व्युत्पत्ती शेवटी दिल्या आहेत.

इकारादि शब्दांच्याही दक्षिणीवर आधारलेल्या व्युत्पत्ती तेथे दिल्या आहेत. एकापरीने कोशाच्या या दोन थडींच्या व्युत्पत्तींना दक्षिणी आधार देऊन सगळ्याच शब्दभांडाराचे हे स्पष्टीकरण पुढे मांडले आहे. पण व्यापक विचाराने निरखणाचे वावर वाढवणे या उद्देशानुसार इतरही अंगांनी आपली मानीवे तपाशीत राहिले पाहिजे. त्यासाठी भाषेतले मूलशब्द समजले जातात त्या संख्याशब्दांपैकी एकाच्या व्युत्पत्तीची पुढे छाननी केली आहे. ब्लोक यांनी केलेले विवेचनच त्यासाठी आधाराला घेतले आहे.

संस्कृतोद्भवतेचा आग्रह बाळगला नाही तर असे दिसेल की ध्वनी आणि अर्थ या दोन्ही अंगांनी या व्युत्पत्ती अधिक योग्य आहेत. दक्षिणी शब्दांच्या अर्थांची अधिक छाननी झाली, त्यांचे शब्दकोश आणखी धांडोळले गेले म्हणजे या व्युत्पत्ती कसाला लागतील, काही थोड्या कदाचित बदलाव्याही लागतील. तमिळची विशिष्ट घडण, काही शब्दांना असलेल्या अर्थांच्या असंख्य छटा, थोड्याशा स्वरबदलाने बदलणारे अर्थ, लिखित वर्णांना असलेली तीन-चार किंवा आणखीही ध्वनिमूल्ये यामुळे असे व्युत्पत्तींचे बदल असंभाव्य नाहीत. पण त्याबद्दल तक्रार किंवा खेद करण्याचे कारणच नाही. विज्ञानात अखेरचा शब्द नसतोच !

१.१० अकरावरून पुढे

संस्कृत एकादशवरून मराठी अकरा ही व्युत्पत्ती बहुतांशी ध्वनिकाच्या नियमांपेक्षा अपवादांवर आधारलेली आहे. या मराठी शब्दातल्या एकेका ध्वनीच्या उपपत्तीबाबत ब्लोक यांनी ज्या टिप्पणी केल्या आहेत त्या अशा : (जाड ठसा मुळात नाही.)

- ए आणि ओ यांच्या बाबतीत सामान्यतः लिपीवरून ह्या (ऱ्हस्वीकरणाचा) वरील प्रकार निदर्शनास येत नाही... अकरा (एकादश प्रा. एकारह) यांतील आद्यस्वर तर **अनिश्चित उच्चाराचा** आहेच पण त्यावरून ह्या ऱ्हस्वीकरणाच्या प्रकाराला **पुष्कळ जुन्या काळापासून** सुरुवात झाली असली पाहिजे हे सिद्ध होते. (१ ७९) **अपवादादाखल** अकरा (एकादश) ह्यामध्ये आद्य ए च्या जागी अ येतो. (१ ११२)
- ज्या शब्दांत जुन्या द्विस्वरांतर्गत दंत्याच्या जागी ल किंवा र येतात, ते शब्द मराठीला **सुतराम् परके** मानले पाहिजेत... **उलटपक्षी** अगदी वायव्य टोकाच्या आणि पूर्वेच्या भाषांत मुख्यत्वेकरून र ही विकृति येते ती दहाचा वाचक जो शब्द समासांत येतो त्यांत (उदा. अकरा बारा तेरा पंधरा सतरा अठरा) आणि सत्तर (सप्तति-) यांत सापडते. (१ १५७)

◻ शब्दमध्यभागीच्या र चें मूळ पुढीलप्रमाणें असतें :

> सं. द किंवा त, द्विस्वरांतर्गत वर्णाचा लोप होतो या सामान्य नियमाचें उल्लंघन करून; उदा. सं. दश ज्यांच्या अंतीं आहे असे कांहीं सामासिक शब्द आणि सत्तर (१ १८२)

म्हणजे एकादश मधल्या का खेरीज इतर ध्वनींची अकरा मधल्या ध्वनींशी नीट संगती लागत नाही. का – क या संगतीतही दीर्घ-ऱ्हस्वाचा बांधा आहेच. शिवाय द चा र मानून घेतला तरी श चा लोप स्पष्ट करण्यात आला नाही. संख्याशब्दांमध्ये हा श ही अपवादांचाच जनक आहे. ब्लोक सांगतात :

> आद्याक्षरीं किंवा द्विस्वरांतर्गत येणारा संस्कृतांतील ऊष्मवर्ण मराठींत सामान्यतः शिल्लक राहतो. विरुद्ध उदाहरणें विवाद्य तरी असतात किंवा त्यांचे निराकरण तरी करता येते... त्यापैकीं महत्त्वाचीं संख्यावाचक शब्दांतील आहेत. सं. दशन्‌च्या जागी सामान्यतः येणाऱ्या दस ह्या रूपाच्या जोडीनें दहा हें रूप सर्वांत अधिक वेळां येणारें... (१ २००)

या सर्व आपत्तीचे कारण विगमनापेक्षा निगमनावर विसंबून काढलेल्या व्युत्पत्ती हे होय. संस्कृत संख्याशब्द हेच मूळ असे धरून हे अपवाद गणलेले आहेत. इतके अपवाद असलेल्या मूळ नियमाबद्दलच खरोखर शंका घ्यावयास हवी. त्याचमुळे अखेरीस ब्लोक यांनी, तसे स्पष्ट शब्दात म्हटले नसले तरी मराठी संख्याशब्दांचा संस्कृत आधार उडवूनच लावला आहे. कारण वरील उद्धृताच्या पुढेच ते म्हणतात :

> द्विस्वरांतर्गत उष्म्यांत ही जी विकृति दिसून येते ती निव्वळ मराठीच्या दृष्टीनें संख्यावाचक शब्दांकडे पाहता ज्या अनेक अपवादात्मक गोष्टी दिसून येतात त्यांपैकीं एक आहे. आधुनिक लोकभाषांना स्थिररूप प्राप्त होण्याच्या पूर्वी त्यांच्या मातृभाषांत प्रचलित असलेले संख्या वाचक शब्दच त्यांच्यात येणार हें उघड आहे. त्यामुळे वर जीं अपवादात्मक स्थळें दाखविलीं तीं मराठीच्या सर्व सजातीय भाषांत आढळतात. (१ २००)

'सर्व सजातीय भाषांत आढळणाऱ्या' रूपांना वास्तविक नियम म्हणावे, अपवाद म्हणू नये! आणि 'त्यांच्या मातृभाषांत प्रचलित' असलेल्या रूपांचा शोध घ्यावा. पण असा शोध घेताना संख्याशब्दांविषयीचे अबाध्य वाटणारे नियम सैल करावे लागतील. उदाहरणार्थ, एकवीस ते अठ्ठावीस हे मराठी किंवा एकादश ते अष्टादश हे संस्कृत शब्द ज्या तर्कशुद्ध पद्धतीने बनलेले आहेत ती अकरा ते अठरा यांना लागू पडेल असे नाही. प्रत्येक संख्याशब्दाचे मूळ कदाचित वेगळ्या संकल्पनेत असेल.

'या लोकभाषांच्या मातृभाषा' दक्षिणी होत्या हे ही सामान्यतः मान्य असल्या-मुळे त्यांच्यात असा शोध घेता येईल. ध्वनिशास्त्रावरून पुढील शब्दबीजे तपासाला घेता येतात.

द ६५६ (कोटा) 'एक्म'	मोजणे हिशेब. गणती.
एक्द् –	मोजणे. (क्रियापद)
(मलैयाळम्) अक्कम्	अंक.
द ६५२ (तमिळ) एक्कु	(कापूस वगैरे) बोटाने वळणे.
द ६५३ ,, एःकु	चढणे, वर जाणे,
(तेलुगु) एक्कु	अधिक होणे.
द ६५७ तमिळ एक्कर् एक्कल्	ढीग (किनाऱ्यावर वाळूचा वगैरे)

यांचा संबंध प्राकृत एकारह यांच्याशी लागू शकेल. अंक, मोजणे, बोटे, अधिक होणे या सर्वांचा त्यात हातभार असावा. आदिम जातींचे अंकगणित (आपलेही आदिम अंकगणित) हाताच्या बोटांवर असल्यामुळे दहाच्या वरचा, अधिक झालेला आकडा अशा ध्वनीने ओळखला जाणे असंभाव्य नाही.

अकरा ते अठरा या शब्दांमधल्या अंत्य रा ची उपपत्ती आणखी एका प्रकारे लागू शकते.

द १७५ अरि	कापणे.
अरिवि	कापलेल्या धान्याची मूठ.
द १७६ अरि	वेचणे, लहान आणि मोठ्या वस्तू वेगळ्या करणे.

यातल्या अन्त्य र–मुळे दहाची 'मूठ' वेगळी धरण्याच्या संकल्पनेचा बोध होऊ शकतो. मग अकरा = अक्क + रा (= दहा), अठरा = एट्ट–अट्ट + रा अशी संगती लागते.

अंगुळ, अंगठा यांसारख्या शब्दांच्या संस्कृताधार व्युत्पत्तींबद्दल ब्लोकसारख्या भाषिकांना शंकाच नव्हती. अघाडा च्या विषयात थोडीफार होती, अकरा च्या बाबतीत ती ठाम झाली. तिन्ही संदर्भांत, ध्वनिकाबरोबर भाषिकाच्या इतरही अंगांचा विचार करता, दक्षिणी लोकभाषांतल्या आधाराने अधिक चांगल्या उपपत्ती लागतात हे आपण पाहिले. लोक, भाषा या तत्त्वांचा आणखी विचार आणि प्रयोग पुढल्या प्रकरणी.

* * *

२. लोक, भाषा

२.१ भाषा लोकांची

भाषेचा मुख्य आधार ध्वनी आहे आणि तो लोकांच्या मुखांनी प्रकट होत असतो त्यामुळे भाषा ही लोकांची असते. या एरवी साध्या भासणाऱ्या तत्त्वाचे परिणाम फार दूरगामी होतात. भाषेतले शब्द, त्यांचे अर्थ या सर्वांवर एकट्या दुकट्या व्यक्तीची किंवा गटांची हुकमत नसून ती ' लोक ' या सामान्य संज्ञेने ओळखल्या जाणाऱ्या समूहाची असते. पतंजलीने ही गोष्ट मार्मिकपणे सांगितली आहे :

> शब्द, अर्थ, संबंध हे सिद्धच आहेत हे कशावरून कळते ? लोकांवरून, जगावरून; लोकतः । कारण लोक थोडा थोडा अर्थ धरून शब्दप्रयोग करतात, शब्द बनवण्याचा प्रयत्न करीत नाहीत. कामाच्या गोष्टी बनवण्याचा मात्र प्रयत्न होतो. जसे घटाचा उपयोग करू पाहणारा कुंभारवाड्यात जाऊन म्हणतो, 'घट बनव. मला त्याचे काम आहे' त्याप्रमाणे शब्दांचा प्रयोग करू पाहणारा काही वैयाकरणाच्या घरी जाऊन म्हणत नाही की, ' शब्द बनव, मी प्रयोग करीन. ' तसाच अर्थाचा विचार करून शब्दांचा प्रयोग करतो.

लोकांत अर्थाला धरून शब्दप्रयोग होतो त्याचा धर्मनियम शास्त्राने होतो. प्रमाण-भाषा म्हणतात तिच्यात असा धर्मनियम झालेला असतो. मग उलट दिशेने लोकांत जे शब्द प्रचारात असतात त्यांचे वर्णन करताना ' अपशब्द ' ' अपभ्रंश ' असे प्रयोग होतात. पतंजलीने म्हटले आहे :

> अपशब्द फार, शब्द थोडे ! एकेका शब्दाचे अपभ्रंश बहुत. जसे गौः या शब्दाचे गावी गोणी गोता गोपोतलिका इत्यादी अपभ्रंश आहेत.

यात ' शब्द मूळ की अपशब्द मूळ ? ' असा प्रश्न उभा राहतो. ' ध्वनी म्हणजे शब्द ' हे मान्य केले, शब्दाचा आधार लोकांत असला, तर मग ' अपशब्द ' हाच मूळ शब्द हे ध्यानात येते. शब्द आणि अपशब्द या केवळ भेदक संज्ञा धराव्यात त्यांच्यात गुणक्रम लावू नये म्हणजे अडचण उरत नाही.

भारतीय भाषिकातला आद्य पुरावा ' शास्त्राने केलेले धर्मनियम ' जिच्यात विशेष प्रबळ आहेत अशा संस्कृत भाषेतला, विशेषतः लेखबद्ध. मराठीसारख्या लोकभाषेतल्या शब्दांशी संस्कृत शब्दांचा मेळ घातला जातो तेव्हा पुन्हा ' अपशब्दां 'चा अर्थात प्रत्यक्ष लोकांत प्रचलित असलेल्या शब्दांचा विचार होत नाही; प्रमाणभाषेतल्या शब्द-रूपाचांच बहुधा होतो. भारताच्या भाषिक सर्वेक्षणात बोलींचाही समावेश होता पण

तो पुरेसा नव्हता अशी भाषिकांचीच मते आहेत. ध्वनिकाला खरोखरी बोली शब्दांचे जास्त अगत्य असते. ज्यांचा जीवनव्यवहार पिढ्यान्‌पिढ्या फक्त बोलीभाषेवर आधारलेला आहे अशा लोकांत प्रचलित शब्द प्रमाण किंवा लिखित स्थिर रूपांच्या भाषेने तेवढे प्रभावित नसतात. म्हणून 'कालवशाने' किंवा बदल होणे एवढ्याच प्रकृतिधर्मामुळे जे ध्वनिबदल होतात ते त्यांच्या भाषेत अधिक विश्वसनीय असे पहावयास मिळतील.

हे सारे भाषेच्या एककाल अभ्यासाला उपयोगी असले तरी कालभेदी अभ्यासाला त्याचा उपयोग काय अशी शंका येईल. संस्कृत ही प्राचीन भाषा आता लोकभाषा नसल्यामुळे तिचे प्रमाणरूप आणि बोली रूप यांचा ती बोलण्यांपुरतासुद्धा मेळ आपल्याला बसवता येणार नाही. तिच्यासारखीच प्राचीन तमिळ मात्र अजूनही बोलभाषा आहे. तिच्यातल्या प्रमाण आणि बोली रूपांची तुलना होऊ शकते. आज ज्या प्रकारची संगती या रूपांमध्ये लागते तशीच ती प्राचीन काळी असेल असे म्हणता येणार नाही; प्राचीन प्रमाण रूप आणि आजचे बोली रूप यांचा तसा संबंध ठामपणे सांगणे आणखीच दूर. तरीपण, या दिशेने कल्पना करण्यात मदत व्हावी म्हणून तरी अशा संगती जुळणे जरूर आहे.

प्रमाण भाषेतील शब्दांच्या आधाराने दक्षिणी – मराठी संबंध आपण गेल्या प्रकरणात लावला. आता बोलीभाषेतील शब्दांवरून त्याची तपासणी करायची आहे. याचा उपोद्घात 'भाषा मूळ अडाण्यांची' या निबंधात झालेला आहे. ग्रामीण जीवनात, विशेषतः शेतीव्यवसायात जे अनेक खास शब्द बोलभाषेत प्रचलित आहेत, त्यांचा मागोवा घेऊन पाहिल्यास तमिळ प्रमाणभाषेतल्या शब्दांशी यांची संगती लागते. या प्रमेयाची चिकित्सा आणखी पुढे करायची आहे.

अशा एखाद्या व्यवसायातले शब्द, प्रमाणभाषेच्या ग्रंथबद्ध कोशात कोशकार घालतात तेव्हा, प्रमाणभाषेच्या धाटणीची त्यांची जी कल्पना असते तिच्यानुसार ते त्या शब्दांवर काही संस्कार करतात. त्या संस्कारांना एक व्यत्यासी आधार असतो. म्हणजे असे की सामान्यतः कोशगत शब्दांचे बोलभाषेत जे बदल होतात त्यांच्यावरून हे संस्कार केलेले असतात. ओळख या कोशगत शब्दाचा बोली उच्चार वळख असा होतो हे पाहिल्यावर बोलीतल्या वळीची कोशात ओळ होते, इठुबा चा विठोबा होतो वगैरे. कोशगत शब्दांच्या ध्वनिकावरून बसवलेली व्युत्पत्ती अशा रीतीने खऱ्या म्हणजे बोलीभाषेच्या ध्वनिकापासून खरोखर दूरच गेलेली असते. याचा अर्थ असा की भाषिकाच्या मान्य तत्त्वांनुसारसुद्धा किंवा त्या तत्त्वांनुसारच, ध्वनिकाची प्रयोजना बोलीरूपांवर करायला हवी. तसे केल्यावर जर बोलीरूपांची संगती तमिळ शब्दांशी लागत असेल तर मराठीचे मूळ निरखण्याच्या बाबतीत तमिळची मर पडणे न्यायाचे होते.

प्रमाण रूपे, बोली रूपे, प्राचीन रूपे ही मराठी आणि तमिळ या दोन्ही भाषांतली घेतली तर एकूण सहा प्रकारची रूपे होतात. त्यांचे परस्परसंबंध अनेक तऱ्हांचे असू

शकतील. उदाहरणार्थ, कालवशाने एकाद्या संकल्पनेविषयीचा तथ्याचा प्रमाण तमिळ शब्द प्राचीन प्रमाणशब्दाहून निराळा झाला असेल. त्याचा प्राचीन मराठी प्रमाण-शब्दाशी संबंध लागणार नाही. पण प्राचीन तमिळ प्रमाण शब्दाचा प्राचीन मराठी शब्दाशी लागू शकेल. प्राचीन मराठी प्रमाण शब्द आजच्या प्रमाण भाषेपेक्षा आजच्या बोली भाषेत थोड्या फरकाने टिकून राहण्याची शक्यता अधिक. म्हणून त्या दोन रूपांचा मेळ लागेल पण आजचा मराठी प्रमाण शब्द निराळा असला तर त्याच्याशी आजच्या बोली शब्दाचा तेवढा लागणार नाही. मराठी शब्दांच्या व्युत्पत्ती पडताळून पाहण्यासाठी या विविध संबंधांचा मंगतवार विचार करावा लागेल.-

२.२ तमिळ प्रमाणरूपे, बोलीरूपे

तमिळ शब्दांची प्रमाणरूपे आणि त्यांची बोलीरूपे यांचा तुलनाभ्यास पहिल्यांदा डॉ. आर पी सेतु पिळ्ळै यांनी केली. त्यांनी निगमनाने काढलेले अनेक नियम [विगम] ‘ तमिळ– ग्रांथिक आणि बोली ’ या निबंधात (सेतुपिळ्ळै १९५३ ११) उदाहरणांसह दिले आहेत. ते खाली अनुवादले आहेत. उदाहरणे मात्र प्रत्येकी एक किंवा दोनच घेतली आहेत. त्यांमध्ये प्रथम लिखित रूप, मग त्याचा उच्चार आणि नंतर बोली उच्चार दिले आहेत. मराठी अर्थही संदर्भासाठी दिले आहेत. सगळ्यात शेवटी ठळक टाइपात तमिळ शब्दाशी जुळणारे मराठी प्रमाण किंवा बोली शब्द आहेत.

१. आद्य अक्षरध्वनीतल्या अ चा, पुढल्या ध्वनीत आ असल्यास, इ होतो.

कडा कडा : किडा खोंड, जनावरातला नर **कड्या**
कना कना : किना स्वप्न

२. विशेषतः ऋणशब्दांमध्ये, आद्य अक्षरध्वनीतल्या अ चा ए होतो.

सं. गङ्गा : कङ्गै केङ्गै

३. मधला अ, पुढल्या ध्वनीत इ असल्यास, इ होतो.

पूसनि पूसनि : पूचिनि भोपळा.

४. मधला अ, पुढल्या ध्वनीत उ असल्यास, उ होतो.

परम्बु परम्बु : परुम्बु डोंगर, टेकडी **बरंबा**

५. एकाक्षरी शब्दातल्या आ पुढे स्पष्टतेसाठी उ येतो. मध्ये व् शिरकावतो.

का का : कावु काठी कावडीची. **काठी, कावड**
ना ना : नावु जीभ

६. दोनअक्षरी शब्दातल्या अंत्य आ पुढे ळ (ळु) लागताना आ ऱ्हस्व होतो.

निला निळा : निल्ळु चंद्र
पुरा पुरा : पुरवु कबूतर पारवा

७. आद्य इ च्या पुढील अक्षरात इ उ खेरीज दुसरा स्वर आल्यास, इ चा बहुधा ए होतो.

इलै इलै : एलै पान नागपलीचे पान
इरवल् इरवल् : एरवल् भीक मागणे. रवळनाथ

८. आद्य अक्षरातील इ, पुढच्या अक्षरात इ ऊ खेरीज स्वर असल्यास, बहुधा ए होतो.

किळङ्कु किळङ्गु : केळङ्गु कंद
विरल् विरल् : वेरल् बोट विरळ

९. आद्य ओष्ठवर्गातला इ, पुढे इ उ किंवा ट वर्गातला वर्ण असल्यास, कधीकधी उ होतो.

पिळि पिळि : पुळि पिळणे. पिळणे
पिल्लै पिल्लै : पुल्लै पिल्लू पिल्लू

१०. आद्य ओष्ठवर्गातला इ, पुढे अ ऐ असल्यास, कधीकधी ओ होतो.

पिटरि पिडरि : पोडरि मानगूट
मिलकु मिलकु: मोलकु काळे मिरे मिरे

११. मधला इ बहुधा अ किंवा उ होतो.

कयिरु कयिरु : कयरु दोरी [इंग्रजी कॉइर चे मूळ]
कट्टिडम् कट्टिडम्: कट्टडम् बांधकाम, इमारत कठडा

१२. मधला इ, नंतरच्या अक्षरात उ असल्यास, उ होतो.

सेविडु सेविडु : सेवुडु बहिरा (आडनाव) शेवडे ?

१३. आद्य उ, नंतरच्या अक्षरात इ उ खेरीज स्वर असल्यास, बहुधा ओ होतो. हा उ दर्शक नामातला नसला पाहिजे.

उडल् उडल् : ओडल् शरीर
उरै उरै : ओरै घट्ट होणे. होरणे, होरट

१४. आद्य अक्षरातला उ, नंतरच्या अक्षरात इ उ खेरीज स्वर असल्यास, बहुधा ओ होतो.

कुटै कुडै : कोडै टोपली, छत्री कुडव कुडुका
तुवरै तुवरै : तोवरै तूर. तूर

१५. एन् [मी] उन् [तू] या सर्वनाम सामान्यरूपांमधला आद्य स्वर, त्यांच्या चतुर्थीच्या रूपांत पुढच्या वर्णावर सरकतो.

एनक्कु एनक्कु : नेक्कु मला ? न देखे=नेदखे
उनक्कु उनक्कु : ओनक्कु नोक्कु तुला

हे सरकणे कदाचित तेलुगूच्या प्रभावाने आले असावे, तेलुगूतील स्वरादी तीन-ऱ्हस्व अक्षरी शब्दांत असे फार होते.

१६. आद्य ओष्ठ अक्षरातला उ कधी इ होतो.

पुलि पुलि : पिलि वाघ
पुरि पुरि : पिरि इच्छा पुरवणे

१७. मधला उ, अ किंवा इ होतो.

कळुनीर् कळुनीर् : कळनीर कळनि भाताचे तांदूळ धुतलेले पाणी गळवणी
अऱुप्पु अऱुप्पु : अरप्पु कापणी हरपणे

१८. अंत्य उ चा इ होतो.

मञ्चु मञ्जु : मञ्जि पांढरा ढग, धुके मंजुळ
पञ्चु पञ्जु : पञ्जि कापूस पंचा

१९. दोन अक्षरी शब्दात, पहिले अक्षर ऱ्हस्व असल्यास, अंत्य उ मध्ये स्पष्ट व्यंजन येते.

पुळु पुळु : पुळुवु किडा, अळी
मडु मडु : मडुवु गिळणे मट्ट करणे

२०. इ ऐ य् अंती असलेल्या नामांच्या चतुर्थीच्या प्रत्ययातला अन्त्य कु, कि होतो.

पल्लिक्कु पल्लिक्कु : पल्लिक्कि पळीला, वाडीला पल्ली
वाय्क्कु वाय्क्कु : वाय्क्कि तोंडाला वायफळ

२१. आद्य अक्षरातील ए कधी ओ किंवा इ होतो.

मेळुकु मेळुगु : मोळुगु शेणाने भुई सारवणे, पोरटी, पोट्टी
पेट्टै पेट्टै : पोट्टै मादी, बाई, मुलगी.

२२. मधला ए, अ होतो. (ह मर्चा.)

नडुप्पेर　नडुप्पेर : नडुप्पर　मधला भाग　? मधली
कालम्पेर　कालम्पेर : कालम्पर　योग्य काळी.

२३. आद्य ऐ, नंतर व्यंजन असल्यास, अ होतो.
ऐन्दु　ऐय्ञु : अय्ञु　पाच　अंजळी

मैत्तुनन्　मैत्तुनन् : मच्चिनन् मच्चान्　मेहुणा,

२४. मधला ऐ, अ होतो.

वलैवु वलैवु : वळवु　वर्तुळ, वाकडेपणा　वळवणे
कुदैन्दु कुदैन्दु : कुदन्दु　धनुष्याची दोरी खाचेत बांधणे　गोधा

२५. आद्य अक्षरातला ओ, पुढल्या अक्षरात उ पे असल्यास, उ होतो.

कोड्डु　कोडु : कुडु　देणे　कोड पुरवणे
तोट्टै　तोडै : तुडै　भोवती बांधणे (सुतळीचा) ——→ तोडा

२६. एकअक्षरी शब्दातील स्वर दीर्घ किंवा ऱ्हस्व असेल त्यानुसार म् खेरीज अन्त्य-व्यंजनाला किंवा त्याच्या द्वित्वरूपाला स्पष्टक स्वराची जोड मिळते.

काय्　काय् : कायि　कच्ची भाजी, कच्चे फळ.　कैरी
पाल्　पाल् : पालु　दूध　'वाळू'
पल्　पल् : पल्लु　दात
कण्　कण् : कण्णु　डोळा

२७. मधल्या अनुनासिकापुढे त्याच्या जुळता कठोर वर्ण नसल्यास, कठोर वर्णाशी जुळते अनुनासिक येते.

पुन्कु　पुन्कु : पुङ्गु　करंज, डंडी,　पुन्नाग
पुन्चेय्　पुन्चेय् : पुञ्जेय्　पुञ्जै　जिराईत, कोरडवाहू.

(स्थळनामात) ज

२८. मधले कंठव्यंजन बहुधा लोप पावते आणि मागील स्वर ऱ्हस्व असल्यास त्याची मात्रा वाढते.

मुकडु　मुकडु : मोकडु　मोऽडु　शिखर (जुनरवळ) मानमोडी
पकुति　पकुदि : पादि　भाग, वाटा　पाती

१९. मधला आणि अन्त्य क, व होतो.

पाकल् पाकल् : पावल् कारले
मकल् मकल् : मवल् मुलगी, स्त्री

१०. आद्य च शिक्षित वर्गात चवळजवळ स असा उच्चारला जातो.

चेयू चेयू : सेयू करणे. शेती
चमैयल् चमैयल् : समैयल् स्वयंपाक.

११. मधल्या ट चा कधी लोप होतो.

कोट्टुकि कोडुकि : कोकि आकडी. फोकाटी
मुटिन्तु मुडिन्तु : मुडिञ्चु मूञ्चु. (केसांची) गाठ बांधणे. मुंज

१२. अनुनासिकानंतरचा ट बहुधा उच्चारला जात नाही.

वेऽण्डुम् वेऽण्डुम् : वेऽणुम् हवे पाहिजे
कोण्डुवन्तु कोण्डुवन्दु : कोण्णुवन्तु, कोण्णाडु घेऊन.

१३. मागे इ ऐ असल्यास त्त, च होतो.

कळित्त कळित्त : कळिच्च गळलेले (केस वगैरे)
अमैत्त अमैत्त : अमैच्च संयत, स्थिर अमात्य

१४. मागे ऱ्हस्व स्वर असल्यास अंत्य त, च होतो
पेरितु पेरिदु : पेरिचु मोठे, महान.
मुऴुतु मुऴुदु : मुऴुचु सर्वथा, पूर्ण.

१५. मधला त्त कधी ट्ट होतो.

नकरत्तु नकरत्तु : नकट्टु ढकलीत नेणे.
तीवर्त्ति तीवर्त्ति : तीवट्टि दिवटी

१६. मागे इ ऐ य् असल्यास न्द, ञ्ज होतो.

इटिन्त इडिन्द : इडिञ्ज भग्न, कोसळलेले. ढिसाळ
कायन्त कायन्द : कायञ्ज, काञ्ज गरम, उकळलेले. कांजी

१७. आद्य मध्य अन्त्य ओष्ठ्यंजन, व होते. संस्कृतशब्दात हे विशेष घडते.
तपळै तपलै : तवलै पात्र विशेष तपेली, तवली
पापि पापि : पावि पापी.

३८. म, व होतो.

मीचै मीचै : वीचै मिशी

तामनि दामन्नि : दावनि गुरांना बांधण्याचा दोर. दावण

३९. र्र बहुधा त्त आणि क्वचित ट्ट होतो. (पहिला र अर्धा.)

ऊर्रु ऊर्रु : ऊत्तु उतू जाणे.
मार्रु मार्रु : मात्तु परिवर्तन.

४०. न्र बहुधा न्न (त्याचाच कधी ण्ण) आणि क्वचित ण्ट होतो. मागील स्वर दीर्घ असल्यास एक अनुनासिक लोप पावते.

ओन्रु ओन्रु : ओन्नु, ओण्णु, एक.
कन्रु कन्रु : कन्नु कण्णु खोंड वासरू. कान्हा

४१. र द्वित नसेल तेव्हा र सारखाच उच्चारतात. न्, उच्चारणात न पासून ओळखणे कठीण. हे प्रकार दक्षिणेकडे फार.

४२. अनेकअक्षरी शब्दातल्या अन्त्य मध्यमवर्णांचा (य र ल व ळ ल) लोप होतो.
तण्णीर तण्णीर् : तण्णि (थंड) पाणी.
मोक्कुल मोक्कुल् : मोक्कु (फुलाची) कळी. मोगरा

४३. मधले मध्यमवर्ण, पुढे कठोर वर्ण असल्यास, लोप पावतात.

आय्च्चि आय्च्चि : अच्चि, आई, आजी
पीर्क्कु पीर्क्कु : पिक्कु दोडका.

४४. आद्य या, आ होतो.

यानै यानै : आनै हत्ती
याण्डु याण्डु : आण्डु वर्ष

४५. मधला य, च होतो.

मुयल् मुयल् : मुचल् ससा
कयम् कयम् : कचम् तुरट कषाय

४६. मागे ऱ्हस्व स्वर असता, मधला य (स्वराचा स्पष्टक नसलेला) कधी गाळला जातो आणि ऱ्हस्व स्वराला दीर्घता येते.

पेयर्त्तु पेयर्त्तु : पेऽर्त्तु पेऽत्तु पुन्हा, परत फिरून

सेयृति सेयुति : चेऽति व्यवसाय शेती

४७. अनेकअक्षरी शब्दात अन्त्य य गाळला जातो आणि मागील स्वर, ऐ होतो.

कुडुवाय् कुडुवाय् : कुडुवै अरुंद तोंडाचे भांडे कुडुका
ननूसेय् नञ्जेय् : नञ्चै बागाईत (स्थळ नामात) ज

४८. मधला र, ल होतो.

कुरैत्तल् कुरैत्तल् : कुलत्तल भुंकणे गुरगुरणे
कुरवै कुरवै : कुलवै डोंगरी लोकांचा नाच गुरव

४९. मधला र कधी गाळला जातो.

उरुण्टै उरुण्टै : उण्डै गोळा उंडा
अलर्मेऽल् अलर्मेऽल् : अलमेऽल. फुलावरील (लक्ष्मी) अलमेलकर

५०. ळ, ल होतो.

कळै कळै : कलै कळा
एऽळा एऽळा : एऽला अग ए!

५१. आद्य आणि मधला व, म होतो.

विळित्तल् विळित्तल् : मिळित्तल् डोळे उघडणे
वेऽयृतल् वेऽयृतल् : मेऽयृतल् शाकारलेले घर

५२. मधला आणि अंत्य व, क होतो.

नावल् नावल् : नाकल् जांभूळ
पवळम् पवळम् : पकळम् पोवळे

५३. मागे ऱ्हस्व स्वर असल्यास मधला 'व' (स्वराचा स्पष्क नसलेला) गाळला जातो आणि मागच्या स्वराची मात्रा वाढते.

तवटै तवडै : ताडै गाल थाडी
सेवप्पु चेवप्पु : चेऽप्पु लाल रंग

५४. दक्षिण देशात ळ, ल सारखा उच्चारला जातो.

५५. ळ बहुधा गाळला जातो. त्याची भरपाई होतही नाही.

कुळन्तै कुळन्दै : कोळन्दै : कोऽन्दै मूल. गोडू
तोळुम्पन् तोळुम्बन् : तोम्बन् सेवक, क्षुद्र माणूस, दास डोंब्या

५६. काही शब्दात र घुसतो.

तोऽह्नि तोऽह्नि : तोर्ह्नि शाळुवाला
कोऽवै कोऽवै : कोऽर्वै गोफणे, तोंडल्याचा वेल

५७. घुसलेला ळ काही शब्दांत आढळतो.

तेऽवै तेऽवै : तेऽळ्वै गप्प
एन्पदु एन्पदु : एन्ळ्लदु अरे !

५८. म नंतर घुसलेला ओष्ठवर्ण काही शब्दांत दिसतो.

कुडुमि कुडुमि : कुडुम्बि नातेवाईक, कुटुंबीय
एळुमूर् एळुमूर् : एळुम्बूर 'एगमोर' [ग्रामनाम]

५९. श्रुतीसाठी कठोर वर्णाचे सानुनासिकत्व, सामान्य फीचर आहे.

अडु अडु : अण्डु योग्य असणे
तडि तडि : तण्डि छडी, काठी दण्ड

६०. श्रुतीसाठी जोडाक्षराचे द्विचाक्षर होते.

कळ्वन् कळ्वन् : कळ्ळन् चोर खल
चेल्वम् चेल्वम् : चेल्लम् धन

६१. उच्चार भेदन.

ओर्ट्टै ओर्ट्टै : ओट्टै कोळ्याचे बाळे
पर्ट्टै पर्ट्टै : पट्टै ऐरण फत्ताडी

६२. आद्य स्वराचा लोप.

उलात्तु उलात्तु : लात्तु फिरायला जाणे, नेणे
इरण्डु इरण्डु : रण्डु, रेण्डु दोन 'लॅंड'

६३. स्थानांतर.

कोप्पुलम् कोप्पुलम् : पोक्कलम् बेंबी गोकळ ?
पट्टाचु पट्टाचु : टप्पासु फटाका.

६४. द्विरुक्तीची एकोक्ती.

अवावल् अवावल् : आवल् हवेहवे वाटणे हाव
नुकक्काल् नुकक्काल् : नोक्काल् नोऽक्काल् नांगराची दांडी.

६५. ऋणशब्दातल्या आद्य ऊष्मवर्णाची नावड.

सं० हुडुक्क : उडुक्कु

या निरीक्षणांवरून काही ठळक तथ्ये निघतात. प्राकृत किंवा अपभ्रंश भाषांमध्ये जशी वर्णांतरे आढळतात तशी पुष्कळच तमिळमध्येही दिसतात. म्हणजे दोन्ही भाषाकुळांत ध्वनिक बदल सारख्याच प्रकारे घडत असतात. मागच्या प्रकरणात तमिळच्या खास वर्णांविषयी सांगितले तेही या संदर्भात ध्यानात घ्यावे. र न ळ हे वर्ण बोलीभाषेत र न ल–ळ होतात हे पाहिल्यास त्यांच्यातला भेद अलंघनीय नाही हे कळते.

हा सर्व अभ्यास मराठी व्युत्पत्तीला फार उपयोगी आहे. एकेका वर्णाचे जे अनेक उच्चार बोलीभाषेत दिसतात त्यांवरून मराठी आणि तमिळ वर्णांच्या जुळणी सारख्या अर्थांच्या शब्दांत बसवता येतील. यातले काही शब्द प्रमाणभाषेतही स्थिरावले आहेत. त्यांचा आणि मराठी प्रमाणशब्दांचा मेळ बसवता येईल. अर्थांचा विचार करताना अर्थविस्तार, अर्थसंकोच इत्यादी ज्या क्रिया शब्दांच्या बाबतीत घडून येत असतात त्यांचाही विचार करीत वर दिलेल्या यादीकडे पाहिले तरी कितीतरी मराठी शब्दांची बीजरूपे त्यात दिसतील. हे बहुतेक सर्व शब्द दक्षिणी कुळातले आहेत. तेव्हा मराठीचा दक्षिणीसंबंध फिरून सिद्ध होतो.

२.३ शेतीतले दक्षिणी पीक

शेती हा मानवाचा अतिप्राचीन व्यवसाय आहे. इतका प्राचीन की शेती म्हणजे व्यवसाय अशी भाषेचीच साक्ष आहे. आणि ती दक्षिणी भाषांतली आहे.

द १६२९ चेय्   शेत, पाण्याखालची जमीन

याच्याशी जुळते इतर अनेक दक्षिणी शब्द, उदा. कन्नड केय् कय्, च ऐवजी क ने आरंभ होणारे आहेत. याविषयीचे विवेचन असे आहे (आन्द्रोनोव १९७७ १२ २२१):

> द्रविड तुलना – व्याकरणावरून दिसते की, मूळचा क स्वरांकित असता, तालव्य होण्यासारखा असतो आणि काही भाषांत त्याचे च या स्पर्शात रूपांतर होते. हा च ऊष्म स (आणि पुढे जाऊन ह–) मध्ये बदलू शकतो. किंवा अजिबात लोपविलाही जातो... या शब्दांचे मूळ * कय्– । * केय्– । म्हणजे हात, करणे (= हाताचे उपयोजन) या द्रविड बीजशब्दांत आहे.

या ' चेय् (सेय्) ' चे अर्थ आणि त्यावरून निघणारे नवे शब्द आणि अर्थ असे आहेत :

द १६२८ चेय्   करणे, बनवणे, निर्माण करणे
कृती, कार्य, क्रिया

चेय्कै आचार, बनवलेली वस्तू, कृती, कार्य, क्रिया.
चेय्ति व्यवसाय, आचार
द २३०९ (कन्नड) सेऽव, मशागत शेती.

सेतु पिल्लै यांच्या निगमांपैकी क्र० ४६ पाहिल्यास चेय्ति चे चेऽति होते. च–स यांच्या समानतेमुळे सेऽति. दीर्घ एकार =ह्रस्व एकाराला जवळ आहेच. सामान्यतः संस्कृत एकार तमिळमध्ये दीर्घरूपाने लिहितात– ही प्रमाण भाषांतली जुळणी. म्हणून चेय्ति > सेय्ति > शेती अशी व्युत्पत्ती बसते.

तिरु क्कुरल् मध्ये दहा ‘कुरळ’चा [ओव्यांचा] एक पूर्ण सर्ग ‘शेती’ या विषयावर आहे. त्यातले एक कुरळ सांगते :

१०३५ इरवार् इरप्पार्क्कोन्रीवर् करवादु
कै चेय्तूण्मालैयवर्

भीक ना मागणार (इरवार्), मागणाराला (इरप्पार्क्कु) काहीतरी (ओन्रु) देणार (ईवर्) न लपवता (करवादु);
हाताने करून [शेती करून (कैचेय्तु)] खाण्याचा स्वभाव झालेला (ऊण्मालैयवर्).

चेय्ति म्हणजे कैचेय्ति; शेती म्हणजे हाताने करण्याचा व्यवसाय. आजच्या तमिळ बोलीत आणि प्रमाण भाषेतही शेतीला ‘विवचायम्’। विवसायम् । म्हणतात! मूळ लोकोक्तीचे हे संस्कृत रूपांतर!

खंदे शेतकरी म्हणून तमिळनाडूतल्या वेल्लालन् (वेळाळन्) जातीची ख्याती आहे. यातल्या ल चा उच्चार मृदु ळ सारखा होतच असतो. [लिप्यंतराच्या रूढ पद्धतीत तमिळ ल साठी ळ आणि ळ साठी ऴ किंवा ष़ अशी नागरी चिन्हे वापरतात. येथे ल आणि ळ ही चिन्हे वापरण्याचे कारण व्युत्पत्तीच्या निगमांनुसार त्यांचा मराठी शब्दांतल्या ल्ह आणि ळ यांच्याशी मेळ बसतो हे होय.] वेलाळन् चे मूळ :

द ४५२६ वेलि बाहेर, खुली जागा, मैदान
(मलैयाळम्) वेलि खुले शेत.

या शब्दांचा मराठी शब्दांशी संबंध असेल असे वाटतही नाही. पण महाराष्ट्र शब्द-कोशानुसार ‘वेळीप’ ही गोव्यातील एक हिंदू शेतकरी जात आहे. (७ २८८२) म्हणजे संबंध आहे यात शंका नाही.

वरच्या कुरळात ईवर् म्हणजे देणारा. त्यातला मूळ धातुशब्द ई. अर्थ ‘देणे’ ।। तसाच आणखी शब्द ईन्. अर्थः जन्म देणे वगैरे. मराठी शेतकरी बोलीत

['मराठमोळी 'त] 'गाईनं ह्या पाळीला खोंड दिला बरं का' 'म्हैश ईंगी, पाडी झाली' असे उद्गार ऐकू येत असतात. येणे आणि विणे यांचा जवळचा अर्थिक संबंध त्यांतून दिसतोच. अधिक चित्तर आहे ते 'ईली' हे बोलीरूप. प्रमाणभाषेत ते 'वियाली, व्याली' अशा रूपात येते त्यामुळे 'मूळ धातू विणें'ची उपपत्ती संस्कृत 'विजनन' वरून लावली जाते. पण विणे हेच प्रमाणभाषेने अकारण शुद्ध करून घेतलेले रूप मानले तर ईन् — ईणे हा संबंध चपखल बसतो.

तमिळ ई मधल्या प्राचीन अर्थछटाही मराठीने जपलेल्या दिसतात. संदर्भित तोल्काप्पियातली शब्द अधिकरणातील सूत्रे अशी आहेत :

४४४. ई ता कोडु हे तीन शब्द मागण्याचे शब्द म्हणून आहेत.
४४५. त्यांपैकी ई शब्दाचा उपयोग, मागणारा हीन असल्याचे दाखवतो.
४४६. ता शब्द बरोबरी दाखवतो.
४४७. कोडु शब्द, मागणारा वरचढ असल्याचे दाखवतो.

ई– ईन् यांचे अर्थ पाहिलेच. ता । दा । म्हणजे देणे. बरोबरीचा अर्थ दाखवणारा हा शब्द सर्वार्थी टिकून राहिला. कोडु । कोडु । याचा जुळता 'कोड' हा 'कोड पुरविणे' या वाक्प्रचारात आहे; मागणारा वरचढ असल्याखेरीज कोड पुरवण्याचे कोण मनावर घेणार !

इरवार् हे इर– या धातूचे नकारी रूप आहे. इर– म्हणजे भीक मागणे, विनवण्या करणे. इरवल् म्हणजे भीक मागणेच. यातल्या इ चा मराठीत लोप झालेला असावा. उदा० तमिळमध्ये इरण्डु म्हणजे दोन, तो बोलीत रेण्डु । रेण्डु । होतो. तसाच मलैयाळम-मध्ये रण्डु आहे, तेलुगूत रेण्डु आहे. म्हणून, मग रवल् = भिक्षा हा शब्द रवळनाथ या दैवताच्या नावात राहिला.

र पूर्व आणि आद्याक्षरी इ चा असा नेहमीच लोप होतो असे नाही. शेतीचे मोठे काम–पेरणी, नांगरणी वगैरे–एकमेकांच्या मदतीने जेवणाच्या मोबदल्याने करून घेतात त्याला 'इरजीक' 'इरजे' म्हणतात. इरजीकची व्युत्पत्ती 'सं विरच्–इरज्ज = व्यवस्था करणे, वैदिक संस्कृत इरा = अन्न' अशी दिली आहे. (७ ३१९). अर्थाच्या बाजूने व्युत्पत्ती बरोबर असेल तर दक्षिणी शब्दांतही हे मूळ सापडेल.

द ४१५ इरै पक्षी प्राणी इत्यादिकांचे अन्न
द ४५० इरैच्चि मांस
इरुरि सागुती

इरजिकीचे जेवण सागुतीचेही असते हे पाहता, ध्वनीवरून तसेच अर्थावरून इरैच्चि हे मूळ इरजीक चे मूळ सगळ्यात जवळचे वाटेल.

हरजीक घालण्याचे मुख्य कारण शेतीच्या मालकाचा काहीसा दुबळेपणा. पावसाने चांगली ओल झालेली असताना पेरणी करायला पुरते औत जवळ नसलेल्या शेतकऱ्याला सुने वाटत असते. कुरुन्तोके या संघवाङ्मयातल्या गीत संग्रहात एका ठिकाणी विरहाने पोळलेला नायक आपली अशा शेतकऱ्याशी तुलना करीत आहे.

...नेञ्जेऽ!
ईरम् पट्ट चेव्वि पैम्पुनत्तु
ओऽर् एऽर् उळुवन् पोऽल... कुरु० १३१

मना रे! (नेञ्जेऽ) ओल झालेल्या (ईरम् पट्ट) शिवारात (चेव्वि) पिकाऊ शेतात (पैम्पुनत्तु) एकच औतवाल्या शेतकऱ्या (ओऽर् एऽर उळुवन्) प्रमाणे (पोऽल) मी...

यातला एऽर् हा चेऽर् चा मुक्त भेद आहे. पुढील अर्थ पाहण्यासारखे आहेत :

द २३१२ चेऽर् जोडणे, जोडले जाणे. योग्य असणे, फिट बसणे.
द २३१३ एऽर् नांगर, आणि नांगर बैलजोडी, जू, जोखड.
(मराठी) एलें (नांगर कुळव किंवा पाभर यांची) दांडी व जोखड यांना एकत्र बांधावयाची कातड्याची वादी. ही कोडकांतून ओवलेली असते. [सं. वल्ली; प्रा. वेली, वेल] (७ ४६८)

यातल्या मराठी एलें चा (बोलीभाषेत यलऽ) वेलीशी लावलेला संबंध 'श्रद्धेच्या व्युत्पत्तीतला' दिसतो. वादी आणि कोडकऽ यांच्या समाहारालाही यलऽ म्हणतात. म्हणून बहुधा हा शब्द एऽर चा जुळता असावा. 'एऽल् या दक्षिणी शब्दाचे अर्थ याला पोषक आहेत :

द ७६६ एऽल् घडणे, योग्य असणे, सोयीचे

या सर्वांतून औत, अऊत याच्या अर्थाची आणि मुळाचीही उपपत्ती लागते. ब्लोक यांच्या ग्रंथातल्या कोशातला हा पहिला शब्द. सं. आयुक्त वरून त्यांनी त्याची फोड दिली आहे. दक्षिणी भाषांवरून,

द २८३ आ पकणे, होणे. गौ, म्हैस, सांबरी, वळू
उचि जोडी, जुळणी (मणिमेकलै काव्यात)
खेळातला विरुद्ध बाजूचा जोडी. (तेलुगुवरून) त ४१०

एऽर म्हणजे जोडी तशीच आउत्ति > आउत, औत, अऊत म्हणजे बैलजोडी—नांगराला जुंपलेली.

ज्ञानेश्वरांनी क्षेत्रविचारात त्रिगुणांची शेती वर्णिली आहे :

रजोगुणु पेरी । तेतुले सत्त्व सोंकरी ।
एकलें तम करी । सावगणी ॥ १३·२९ ॥

यात तिन्ही गुणांना जी शेतीतली कामे दिली आहेत त्यांचा बोध दक्षिणी भाषां-
वरून चांगला होतो.

द ३६१३ पेरु दाट वाढणे, गुणित होणे
पेरुकु संख्येने वाढणे
पेरुक्कु वाढवणे, भरपूर करणे, भरणे

द ८७० ओऽङ्कु वाढणे, (झाड) उंच होणे, (ज्वाळा) उंच जाणे.
द २३४४ (कोंड) सोऽ वर येणे
(माल्तो) सोये उठणे, उदय होणे
द २००२ चा (चावु- चाकुव- चेचु-) मरणे, नुकसान होणे किंवा
(पिके) कोळपून जाणे

यांत पेरु- सरळ आहे, ओऽङ्कु मध्ये आधीचा च / स घालण्याची गरज आहे,
तर चाकुव चा उच्चार । साकुव, सागुव । होतो हे लक्षात घ्यावयाचे. एकप्रकारे हे
सर्व मुक्त भेद आहेत, व्युत्पत्ती किंवा पुनर्रचना यांची गरज नाही. ओवीचा अर्थ :
' रजोगुण पेरतो तेवढे सत्त्व वाढवते. एकटे तम त्याला कोळपून टाकते. '

अशा रीतीने अर्थ, ध्वनी, बोलीरूपे इत्यादिकांच्या अभ्यासातून आपण शेतीतल्या
असंख्य मराठी शब्दांचे मूळ हुडकून काढू शकतो. सोबतच्या कोशात, अशा काही
शब्दांचा संग्रह केलेला आहे.

२.४ पाणिनीचा हवाला

रूढ व्युत्पत्ती तर संस्कृत शब्दांवरून आहेत. त्यांचाही विचार केलाच पाहिजे.
उदा० शेत ची व्युत्पत्ती संस्कृत क्षेत्र – प्राकृत छेत्त खेत्त यांच्या मार्गे सांगितली आहे.
खेडे शब्दाशीही शेती चा संबंध जोडलेला आहे. संस्कृत ते मराठी ध्वनिदबल कसे
झाले याची तपासणी करण्यापेक्षा मूळ संस्कृत शब्दाचीच छाननी करणे बरे.

क्षेत्र हा शब्द ऋग्वेदातल्या कृषिसूक्तात (४.५७) आला आहे. ' क्षेत्रस्य पतिः'
या रूपात. यास्काच्या निरुक्तातली (राजवाडे १९३५) त्याची उपपत्ती अशी :

क्षि (= वसति करणे) ह्यापासून क्षेत्र; क्षि + त्रं = क्षेत्रं; शेताच्या आश्रयानेच
म्हणजे शेतांत पिकलेल्या धान्यामुळे कुटुंबी लोक गावात राहतात.
क्षि क्षये । (धातुपाठ १ । २३६).

म्हणजे धातुपाठात ' क्षय ' अर्थी जो क्षि धातू आहे आणि ज्याचा प्रचार त्या अर्थानेच जास्त आहे, त्याच्याशी या शब्दाचा मेळ बसवलेला नाही. आणि वस्ती या अर्थासाठी स्पष्टीकरण आहे ते दूरान्वयी आहे. त्यावरून इतकेच दिसते की यास्काच्या काळी क्षेत्र हा शब्द अपरिचित आणि त्याची व्युत्पत्ती दुर्बोध झाली होती.

पाणिनीच्या अष्टाध्यायीवरून भारताची समाजस्थिती वर्णन करताना शेतीच्या शब्दांबाबत पुढील माहिती आली आहे (आगरवाल १९५३ १४)

> कसणुकीच्या जमिनीचे क्षेत्र नावाचे अलग अलग तुकडे पाडीत. (धान्यानां भवने क्षेत्रे खञ् । ५·२·१) या तुकड्यांची वाटणी करताना कसली तरी मोजणी जरूरच होती; कांड या मापाने जमिनीची मोजणी होई असे पाणिनी सुचवितो. क्षेत्र शी जवळजवळ समानार्थी केदार शब्द आहे (४·२·४०) तो आधीच्या ब्राह्मण साहित्यात आढळत नाही. पण कौटिलीय अर्थशास्त्रात केदार ला पाण्याखालची जमीन असा अर्थ आहे आणि बहुधा क्षेत्र पासून त्याचा वेगळेपणा याच अर्थी होता. (१४ १९५) कसण्याची जमीन, पाहणी आणि मोजणी करून तुकडे पाडून देणाऱ्या अधिकाऱ्याला क्षेत्रकर अशी संज्ञा होती. (१४ १९७)

संदर्भभूत सूत्रात संबंध मुख्यतः आहे तो धान्याचा. ' मुद्गानां भवन क्षेत्रं मौद्गीनम् : मूग होतात त्या क्षेत्राला मौद्गीन म्हणतात ' हे सांगण्यासाठी हे सूत्र आहे. केदार-विषयक सूत्रात ' केदारांच्या समूहाला कैदार्य म्हणतात ' हा निर्देश आहे. क्षेत्र, दिवा वगैरे शब्दांवरून क्षेत्रकर दिवाकर हे शब्द बनतात हे तिसऱ्या सूत्राचे प्रतिपाद्य. त्या शब्दांचे निश्चित अर्थ उपपादित करणे हा या सूत्रांचा हेतू नाही. त्यामुळे पाणिनीच्या काळी हे शब्द प्रचलित होते हे नक्की झाले तरी त्यांचे मूळ अर्थ पाणिनिबाह्य संदर्भा-वरूनच काढावे लागतात.

यास्क आणि पाणिनी या दोघांच्याही उताऱ्यांवरून असे दिसते की क्षेत्र शब्दाचा अर्थ, क्षि या धातूला ' वस्ती, क्षय, तुकडे करणे ' असे अर्थ देऊन, स्पष्ट करण्याचे प्रयत्न झाले. अर्थात शेताला क्षेत्र म्हटल्यावर, शेताच्या कोणत्या भेदक गुणावरून क्षेत्र ची सार्थता पटवायची हे व्युत्पत्तिकाराच्या मनावर होते. धातू क्षि हे ठरलेलेच होते, तेव्हा त्याच्यावर विविध अर्थांचे आरोपण झाले. यातली संस्कृतची मर्यादा ओलांडून पाहिले तर, ध्वनी आणि अर्थ या दोन्ही अंगांनी या आरोपणाशी जुळणारे दक्षिणी शब्द आपल्याला सापडू शकतात. ते असे :

द १२७७	किट–	राहणे, झोपणे.
द १२८७	किट्टु	जवळ येणे. [मराठी खेटणे, ग्रामीण बोली भाषेत ' खीटून ' बसला.]

द १६५६ चेऽ (–च्–) राहणे, थांबणे.
(कन्नड) केऽ (केऽद्) आडवे होणे.
द १६१४ केडु नाश पावणे, नष्ट होणे, खालावणे.
द २२७८ चेतु (केट्ट–) झळाळी हरवणे.
द २२७९ चेत्तै कोरडा कचरा.
द १२९५ चितर् वेगळे करणे. तोडणे. कापणे, तासणे.
द १६२४ चेत्तु कुऱ्हाडीने तोडणे, सोलणे, छिनणे.
(कन्नड) केत्तु पृष्ठभाग तासणे.

उत्तरी कुळातली मानतात त्या सिंहली भाषेतही शेत ला केतु असा शब्द आहे तो या दक्षिणी मेळाव्याशी मिळता आहे. केदार चा तर तुल्य शब्द म्हणून दक्षिणी शब्दाबरोबर उल्लेखच आला आहे :

द १६८० चेऽरु (समासात चेऽट्रु) चिखल, गाळ, दलदल.
केऽडु चिखल. तुल्यशब्द सं. केदार.

कृषिसूक्तातच 'अर्वाची सुभगे भव सीते वन्दामहे त्वा।' या चरणात सीता चा उल्लेख आला आहे. सीता चा अर्थ कृषिदेवता आणि नांगराचे तास असा दुहेरी आहे. अष्टाध्यायीत तो दुसऱ्या अर्थानेच फक्त आला आहे (१४ १९६). सीता मधल्या भूमी उकरण्याच्या क्रियेशी समान अर्थ पुढील दक्षिणी शब्दात आहे.

द २१४० ची (भू. धा. चीत्त) खरडणे
द २१४१ ची (" ") (कोंबड्यांचे) उकरणे
(डुकरांचे) जमीन उधडणे

शेतीत ही क्रिया नांगराच्या फाळाने होते. कृषिसूक्तात प्रार्थना आहे, 'शुनं नः फाला वि कृषन्तु भूमिम्। आमचे फाळ सुखाने भूमी नांगरोत.' वैदिक फाल आणि मराठी फाळ हे एकच मानलेले आहेत. या संदर्भात पुढील दक्षिणी शब्द पाहावेत :

द ३३७१ पाल् भाग, विभाग, तुकडा, छेद
द ३३८१ पाऴ् भग्न, वैराण (होणे). ओरड, टाकाऊ, पडीक जमीन
तुल्य प्राकृत, पाल = जीर्ण
द ३३८५ पाळम् साच्यात ओतलेली धातू.
चपटी वस्तू, कापडाची फाळ, ढलपा त २६३८

या शब्दांमधून ल् ऴ् ळ् अंती असल्याने अर्थछटा कशा बदलतात याची कल्पना येईल. पाळ् चा मराठी 'पाळेमुळे'शी संबंध जुळेल. पाळम् चे अर्थ मराठी फाळ व त्याचे उद्भवशब्द (७ २१७८) यांच्या अर्थांशी जुळतात. त्यामुळे ळ = ऴ आणि

महाप्राणाचे स्थलांतर यांचा आणखी एक पुरावा मिळतो. एकंदरीने वेदातला फाल, दक्षिणी पाल्-पाळ्-पालु आणि मराठी फाळ हे एकाच शब्द-संकल्पनेचे फाळ आहेत हे लक्षात येते.

ल-ळ्ह चे जुळतेपण खळे या शब्दातही अनुभवाला येते. हा वेदातला शब्द दक्षिणी ऋणशब्द कळम् असल्याचे बरो यांनी 'संस्कृत भाषा' या आपल्या ग्रंथात नोंदलेच आहे.

पर्यायी संस्कृतजन्य व्युत्पत्ती मान्यता पावल्या असल्यामुळे या शब्दांचे इतके विवेचन करावे लागले. शेतीशी संबंधित इतर शब्दांचे इतके विवेचन करण्याची गरज भासू नये. अर्थध्वनींचे साम्य असल्यास मूळशब्द म्हणून दक्षिणी शब्दाला प्रथमता द्यावी हे युक्तच होय. त्याआधी प्राकृत, अपभ्रंश यांतलेही हवाले विचारात घेतले पाहिजेत.

२·५ हालाचे हलिक : महाराष्ट्री प्राकृत

हालाची गाथसत्तसई हे महाराष्ट्री प्राकृतातले महाराष्ट्राचे आद्य लोककाव्य. त्यात 'कपाशीच्या शेतात नांगरावर पुण्याहमंगल करणाऱ्या मनोरथगर्भिणीचे' वर्णन आहे : 'फलहीवाहणपुण्णाहमङ्गलं लङ्गले कुणन्तीए...मनोरथगब्भिणीअ' (गाथा १६५) यात कपाशीला फलही आणि नांगराला लङ्गल म्हटले आहे. फलहीवाहण चा एक पाठभेद पलहीवाहय असा आहे. गाथेच्या संस्कृत छायेत फलही ला कार्पासी आणि लङ्गल ला लाङ्गल म्हटले आहे. अर्थात फलही हा लोकभाषेतला शब्द आहे. लङ्गल आणि लाङ्गल यांच्यात फारसा भेद करता येणार नाही. आणि ऋग्वेदातल्या कृषिसूक्तात 'सुखे नांगरो नांगर – शुनं कृषतु लाङ्गलम्' या चरणात तो शब्द आलाच आहे.

नांगर हा मराठी शब्द संस्कृत लाङ्गल पासूनच व्युत्पादितात. त्यातल्या ध्वनी-विषयी ब्लोक यांचे विवेचन संस्कृतातील आद्य ल चा मराठी आद्य न शी आणि अंत्य ल चा र शी संबंध जोडून दाखवते. संस्कृत न चा मराठीत ल होतो (निंब – लिंब, नवनीत – लोणी) हेही त्यांचेच प्रतिपादन आहे. अर्थात ल⇄न र⇄ल हे उलट्ट पर्याय आहेत असे म्हटले पाहिजे. तमिळ शब्दांमध्येही 'रलयोः अभेदः' पुष्कळ दिसतोच (विगम ४९) आणि तमिळ न चा मराठीत ल झाल्याचे एक उत्तम उदाहरण आहे :

द ३०२१	नाम्पु। नाम्बु।	लहानशी वेल
	(मलैयाळम) नाम्पु	कोंभ
	नम्पु	मोड, कोंभ; कुळपुरुष

(तेलुगु) नागु	जोंधळ्याच्या खोडातून निघणारा नवा कोंब.
(मराठी) लांबा	शेतांतील भात कापते समयीं गळलेले किंवा एरव्ही पडलेले जे भातगोटे त्यांच्या पासून उगवलेले रोप. म २६९६

आणि लांबा चे मराठी उदाहरण ज्ञानेश्वरीतले : 'राठि बन्मे संसारी। परि सकळ धर्माचां माहेरी। लांबा उगवे आगरीं। विभवश्रियेचां ॥ ६.४४४ ॥

मराठी नांगर चा तमिळ शब्दांशी निकट संबंध 'इतिहासपूर्व मराठमोळी' पृ. ५६ वर दाखवला आहे. त्या शब्दांच्या अंती ल् च आहे. हे सर्व लक्षात घेता नांगर – लाङ्गल – नाञ्चिल् / नाञ्जिल् यांचे कुळगोत्र एकच असले पाहिजे.

शिलस्की यांनी लाङ्गल चे मूळ, ऑस्ट्रो – आशियन भाषांमध्ये शोधले आहे. (बागची १९७५–१६) त्याकरता त्यांनी असा पक्ष मांडला आहे की :

- लाङ्गल ची भारतार्य व्युत्पत्ती नाही. त्यातल्या दोन ल वरून लोकभाषेचे सूचन होते.
- ऑस्ट्रो-आशियन भाषांमध्ये 'साधन' हा अर्थ दाखवण्यासाठी शब्दामध्ये अनुनासिक घुसते. अशी नियमितता भारतार्य भाषेतल्या लाङ्गल, लाङ्गूल या शब्दांत नाही – कारण : ते ऋण शब्द.
- लाङ्गल च्या क्रियेचे लिंगाच्या क्रियेशी सारखेपण आहे आणि लाङ्गल चा तो अर्थही आहे. या शब्दांचे ध्वनिसाम्य ऑस्ट्रो-आशियन वरूनच सिद्ध करता येते. लगुड हा शब्दही लाङ्गुल वरून नकललेला असावा. काही ऑस्ट्रो–आशियन जमाती लाकडी नळीतूनच बी टोपतात त्याचा हा अवशेष असावा.
- सीता म्हणजे नांगराचे तास, जनक म्हणजे पिता. यांवरून सीतेचे मिथ्य, या प्राचीन संकल्पनासंगतीने सोडवता येते. (१६ ८–१५)

संताळांसारख्या वनजातींच्या भाषेत हे शब्द शोधण्याला तशी हरकत काहीच नाही. पण त्याकरता पुढे आणलेला पुरावा फार दुबळा वाटतो – अर्थ आणि ध्वनी या दोन्ही दृष्टींनी. दक्षिणी भाषांमधे शिलस्कींनी शोधच घेतलेला नाही. तसा थोडा घेतला तर त्यांच्या पक्षातलेच युक्तिवाद दक्षिणीवरूनही सिद्ध होतात ते असे :

- ल आणि न यांची लोकभाषेतली अदलाबदल मान्य केल्यास दोन ल चा प्रश्न सुटतो.

□ अनुनासिक हे शुश्रुतीसाठीसुद्धा लोकभाषेतल्या शब्दांमध्ये घुसते (विगम ५९) मराठीतही हे आपण अनुभवतो [रत्नांगिरी]. लाङ्गुल मधले अनुनासिक मूळ लोकभाषेतलेच आहे. तमिळ मध्ये इकु ।– इगु । या प्रत्ययाने – असणे, – होणे हे अर्थ प्रतीत होतात. उदा० । इरङ्गु । = थांबणे, थांबले असणे.

□ लगुड मधली संकल्पना, ही टोचण्याच्या क्रियेचा संस्कृतीत आरंभही होण्याच्या पूर्वीची आहे. लिंगवाचक शब्दावरून लाकूडवाचक शब्द आला हे म्हणणे व्यत्यासाचे वाटते. नांगरणे आणि पेरणे या क्रियाही खूपच वेगळ्या आहेत. शिवाय, पुढे दिल्याप्रमाणे, तमिळमधल्या विविध आधारशब्दांतही अर्थसंगती दिसून येतेच. ती अधिक पटण्याजोगीही आहे.

□ सीता चे दक्षिणी समार्थक मागे दिलेच आहे. मिथ्य सोडवायचे तर ते एकदोन शब्दांवरून सोडवून चालणार नाही. ही 'नांगराची चार' रामाने वरिली याचा अर्थ काय ? लाङ्गुल वरून तो सापडणे कठीण आहे.

आणि मिथ्याची बांधणी होते ती केवळ लिंगविषयाशीच संबंधित असते असेही नाही. लिंग आणि शेपूट यांचा संबंध प्राणिसृष्टीत शिंग आणि शेपूट यांच्या संबंधाइतकाच आहे. कारण त्याचा उपयोग प्राणिसृष्टीत मादीची योनी झाकण्यासाठी होतो, नराचे लिंग खुलेच असते. खुद्द शेपूट (शेंपूट) या शब्दाचे मूळही दक्षिणीच असले पाहिजे.

द २३०६ चेऽण् अंतर, उंची, रुंदी, लांबी
चेऽयुत्तु जे दूर आहे; लांब

द ३४९२ पुट्टै उपणणे, मारणे, फटका देणे, (ताशा) वाजवणे, (पंख) फडफडणे

अर्थात माशा उडवण्यासाठीच शेपटाचा उपयोग आहे ही मूळ संकल्पना आहे, लिंगाशी तिचा काही संबंध नाही. ते लांबलचक असते, टांगल्यासारखे असते हा त्याचा एक विशेष. तो 'ना' या तमिळ शब्दबीजात आहे.

द २३७३ आलु, नालु लोंबणे, टांगणे, झोका खाणे
द २३६९ आन्, नाण् दोरी, धागा, दोरा, तंतू, धनुर्ज्या
द २३६३ आमलि मोर
द २३७२ नारै करकोचा
द २३६२ नाण्डु खेकडा

मराठीतला नांगी शब्द यांच्या भरीला घालावा म्हणजे शेपूट आणि नांगर या दोन्हींची प्रतिमा उभी राहील.

वर दिलेल्या गाथेत मनोरथगर्भिणीचा उल्लेख आहे त्याची नांगराशी संगती लावताना संपादक जोगळेकरांनाही आधुनिक मानसशास्त्राची आठवण झाली. या सर्व उपपत्तींचेही समाधान 'ना–' आद्याक्षरी तमिळ शब्दांवर उत्तरकाली अशी मिथ्ये बेतली गेली असतील असे मानून करता येईल :

द ३०१० नाकु 'तारुण्याची नव्हाळी,' 'प्रथम वयसा काळ' कालवड, पाडी, रोपटे

द ३०१४ नाणू लज्जा, संकोच, मर्यादा, लाजाळूपणा.

हे शब्द याचे निदर्शक आहेत. नागूबाई असे नाव मोरोपंत जोशी यांच्या मुलीचे होते. या वऱ्हाडी नावाचे मूळ नाकु । नाणु । असावे.

पण सर्वाधिक शक्यता नांगराच्या फाळाची तुलना जीभ, दात यांच्यासारख्या अवयवांशी होण्याची वाटते.

द ३००९ ना नाक्कु नावु जीभ
द ३२८८ पल् दात
पल्लि, पलकि दातेरी कुळव (मोघडा)
(कन्नड) हल्कु " " "

यावरून हल हे नांगराचे नावही सिद्ध होऊ शकते. ते प्राकृतात आहे. पाणिनी नांगरावयाच्या जमिनीला हल्या म्हणतो. लोकभाषांमधले शब्द संस्कृतात गेले याशी हे सारे सुसंगत आहे.

गाथेमधल्या फलही चे धागेदोरे आता शोधावयाचे. खेड्यापाड्यात प्रचारात असलेले आणि कोशातही असलेले पऱ्हाटी – परहाटी – पळ्हाटी हे शब्द कापसाच्या झाडाचे निदर्शक आहेत. पळ्हें असाही शब्द आहे. दक्षिणी भाषेत पाहता,

द ३२८० परुत्ति कापसाचे झाड.
(कन्नड) पळ्ति बोंडातला कापूस
द ३३०३ पळपळ चमचमणे (उदा० तेल लावलेले केस), तळपणे.

यातल्या ळ चे ध्वनिमूल्य 'ल्ह' असल्यामुळे पल्ह म्हणजे चमकती वस्तू या अर्थात कापसाच्या फुललेल्या बोंडाचा बोध होतो. महाप्राणाच्या स्थलांतराने 'फलही' सिद्ध होईल. लोकभाषेत ल·ळ यांचा भेद लोपत असल्यामुळे पल पल वरूनच 'पळ-पळणारे' भाष्य नजरेसमोर तळपेल. दक्षिणी– मराठीच्या शब्दसागरांची एकरूपता

दाखवणारे आणखी एक गमक या ' फळफळ ' ध्वनीतच आहे. ' फळफळा मुतणे ' हा वाकप्रचार या पुढल्याच शब्दावरून सिद्ध होतो :

द ३३०४ पल-पलवु एनल् फोटण्याच्या [स्फोटाच्या] आवाजाचे निदर्शक
(कन्नड) पलकु् पाण्याने भरलेला घडा फुटतो तेव्हा होणारा आवाज
(मलैयाळम्) पलपल तडकणे, लाही फुटणे

याप्रमाणे आणखीही महाराष्ट्री प्राकृत शब्दांची उपपत्ती दक्षिणी भाषांमधून बसवता येते. भांडार सगळे एकच आहे, उपलब्ध ग्रंथादी साहित्यानुसार वर्गवारी झाल्या आहेत इतकेच. त्यांच्यातले फरक वेगवेगळ्या लोकभाषांचा परिणाम दाखवीत आहेत.

२.६ बोलीभाषेची खोल मुळे

आणि या लोकभाषांमधली जी शब्दरूपे चिवटपणे बोलभाषेत जतन झाली त्यांच्यावरून आपल्याला मूळच्या रूपांची जशी कल्पना येते तशी त्याच शब्दांच्या प्रमाण भाषेतील रूपांवरून येत नाही. पुष्कळदा प्रमाण भाषेतली रूपे आणि उत्तरी भाषांचा आधार या दोघांमुळे आपण चुकीच्या वाटेनेच जात असतो. शेतीशी संबंधित शब्द खास व्यवसायाचे म्हणून सोडले तरी सर्वगामी अशा शब्दांतही हा प्रकार दिसतो.

वरवंटा हा शब्द उदाहरणादाखल घेऊ. याच्या संस्कृताधार व्युत्पत्ती परिपंथ, परिवंटन, वर + वृत्त अशा दोनतीन देण्यात आलेल्या आहेत. एकापरीने ही वरवंटा ची संस्कृत ध्वनिरूपे आहेत. ध्वनिकाचे सर्व नियम ती पाळीत आहेत असे नाही. अर्थाचाही भेदक विशेष त्यांच्यात काही आहे असे नाही.

ग्रामीण बोलभाषेत त्याला वरटा म्हणतात. या रूपावरून शोध घेतला तर दक्षिणी भाषेत त्याचे मूळ सापडते :

द ५७१ उरुल् रूळाप्रमाणे फिरणे, गडबडा लोळणे, चाकाप्रमाणे फिरणे गोलटे होणे
उरुट्टु (उरुट्टि) रूळाप्रमाणे फिरवणे, गरगरणे, फिरवणे

यातून वरवंट्या प्रमाणेच रूळाची ही संगती लागते. उरुळी या ग्रामनामाचाही अर्थबोध होतो. त्याचे आणखी विवेचन ' इतिहासपूर्व मराठमोळी ' या निबंधात आले आहे. वरवंट्याचा जोडीदार पाटा त्याच्याचसारखाच दक्षिणी भाषेत शोधता येतो.

द ३३४६ (मलै.) पाटम् भातशेत

यातून सपाटीचा भाव व्यक्त होतो, तोच पाटयाच्या नावाचे मूळ कारण असावा.

याचप्रमाणे 'सरळपणा' हे शहाणपणाचे मूळ समजले जात असावे. लिहा-वाचायला शिकून शहाणी झालेली मंडळी त्याचा उच्चार शहाणा, शाहणा असा करीत असली तरी अडाणी माणसे 'श्येना' असा यकार-युक्त करतात. ज्ञानेश्वरीत तो 'सिहाण-' तर शिशुपालवध काव्यात 'शिहान', प्राकृतात 'सेयाण' असा आहे. या सर्वात इ–ए–य यांचे अस्तित्व आहे. संस्कृत मूळ सज्ञान असे दिले जाते. ध्वनि-बदलाचे नियम जर ठाम असतील तर मग अडाणी चे मूळ अज्ञानी असे देतात ते चूक ठरेल. शिवाय या व्युत्पत्तीत इ–ए–य यांचा काहीच विचार नाही.

इ ए हे स्वर आणि स ण न ही व्यंजने यांच्या आधारे मागोवा घेतला तर पुढील दक्षिणी शब्दात श्येना चे मूळ सापडेल :

द २२६५ चे – चेम् सरळ.
द २३०६ चेऽण् उंची.
चेन्नि शिखर, ख्याती. त १६२३

यात । श, स । साठी च हाच वर्ण लिहिताना वापरतात हे लक्षात ठेवले पाहिजे.

सज्ञान वर आधारलेल्या व्युत्पत्तीची दुसरी उणीव म्हणजे 'शहाणा सुरता' यातल्या 'सुरता' ची फोड तिच्यावरून होत नाही. 'सुरत' या शहराच्या नावाशी त्याचा संबंध कोशात जोडला आहे पण त्याला आधार कसलाच नाही. 'सुरती रुपया'च्या धर्तीवर शहाणा सुरती व्हायला खरी हरकत नव्हती. दक्षिणी आधार अधिक बळकट आहे :

द २२३६ चुरुति तल्लखपणा, चलाखपणा, चपळाई

याचबरोबर अडाणी चाही शोध लागू शकतो :

द ६१ अटा। अडा। लहान मुलाला किंवा कनिष्ठाला जवळिकीचे आणि शत्रूला तिरस्काराचे संबोधन

याप्रमाणे शहाणा शब्द समग्रतेने आपल्याला दक्षिणी भाषेतून प्राप्त होतो. शिवाय, सांस्कृतिक संदर्भात त्याचा नेटका अर्थही प्राप्त होतो. सरळपणा, न्यायीपणा हे खरे शहाणपणाचे घटक होत. म्हणूनच 'येथ चातुर्य सिहाणें जालें' असे ज्ञानेश्वर म्हणतात. द १९२० ची नोंद चतुर् = क्षमता, कुशलता अशी आहे. चातुर्य कुशल असते, चलाख असते, सरळ तरच थोर होते हे तत्त्व ज्ञानदेवांच्या ओवीत गुंफले आहे.

असाच सांस्कृतिक महत्त्वाचा शब्द बाहुली. भावली असाही त्याचा उच्चार होत असतो. लाकडाची किंवा मातीची वगैरे पुतळी हा या शब्दाचा अर्थ आहे.

त्याचप्रमाणे डोळ्यातली बाहुली (प्रतिमा तयार करणारे स्थान) हाही अर्थ त्यात आहे. परस्परांशी दृश्य संबंध काही नसताना असे अर्थ या शब्दात योगायोगाने आले की त्यांच्या मुळाशी काही एकतत्त्व आहे ?

> बाहुला बावला : लोकभाषेत बाहोला. गुजराती बावलुं. देशी : बाउल्ली पचलिका; अत्र बप्फाउल – बाउल्ली शब्दौ केषांचिद् दन्त्यौष्ठ्यादी । [बफ्फाउल आणि बाउल्ली यांतला व कोणीकोणी दन्तोष्ठ उच्चारतात.]

ही व्युत्पत्ती ब्लोक यांनी दिली आहे. तिच्यावरून अर्थबोधाकडे वाटचाल होत नाही. बा-व, बा-उ ही रूपे मुळाच्या जवळ जाणारी आहेत आणि महाप्राण ह नंतरचा आहे एवढे स्पष्ट होते. ज्ञानेश्वरीत 'तो काइ बाउलेयांचा कांजा नाचवी' या चरणात बाउला कठपुतळी या अर्थी आला आहे. यांचे मूळ आणि त्या मुळाचेही मूळ दक्षिणी भाषेत सापडते :

द ३३७९	पावै	पुतळी, बाहुली, प्रतिमा, चित्र, तसबीर, डोळ्यातली बाहुली, स्त्री, बाला
		(सुंठीचे) आले. 'पतुमै = प्रतिमा, पुतळी; पद्मा (लक्ष्मी, काली)' त २४७९
द ३३६६	पार्	पाहणे
	पार्वै	डोळा, देखावा

पार् = पाहणे यावरून पावै, पाउलि, बाउलि असा हा क्रम आहे. पार् चा पाह-सरळच आहे, 'पश्य' वरून काढण्याची गरज नाही.

संस्कृतिक महत्त्वाचा भाग हा की बाहुली ही मुळात प्रतिमा होती, डोळयातल्या प्रतिमेच्या नमुन्यावर बनवलेली मूर्ती होती, मातृदेवता होती, भाव जागा करीत होती आणि म्हणून कालांतराने त्या मूर्तींच्या भक्तिणींचा वर्ग झाला त्याचेही नाव पावै वरूनच आले : भावीण म्हणून.

पुतळी म्हणजे मूर्तीच. तरीपण, बाहुली म्हणजे मूर्ती अशी मराठी भाषिकांचीही धारणा होती याचे प्रत्यंतर डॉ. तुळपुळे यांनी संपादित केलेल्या 'मराठी भाषेचा तंजावरी कोश' या 'आद्य' मराठी कोशात मिळते. त्यात बाहुली म्हणजे 'पुतळी, लेप, विग्रह' असे अर्थ आहेत. विग्रह म्हणजे मूर्ती असा शब्द हल्लीही दक्षिणेत प्रचारात आहे.

२.७ विपरीत व्युत्पत्तींचा विचार

मराठी शब्दाची व्युत्पत्ती संस्कृतवरून काढली जाते, तेव्हा कालविपर्यासाचा दोष तरी मोठ्या प्रमाणात देता येत नाही. मराठीत अरबी–फारसी शब्दांचाही मोठाच भरणा झाला आहे. तो अलीकडच्या चारपाचशे वर्षांतला आहे. काही प्राथमिक शब्दांच्या व्युत्पत्ती जेव्हा अरबी–फारसीवरून काढल्या जातात तेव्हा निरखणाचे संकुचित वावर एवढेच त्याचे कारण असते.

उदाहरणार्थ कुत्रा हा प्राणी अगदी शिकारयुगापासून माणसाचा सोबती झालेला आहे. त्याच्याविषयीचे विविध शब्द मूळ लोकभाषेतले असणे जास्त स्वाभाविक आहे. नवनव्या भाषांच्या संपर्काने नवीन शब्द येणार नाहीत असे नाही. पण तसे येतील तेव्हा ते ठामपणे कुत्र्याच्याच संदर्भातले असतील; कोंबडीच्या संदर्भातले आहेत आणि अर्थविस्ताराने कुत्र्याला लागू झाले असे होणार नाही. 'कुलुंगी कुत्रे' या शब्दप्रयोगाच्या व्युत्पत्तीबाबत असा प्रकार व्युत्पत्तीमुळे झाला आहे. महाराष्ट्र शब्दकोशात आणि व्युत्पत्तिकोशातही 'कुलुंगी = लहान व कंगाल कुत्रे (किंवा घोडे)' असा अर्थ आणि 'फारसी कुलंग = एक मोठे कोंबडे, करकोचा, ससाणा' हे मूळ दिले आहे] यात अतिदेश फारच आहे. दक्षिणी कोशातून या शब्दाचे मूळ सापडते :

द १५०१ कुलुङ्कु (कुलुङ्कि) हादरणे, क्षुब्ध होणे, थरथरणे, शहारे येणे, भीतीने कापणे

कुलै सारा गोंधळ होणे, विस्कटणे, मोकळणे

मराठी शब्दाला निंदाव्यंजक अर्थाची जी एक छटा आहे तिचाही बोध या व्युत्पत्तीत होतो. मराठी कोशातल्या पुढील शब्दांचीही उपपत्ती यातूनच लागते :

कुलंच, कुलुंच – शेपूटखळ्या; रेंगाळणारा; धीरेधीरे चालणारा (घोडा); चालताना ज्याचे मागील पाय एकमेकास घासतात व त्यामुळे स्वारी करण्यास वाईट असा (घोडा) (७ ७५८)

कुलुली (सं. कल्लोल) घोडा किंवा घोडीचा एकमेकांविषयी आवेग, माज. पुरुष किंवा मुले आनंदाने उड्या मारणे. (६ १७६)

यांमध्ये संस्कृतचा आधारही अतिदेशीच आहे हे दिसून येईल.

हत्ती हा प्राणी तरी अरबी किंवा फारसी देशातला नव्हे. त्या भाषेत त्याचे नाव परभाषेतूनच आलेले असणार. आपल्या इतिहासातल्या अठरा कारखान्यांपैकी एकाचे

नाव पीलखाना–फीलखाना होते. राज्यव्यवहारकोशात 'गजशाला फीलखाना गजः फील इति स्मृतः।' अशी व्याख्या केली आहे. संस्कृत कोशात पीलुः = हत्ती असा अर्थ आहे. पण 'अणु, किडा, बाण आणि ताड' असेही विश्वव्यापक अर्थ त्याच शब्दाला दिले असल्यामुळे, अनेक अन्यभाषी शब्दांचे हे सामान्य संस्कृत ध्वनिरूप असले पाहिजे असे म्हणता येते. या अन्यभाषा दक्षिणी असाव्यात. कारण, हत्ती पुरते पाहता,

द ३४४७ पिलिरु हत्तीचे गर्जणे
(ते० क०) पिलुचु हाकारणे, आवंतणे, ओरडणे
द ३४४६ पिल् आ वासणे, तोंड पाडणे

यांमधल्या ल मुळे येणारा महाप्राण ध्यानात घेतला म्हणजे फील ची उपपत्ती लागते. मदोन्मत्त हत्तीचा वाचक हा शब्द आहे, प्राचीन आहे; संस्कृत आणि अरबी–फारसी शब्द त्याची नक्कल असले पाहिजेत. या अर्थाने 'नकल' अरबी नक्लशी जोडला गेला असणे शक्य आहे. हसवण्यासाठी नकल्या करतो ती नकल मात्र मानवी समूह-जीवनाचा आदिमकाळापासूनचा भाग होऊन राहिली आहे. तिचा शब्दावतार अरबीच्या संपर्काने झाला असे म्हणता येत नाही. विशेषतः, दक्षिणी भाषेतील पुढील शब्द पाहिल्यावर मुळीच नाही :

द २९४४ नकु (नक्कु–) हसणे, स्मित करणे, मौज मारणे
नक्कल् हास्, व्यंग्य, चमक

अर्थात नक्कल म्हणजे हसवणूक. ती कोणाचे सोंग आणूनच केली पाहिजे असे नाही. कोशात दिलेले उदाहरण, 'आज देवालयात मोठी नकल झाली' हे नकल च्या 'हास्यकारक, चमत्कृतिजनक, गमतीची गोष्ट' या अर्थाचे बोधक आहे. त्यात अरबी शब्दाचा अतिदेशी अर्थ नसून मूलभाषेतला मूळ अर्थ आहे. लोकभाषेचे, बोलभाषेचे मूळ असे फारफार खोल आहे.

मराठीचे अमित शब्दभांडार दक्षिणी भाषांशी समान आहे हे अनेकविध प्रमाणांनी आतापर्यंत मांडले. या सिद्धांताची उलट चाचणीही आपल्या खात्रीसाठी घेऊन पाहता येईल. 'अग्नि' हा भाषेतला एक अग्रणी शब्द असतो. त्याच्याविषयीचे शब्द चौदा नोंदींमध्ये आले आहेत असे दक्षिणी कोशाची सूची सांगते. त्या सर्वांशी जुळते, उद्भव, तत्सम वगैरे शब्द मराठीत आपल्याला सापडतात ते असे :

२३४ अळल् इळ = हाळ = विस्तवाची खाई म ३२०२

२७७	अनल्	अनल (संस्कृतही)
६९४	एरि	याचा संबंध कोशात द २३८९ नेरुप्पु याशी दिलेला आहे.
८५४	ओलि	होळी (लकारामुळे ह)
११८३	कनल्	कनानी : 'तापाची कनानी येते', कसर म ५७७
१२७२	किच्चु	खिचडी !
१७९४	कोल्लि कोळ्ळु	कोलीत. 'कोल्हारीचे वेताळ'–ज्ञानेश्वरी.
२१८३	चुट्ट । चुडु ।	चूड
२३८४	ञेकिळि, नेकिळि	निखारा !
२३८९	नेरुप्पु	नेरवा = सोनाराच्या दुकानातील राख म १८९२
२५४२	तळल्	तळपणे
२६७२	ती	तीट, दीप !
४०९९	मुलि वाळणे, जळणे. करपणे, पिकणे.	मुल्हन (वऱ्हाडी) = पोकळ बारीक व निःसत्त्व असा तुरीतील दाणा २५११
	मुलरि सरपण.	मुल्हेरी हे ग्रामनाम !
४५४०	वेऽ जळणे	(आम्या) वेताळ. पहा 'इतिहासपूर्व मराठमोळी' आणि वर 'कोल्हारीचे वेताळ'
	वेऽवम् यातना, दुःख.	वेवट = संकट, त्रास २८७९

पैकी शेवटच्या 'वेवट'ची व्युत्पत्ती संस्कृत विवेष्ट वरून दिली आहे. उदाहरण एकनाथी भागवतातले दुर्योधनाच्या बऱ्याच असंस्कृत उद्गाराचे आहे : 'पांडवांच्या वाचें मी काय लागें । त्यांची वेवटें सोशी अनेगें ।' अर्थात वेवट हा शब्द चांगला गावरान होता.

२.८ निळाई हासेल

शब्दप्रयोगाविषयी पतंजलीच्या महाभाष्यात उद्बोधक विवेचन आले आहे. 'ऊष, तेर, चक्र, पेच यांसारखे अप्रयुक्त – प्रचारात नसलेले – शब्द असतातच ना ?' या शंकेला उत्तर देताना म्हटले आहे ;

> हे सारेच शब्द देशांतरी प्रचारात आहेतच. (सर्वे खल्वप्येते शब्दाः देशान्तरेषु प्रयुज्यन्ते ।) पण ते मिळत नाहीत. (न चैवोपलभ्यन्ते ।) मिळवण्याचा यत्न करावा ! (उपलब्धौ यत्नः क्रियताम् ।)

' मिळवण्याचा यत्न करावा ! ' मराठीचे मूळ शब्द दक्षिणी भाषांत मिळत नाहीत असा समज आहे. त्याबाबतही हेच म्हणता येईल की, ' मिळवण्याचा यत्न करावा ! '

ते तेवढे कठीणही नाही. त्या भाषा उत्तमपणे येत नसल्या तरी कठीण नाही. संस्कृतच्या खालोखाल तमिळसारख्या भाषेबाबत इंग्रजी वाङ्मय झालेले आहे. तमिळ लिपीही दुरून आणि दूरत्वामुळे वाटते तेवढी कठीण नाही. शिवाय, तमिळ विद्वत्तेचे भांडार मानलेला ' तमिळ लेक्सिकन ' सर्व शब्दांचे रोमन लेखांतरही देतो. तर बरो आणि एमेनो यांची ' द्रविडियन एटिमॉलॉजिकल डिक्शनरी ' सर्वच दक्षिणी भाषांतले हजारो शब्द सामावून आपल्याला उपलब्ध आहे. ' मिळवण्याचा यत्न करावा. उपलब्धो यत्न : क्रियताम् । '

मराठी भाषेतील शब्दांचा मूळ निधा आपण दक्षिणी भाषांत शोधण्याचा यत्न केलेला आहे. निरखणाचे वावर वाढवले आहे. आणखी व्यवसाय आपल्याच हाती आहे. शेतीच्या सर्गात तिरु वळ्ळुवरचे शेवटचे कुरळ असे आहे :

१०४० इलमेन्ऱसैइयिरुप्पारैक्काणि
निलमेन्नु नल्लाणकुम्
' काही नाही ' असे म्हणून (इलम् एन्ऱ) स्वस्थ बसणाराला (असैइ इरुप्पारै) पाहून (काणि) शेती (निलम्) ही सती (नल्लाळ्) हासेल (नकुम्).

निल – निला – निळा म्हणजे शेती. तर गोंधळ्याने सरस्वतीला लावण्यसुंदर निळा म्हटले आहे. लोकभाषेच्या अभ्यासातून दक्षिणीचे केवढे तरी पीक हाती येण्यासारखे असताना ' मराठीत दक्षिणी नाही. (इलम् !) ' म्हणून आम्ही हात जोडून बसलो तर ही निळा–नल्लाळ आपल्याला हासेल !

* * *

३. देश, काल, रूप

३.१ व्याकरणाची राखण

शब्द हे भाषेचे घटक तर व्याकरण ही त्यांची व्यवस्था होय. शब्द हे भाषा-शरीराचे अवयव मानले तर व्याकरण ही त्याची मज्जासंस्था होईल. एखाद्या भाषेचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व निश्चित करताना तिच्या अवयवरूपाबरोबर मज्जासंस्थेचा विचारही करावा लागतो. 'शुद्ध कसे बोलावे, शुद्ध कसे लिहावे हे व्याकरणाने समजते' या दादोबांच्या विधानात गुणभेदनाची, नियमनाची जी कल्पना आहे ती प्रयुक्त व्याकरणाची, काही एका हेतूने उपयोजिलेल्या व्याकरणाची आहे. वस्तुतः व्याकरण हे केवळ वर्णनात्मक असते; म्हणून विगमात्म असते, निगमात्म किंवा नियमात्म नसते.

ते नियमात्म वाटण्याचे कारण, भाषेच्या संबंधात त्याचा चिवटपणा हे असते. इतर भाषेच्या संपर्काने शब्दसंग्रह हा अधिक सुलभतेने बदलतो. वाक्यरचनेसारखे व्याकरणाचे अंग मात्र टिकून राहते आणि भाषेचे भेदक लक्षण म्हणून मानले जाते. डॉ. केतकरांच्या 'भारतीय समाजशास्त्र'मध्ये याचे चांगले उदाहरण दिले आहे.

> जेव्हा आपण आपल्याच भाषेत अनेक परके शब्द घुसडूं लागतो तेव्हा आपल्या भाषेचा आपलेपणा वाक्यरचनेवरूनच सिद्ध होतो. आज आपण जेव्हा प्रचलित मराठी ऊर्फ पाणेरडें मराठी बोलतो तेव्हा आपण आपली वाक्यरचना व इंग्रजी शब्द यांचे मिश्रण वापरतो. उदाहरणार्थ 'डिफेंडंटने अफिडाविट फाइल केलें नाहीं' अशा तऱ्हेची भाषा आपणांस नेहमी कोर्टात ऐकू येते. तिला आपण मराठीच म्हणूं. 'पटेल हॅज नॉट मेड पक्का बंदोबस्त' हें इंग्रजी वाक्य आहे. (पृ. १०१).

वाक्यरचनेला व्याकरणात आणि म्हणून भाषेच्या घडणीत असे महत्त्व असल्या-कारणाने भाषाकुळांची रचना करताना तुल्य वाक्यरचना हे मोठेच गमक असते. मराठीचा समावेश उत्तरी भाषाकुळात होण्याचे एक महत्त्वाचे कारण तिची वाक्यरचना संस्कृत-सारखी आहे हे होय. तिचा शब्दसंग्रहही पूर्णपणे संस्कृताधार आहे हे रूढ मत बरोबर नाही हे आपण मागच्या दोन प्रकरणात पाहिलेच आहे. त्यावरून मराठी आणि दक्षिणी भाषांचा सामान्य शब्दसंग्रह दिसून येतो. सामान्य शब्दसंग्रह किमान, दोन भाषांचा संपर्क सिद्ध करतो. अशा संपर्कातून वाक्यरचनेवरही काही परस्पर परिणाम झाले आहेत काय याचा तरी शोध घ्यायलाच हवा.

तमिळ आणि मराठी भाषांमधल्या वाक्यरचनेत फारसा फरक नाही. तमिळ वाक्यातल्या शब्दाला मराठी प्रतिशब्द मांडीत गेले तर अर्थपूर्ण मराठी वाक्य तयार होते. विनोबांच्या गीता प्रवचनांचा तमिळ अनुवाद हिंदी अनुवादाला धरून वाचला तर वाक्यांमधला पदक्रम असा जुळत नाही, मराठीशी मात्र जुळतो. यावरून वाक्य-रचनेचा सारखेपणा दोन्ही भाषांच्या बाजूने कसा जुळतो हे ध्यानात येईल.

मग व्याकरण आणि शब्द या दोन्ही अंगांशी स्पर्शणारा रूपिमांचा 'रूपिक' हा भाग विचारासाठी उरतो. ब्लोक आणि तुळपुळे यांनी याही भागाची सपरिश्रम चर्चा केलेलीच आहे, आणि मराठी रूपिमांचा संस्कृत–प्राकृताशी सांधा जुळवून दाखवला आहे. येथे त्या सर्वच विवेचनाचा सांगोपांग विचार आपण करणार नाही. मराठीची रूपसिद्धी संस्कृतातून आली हे त्यांचे मत असले तरी काही अडचणीच्या जागा, अप-वादाची स्थळे आणि न सुटलेले प्रश्न त्यांनीच उल्लेखिले आहेत. त्यांचा विचार दक्षिणी भाषांच्या संदर्भात येथे करता येईल. त्यासाठी आपण तोल्काप्पियाचाच आधार घेणार आहोत. अंती असे दिसेल की मराठीचे निदान एक मूळ तमिळादि दक्षिणी भाषेचे होते असे मानले तर अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक होते; व्याकरण जे भाषेची राखण करीत असते त्याचेही आपल्याला असे दक्षिणी-मूलक समाधान करता येते.

३.२ प्राणिमात्रांचा लिंगविचार

संस्कृतला अनुसरून मराठीतही शब्दांची तीन लिंगे मानलेली आहेत. त्यांतल्या नपुसकलिंगाचे अस्तित्व आधुनिक भारतीय भाषांपैकी फक्त मराठी गुजराती आणि सिंहली भाषांमध्ये उरले आहे. पूर्वेकडच्या भाषांत तर लिंगाचा मागमूसही नाही. याचा अर्थ 'हा सर्व भागात चालणाऱ्या भाषांचा मूळ भारत-युरोपीय भाषांशी संबंध येण्या-पूर्वी त्यांचे जे स्वरूप होते त्याचा हा परिणाम आहे' असा ब्लोक यांनी लावला आहे. मात्र सजीव आणि निर्जीव वस्तूंमधला भेद दोन ठिकाणी मराठी रूपिमांत आणि वाक्यमेळात दिसतो तोही त्यांनी दाखवला आहे. 'कुत्र्याने ससाला खाल्ले' आणि 'कुत्र्याने ससा खाल्ला' यांतल्या क्रियापदांत तो मेळ-भेद दिसतो. (१ २१७)

तुळपुळे यांनी मुख्यतः अन्त्यवर्ण किंवा प्रत्यय यांच्यावरून यादव-मराठीतल्या शब्दांचे लिंगविषयक वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून 'नैसर्गिक लिंग-भेदाचा व व्याकरणातील लिंगभेदाचा कधीतरी एकभाव होता किंवा नाही हा प्रश्न पुढे येतो' असे सार काढले आहे. यादव-मराठीत लिंगाच्या सामान्यीकरणाची प्रवृत्ती वाढती होती असा त्यांचा निष्कर्ष आहे. नपुसकलिंगी रूपे हीनत्व दाखवण्यासाठी वापरीत असे त्यांचे निरखण आहे. (२ २१३–१४)

दामले यांच्या व्याकरणात (दामले संपा० अर्जुनवाडकर १९७० १७) दादोबांपासून लिंगविचाराचा विमर्श केला आहे. त्यांची निरखणे अशी :

> लिंगे तीनच असणें स्वाभाविक आहे. (१७ २२५)
>
> मराठीतील लिंगव्यवस्था अत्यंत अनियमित आणि मनःपूत आहे...अप्राणिवाचक लिंग ठरविण्याच्या...कामी लोकव्यवहार किंवा भाषणप्रचार याशिवाय दुसरा राजमार्ग दिसत नाही. (१७ २२६)
>
> ज्या नामाच्या वाक्यांतील प्रयोगावरून त्याच्या अर्थाचे ठायीं वास्तविक किंवा काल्पनिक पुरुषत्वाचा बोध होतो त्यास पुल्लिंग म्हणतात. (१७ २२२)
>
> अर्थावरून लिंगनिर्बंध आणि व्युत्पत्तीवरून लिंगनिर्बंध हे दोन्ही मार्ग सारखेच निरुपयोगी होत.
>
> तो ती तें हीं व्याकरणातील पारिभाषिक लिंगांची निश्चित व सुगम चिन्हें होत. (१७ २२७)

एवढे सारे म्हणूनही अन्त्याक्षरांवरून किंवा प्रत्ययांवरून लिंगनिश्चितीचे नियम त्यांनी दिलेच आहेत.

ही सर्व विवेचने 'मराठी नामांची अंतर्गत पाहणी' या सदरात येतील. त्यांमध्ये 'लिंगनिश्चिती' हा जो शब्दप्रयोग आहे तो चकवणारा आहे. जीवसृष्टीतली लिंगे त्या शब्दप्रयोगात सुप्त किंवा प्रत्यक्षपणे सूचित असतात. दुसऱ्या बाजूने, नामांची भाषेतली लिंगे जी लोकव्यवहाराने निश्चित केलेलीच असतात, त्यांचा शब्दघटक अक्षरांशी कोठे मेळ बसतो का याचा शोध असतो. तर आणखी पुढे जाऊन या शब्दघटकांचे निसर्गदत्त लिंगाशी काही नाते आहे का, कल्पनेने आरोपित केलेल्या लिंगाचे जीवांच्या निसर्गदत्त लिंगाशी आणि ते दाखवणाऱ्या शब्दघटकांशी काही संबंध आहेत का असे एकात एक शिरणारे अनेक प्रश्न 'लिंगनिश्चिती'त अंतर्भूत असतात. अर्थातच कोणतेही एक उत्तर त्या सर्वांचे समाधान करू शकत नाही आणि म्हणून तुळपुळे म्हणतात त्याप्रमाणे, '...अमुक नामाचे अमुक लिंग का या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण आहे' असा निष्कर्ष निघतो.

या अडचणीतून मार्ग काढायचा तर भाषेतला आणि व्याकरणातला लिंगविचार म्हणजे काय हे आधी समजून घेतले पाहिजे. त्यासाठी पहिल्या प्रथम, जीविक लिंग आणि भाषिक लिंग यांचा मुळीच संबंध नाही असे मान्य करून सुरुवात करावयास हवी. हे पहिल्या क्षणी चमत्कारिक वाटेल. पण काही भाषांमध्ये भाषिक लिंगवर्गणाचा जीविक

लिंगांशी काहीच संबंध नाही ही वस्तुस्थिती आहे. भाषिकांनी 'लिंग' या भाषिक वर्गाच्या व्याख्या अशा केलेल्या आहेत :

> संलग्न शब्दांच्या वापणीवर ज्यांचा परिणाम दिसून येतो अशा नामगटांना लिंगवर्ग म्हणतात. लिंगव्यवस्था हे बिरुद मिळवायचे तर, हे वर्गण सर्वंकष असले पाहिजे आणि वर्गावर्गात फार छेद होता कामा नये. म्हणजे असे की प्रत्येक नाम कोणत्या तरी एका वर्गात पडत असलेच पाहिजे आणि काही थोडीच एकाहून अधिक वर्गात पडत असावीत. (हॉकेट १९७६ १८ २३१)
>
> वाक्यमेळ नियमित करणारा, नामांच्या वाक्यरचनासंबद्ध उपवर्गांचा संच अशी लिंग ची व्याख्या कदाचित योग्य होईल. (ग्लीसन १९७५ १९ २२७)

या व्याख्यांनुसार, लिंगे म्हणजे नामांचे वर्ग, त्यांचा संबंध वाक्यरचनेशी आणि त्यांची लक्षणे ठरायची ती वाक्यातल्या शब्दांच्या परस्परमेळावरून. 'कुत्रा काळा होता, पिलू पाणी पिते, काळी खुर्ची पडली' यांसारख्या वाक्यात कुत्रा, पिलू, खुर्ची यांची जैविक लिंगे माहीत असल्याचे कारण नाही. कुत्रा ऐवजी रंग, डाकू, हिजडा ही जीवदृष्टीने कोणत्याही वर्गातली, अन्त्यवर्ण अ ऊ आ असे कोणतेही असलेली, व्युत्पत्ती किंवा अर्थ यांचा परस्पर संबंध मुळीच नसलेली नामे पहिल्या वाक्यात वाक्यमेळ न बुलावता, वाक्यरचना न बदलता, येऊ शकतात. म्हणून आणि केवळ म्हणून ती चारही एका वर्गात पडतात – त्याला पुरुषवर्ग म्हणावे; कारण इतकेच की जीवसृष्टीत पुरुषलिंगी असलेल्यांची वाचक पुष्कळ नामे अशा वाक्यरचनेत असाच वाक्यमेळ सुरक्षित ठेवतात आणि म्हणून ती याच वर्गात आहेत.

एकेका वर्गातल्या अशा नामांमध्ये अर्थिक संबंधही काहीतरी असतो, पण केवळ अर्थिक, केवळ ध्वनिक (प्रत्यय, अंत्याक्षर वगैरे) असा मात्र नसतो. अशा नामांना एका गटात आणणारी सूत्रे अनेकविध असू शकतात. जैविक लिंग, सजीव - निर्जीव भेद, आकार, परिमाण, अमूर्तता - मान अशी काही अर्थिक संगतीची असतात पण इतर कित्येक संगतिशून्य, अनियमी अशी असतात. (१८ २३२)

लिंगवर्गांची संख्याही स्थिर नाही. काही भाषांत लिंग हा प्रकारच नाही; तर काहींमध्ये पंचवीस ते तीस लिंगवर्ग आहेत. कधी नामांच्या वचनांची आणि लिंगांची सांगड घालून आणखी वर्ग बनवतात. सामान्यतः तीन वर्ग बनवण्याकडे प्रवृत्ती असते हे खरे आहे – पण तो अबाधित नियम नाही.

लिंगवर्गांचा असा तात्त्विक विचार ध्यानात घेतला म्हणजे मराठीतल्या लिंग व्यवस्थेला 'बेबंद' किंवा 'मनःपूत' म्हणण्याचे कारण उरत नाही. कदाचित आपण वर्गणाचे मूलाधारच चुकीचे निवडले असतील असे म्हणून तीनलिंगी वर्गणात सारी

नामे बसवण्याचा अट्टाहास सोडावा लागेल; किंवा नामशब्दांच्या व्युत्पत्ती चुकीच्या असल्यामुळे अन्त्याक्षर- प्रत्ययांचे विश्लेषण चुकले असेल, अशा शक्यता मान्य करून वेगळ्या अंगांनी शोध घ्यावा लागेल. असा शोध दक्षिणी भाषांमध्ये घेता येतो.

३.३ तमिळ लिंगव्यवस्था

दक्षिणी भाषांच्या लिंगव्यवस्थेबद्दल, दक्षिणी भाषाकुळाचे 'प्रवर्तक' काल्डवेल यांनी लिहिले आहे : (काल्डवेल १८५६/१९७६ २०)

> भारत-युरोपीय भाषांमध्ये निर्जीव वस्तू आणि अमूर्त कल्पनांनासुद्धा लिंगभेद बहाल केलेले असतात...ही खास पद्धत म्हणजे भारत-युरोपीय मनाच्या अतिशय कल्पक आणि काव्यात्म स्वभावाची साक्ष आहे. त्यामुळेच महत्तर भेदांच्या पोटात तुल्यतेची तत्त्वे त्यांनी ठरली. अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींना केवळ सजीवताच नाही तर व्यक्तिरूपही मिळाले.
>
> उलट, सिथियन गटातल्या भाषांमध्ये...बुद्धिहीन आणि जीवहीन अशा सर्व वस्तू नपुंसक नामांनी दाखवतात. एवढेच नाही तर कोणतीच नामे – मानव-दर्शक नामेसुद्धा – आपली आपण पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी नसतात. म्हणून सर्वच नामशब्द नपुंसक किंवा लिंगहीन असतात. (२० २२० इ.)

भाष्यकारांपेक्षा मूळ भाषेतल्या व्याकरणकाराची साक्ष अधिक प्रमाण म्हणून याविषयीची 'तोल्काप्पियम'मधली 'शब्द' अधिकरणातली सूत्रे पुढे दिली आहेत :

१. मनुष्यवाचक शब्दांना उच्च-वर्ग [उच्चवर्गीय] म्हणतात.
   त्यांखेरीज इतरांना अवर्ग [वर्गहीन] म्हणतात.
   या दोन वर्गांमध्ये शब्द समावतात.

२. पुरुषदर्शक शब्द, स्त्रीदर्शक शब्द
   बहु–दर्शक शब्द धरून
   एकूण तीन भागातले शब्द उच्चवर्ग होत.

३. एकवचनी शब्द, अनेकवचनी शब्द हे
   दोन भागातले शब्द अवर्ग होत.

४. स्त्रीत्ववाचक, उच्चवर्गात असलेले,
   पुरुषत्व- अभाव सूचक नाम शब्द,
   देववाचक नाम शब्द,
   हे दर्शविणारी त्यांची त्यांची पदे नाहीत.
   पण उच्चवर्गाच्या भागातच त्यांना गणतात.

५. न् व्यंजन (अन्त्य) असलेले ते पुरुषदर्शक शब्द.

६. अन्त्य ळ् व्यंजन असलेले, ते स्त्रीदर्शक शब्द.

७. र् आणि प, मार् हे तीन अंती आलेले शब्द, बहुदर्शक होत.

८. एकवचनी (अवर्ग) शब्द तु रु दु अन्ती असलेले होत.

[उदा० वन्ततु (आलेलऽ) कूयिट्रु (गायिलऽ) कुळन्ताट्टु (पोरखेळ)].

९. अ आ व, हे अन्ती आलेले, तीन प्रकारचे बहुदर्शक शब्द होत. [करियन (माज्या) तिण्णा (खाद्यऽ) उणकुव (भक्षऽ)]

१०. (दोन वर्गांचे पाच भाग; ते दर्शविणारे अन्ती येणारे अकरा वर्णच क्रियापदांनाही लागून येतात.)

११. क्रियापदांती येणारे भागदर्शक शब्द आणि नामांती येणारे भागदर्शक शब्द, निराळे नसले पाहिजेत आणि रीतीप्रमाणे जुळणारे पाहिजेत.

१२. पुरुषत्व-अभाव सूचक (पेऽटि) शब्द पुरुषत्वदर्शक [वर्ण] जोडलेल्या शब्दाबरोबर येत नाही.

आपल्याला परिचित परिभाषेत सांगायचे तर तमिळमध्ये पाच लिंगभेद आहेत : पुल्लिंग एकवचन, स्त्रीलिंग एकवचन, या दोघांचे सामान्य अनेकवचन हे तीन उच्चवर्ग आणि एकवचन, अनेकवचन हे दोन अवर्ग. यांचे प्रत्यय अनुक्रमे

न्; ळ्; र् – मार् – प; तु – रु – दु; अ – आ – व.

हेच प्रत्यय क्रियाशब्दांनाही लागून वाक्यमेळ साधतो. या प्रत्ययांच्या मूळ स्वरूपासंबंधी काल्डवेल सांगतात :

> न् ळ् र् हे प्रत्यय, उच्चवर्ग नामांना लागतात ते खरोखरी तृतीयपुरुषी सर्वनामांचे किंवा दर्शक सर्वनामांचे खंड आहेत. तोच प्रकार अवर्ग नामांच्या प्रत्ययांचा. (२० २२२)

हेच प्रत्यय क्रियाशब्दांना लागतात, अर्थात क्रियापदांचे पुरुषवाचक प्रत्यय सर्वनामांचे अवशेष आहेत ही एक ध्यानात ठेवण्याजोगी गोष्ट आहे.

ही लिंगव्यवस्था मराठीत कोठे दिसते का ? आपण कुत्रे (कुत्रऽ) या शब्दाचे

उदाहरण घेऊ. याची व्युत्पत्ती संस्कृतवरून लागत नाही. ब्लोक यांनी ' हा शब्द संस्कृत कुक्कुरपासून भिन्न आहे; दोन्ही शब्द अनुकृतिमूलक किंवा बालभाषेतले आहेत ' असे म्हणून सोग्डियन कूत् आणि यग्नोबि कुत् यांचा उल्लेखही तुलनेसाठी केला आहे. खरे पाहता इतक्या दूर जाण्याचे कारण दिसत नाही. बालभाषेतला शब्द प्रमाणशब्द होत नसतो; उलट भाषेतल्या प्रमाणशब्दाला ' बालभाषेतला ' म्हणता येत नाही. केवळ बालपणीच वापरले जातात म्हणून तर ते बालभाषेतले म्हणायचे.

द १४१९	कुति	उडी मारणे
द १४२३	कुतिरै	घोडा

हे अर्थ विचारात घेण्यासारखे आहेत. घोडा हा भारतातला निवासी प्राणी नाही हे लक्षात घेतले तर ' उड्या मारणे, धावणे ' ही लक्षणे लागू पडणाऱ्या, कुत्रा या निवासी प्राण्याला कुतिरै हे अभिधान सार्थ लागू पडते हे पटेल. मधला इ हा अतिऱ्हस्व इ असल्यास, आणि एरवीहि उच्चारात, कुतिरै । कुत्‌रै । होतो. मराठी लिंगव्यवस्थेविषयी लिहिताना ब्लोक यांनी अशोकाच्या गिरनार शिलालेखात अन्त्य ऐ चा ए होऊन पुल्लिंगाचे नपुसकलिंग अर्थात लिंगाचे ' सामान्यीकरण ' होत असल्याचा उल्लेख केला आहे. तेच येथे होऊन कुत्‌रे असा शब्द होईल. किंवा कुत्‌रै > कुत्‌रय् > कुत्रऽ हा बोलभाषेतला पर्याय उपपादित होईल.

लिंगविचाराच्या बाबत महत्त्वाची गोष्ट ही की कुत्रऽ, कुत्रे हे जातिवाचक शब्द मूळचे असावेत. कुत्रा, कुत्री हे जैविकलिंगभेदाचे शब्द त्यातून नंतर निघाले असले पाहिजेत. या संदर्भात, काल्डवेल यांचे प्रतिपादन असे :

> किंबहुना, असा नियमच सांगता येईल की, सगळी आद्य द्रविड नामे लिंगहीन आहेत; आणि लिंग कल्पना ज्यांच्यात उपचारतः व्यक्त झाली आहे असे प्रत्येक नाम किंवा सर्वनाम हे समासशब्द असल्याने, अवश्यमेव असमासी आदिशब्दांच्या उत्तरकालीन असले पाहिजे. (२० २२२)

म्हणून दामले यांनी जे म्हटले आहे की ' ज्या नामांची रूपे लिंगानुसार बदलतात त्याच शब्दांचे मूळ रूप पुल्लिंगी होय असे समजावे ' ते लागू पडत नाही. आजही ग्रामीण बोलभाषेत कुत्रऽ हे एकवचन आणि कुत्री हे अनेकवचन यांचाच प्रयोग मुख्यतः होत असतो. तुळपुळे यांनी हीनत्वदर्शक नपुसकलिंगाचा उल्लेख केला आहे, हे हीनत्व तर तमिळोद्भव लिंगव्यवस्थेच्या पायवीतच पुजलेले आहे; कुत्रे – कुत्रऽ हे अवर्ग नाम आहे, उच्चवर्ग नाही यात ते आलेच. हीनत्वाचा मराठी प्रत्यय डा– डू– डे– डऽ, अर्थात ' ड् + स्वर ', हाही तमिळ अवर्ग एकवचनाचा प्रत्यय दु । डु । याचाच मराठी अवतार दिसतो. शेरडू, करडू, गावाड (गाय वरून) घोडऽ म्हसाड (म्हैस

वरून) या प्रमाण किंवा ग्रामीण शब्दांत तो दिसतो. वाघरू यासारख्या शब्दात रु हा दुसरा प्रत्यय दिसतो.

'बैलऽ पाण्यावर गेली' असा नपु० अ० व० प्रयोग बैल या पुल्लिंगी नामाला अनुलक्षून आल्याला ले ऐकाऐकात ऐकू येईल. गुरऽ, पोरऽसोरऽ, मास्तरऽ असे जे लांबवलेल्या अकारान्ताचे उच्चार मराठी बोलीत आहेत त्यांचे मूळ तमिळ अवर्ग नामांच्या अनेकवचनाच्या अ प्रत्ययात आपल्याला सापडेल. तमिळमध्ये व्यंजनान्त शब्दांचे अस्तित्व कायम असल्यामुळे अकारान्त शब्दाचा उच्चार नेहमीच दीर्घकृत होतो. तोच प्रकार मराठीत दोन तऱ्हांनी उतरला आहे. एक म्हणजे अन्त्य व्यंजनाचा उच्चार पूर्ण व्यंजनासारखा होणे (नव्या शुद्धलेखनाने जगत् मधल्या त् चे लेखन त असे करण्याचा नियमच केला आहे) आणि दुसरा : पूर्ण व्यंजनाचा उच्चार दीर्घावणे.

गाय–गाया, बात–बाता, थाप–थापा यांसारख्या अनेकवचनातला आ प्रत्यय तमिळमध्ये आहेच. तुळपुळे यांनी व या प्रत्ययाचे उदाहरण 'जीवपशुवे' या 'ऋद्धिपूर वर्णन' मधील शब्दाचे दिले आहे. त्यांच्या लिंगबदल यादीत पशु पासून पसुवा हे स्त्रीलिंगी रूप झाल्याचे दिले आहे. तमिळमध्ये गाय या अर्थी पसु अर्थात पशु हा शब्द रूढ आहे हे येथे सांगणे उचित ठरेल. आणि उच्चारसुखासाठी उकारान्त शब्दापुढे व येतो हे सेतुपिळ्ळै यांनी दाखविलेच आहे.

'लिंगभेद दाखवणारे प्रत्यय हे सर्वनामांचे अवशेष आहेत' हे तमिळबाबतचे म्हणणे मराठीतही आपल्याला क्रियापदांच्या संदर्भात अनुभवाला येईल. येथेच 'चक्रधर-स्वामी स्वतःचा उल्लेख नेहमी 'हें' या नपुसकलिंगी दर्शक सर्वनामाने करतात' (२ २१३) याचे स्पष्टीकरण करण्यासारखे आहे. प्राचीन तमिळमध्ये 'मी' या अर्थी एऽन् हे सर्वनामरूप प्रचारात होते. या एऽन् चे महाप्राणयुक्त रूप हेऽन् आणि त्यातून हें असे होणे साहजिक वाटते.

तमिळमध्ये आडु [शेळी] माडु [बैल] यांसारखी अवर्ग नामे वाक्यात आली असताना त्याचे जैविक लिंग दर्शविण्याचा प्रसंग पडला तर नर मादी किंवा तो ती या अर्थाचा उपसर्ग लावला जातो; पण वाक्यातला इतर मेळ किंवा नामासाठी येणारे सर्वनाम ही सर्व अवर्गाला अनुरूप असीच राहतात. देशकालपरत्वे उपसर्ग जोडण्याचा प्रघात उद्भवला किंवा टिकून राहिला नाही तर मराठीतल्याप्रमाणे मूळ अवर्ग नामच पुल्लिंगी किंवा स्त्रीलिंगी नामाच्या रूपात वापरले जाईल आणि वाक्यमेळ मात्र कालांतराने लिंग-भेदास अनुसरून ठेवला जाईल. असे झाले असल्यामुळेच मराठी लिंगव्यवस्थेत तथा-कथित बेबंदपणा दिसत असावा –कारण शब्दाच्या अंती अनेक वर्ण येऊ शकतात-आणि मग ठरीव प्रत्ययांमुळे येणारी नियमिता नाहीशी होते.

पुल्लिंगाचा दर्शक आ आणि स्त्रीलिंगाचा दर्शक ई असे प्रत्यय मराठीत अनेक शब्दांमध्ये येतात. तमिळमधील पुल्लिंगाचा अन्त्य न् हा –अन् –आन् –ओन् यांच भाग असतो आणि ही तिन्ही अवन् = तो या सर्वनामाची रूपे आहेत. चेयुतिकारन् (शेतकरी) असा नामशब्द घेतला तर संबोधनात तरी त्याचे रूप चेयुतिकारा असेच होते, म्हणजे अंती आ येतो. ते प्रथमेचे व त्यामुळे ' मूळरूप ' होणे ही पुढची पायरी. –आन् प्रत्ययी शब्दातले अन्त्य व्यंजन प्राकृत अपभ्रंश आदि मार्गांच्या संपर्काने का होईना गाळले गेले तर पुन्हा अंती आ हाच प्रत्यय उरतो. –ओन् च्या बाबतीत असाच न् चा लोप होऊन प्राचीन मराठीतल्या ओकारान्त रूपांची सिद्धी होते. स्त्रीवाचक ई तमिळमध्ये सुद्धा आहे आणि तो संस्कृतातून आला आहे असे काल्डवेल सांगतात.

या सर्व पार्श्वभूमीवर ब्लोक यांनी सजीव-निर्जीवांच्या आधारे बदलणाऱ्या वाक्य-मेळाचा जो उल्लेख केला आहे त्याचीही पीठिका कळू शकते. अवर्ग नामशब्दांना विकार होऊ नये ही एक, तर सजीवांची लिंगव्यवस्था वाक्यमेळात प्रकट व्हावी ही दुसरी, अशा परंपरांच्या परस्पर ताणामधून ही विकल्पी रचना वदयाला आली असावी.

अखेरीस एका कालभेदी मुद्द्याचा उल्लेख करू. अवर्ग नामांचे दर्शक प्रत्यय तमिळ आणि मराठीत सारखेच आहेत. स्त्री–पुल्लिंगांच्या प्रत्ययांबद्दल तसे सर्वांशी म्हणता येत नाही. आदिमभाषेत सर्वच नामे एकलिंगी अर्थात अवर्ग होती असे मान्य केले तर याचा उलगडा होईल. अवर्गाचे प्रत्यय आदिमभाषेच्या दोन्ही शाखांत तेच राहिले, स्त्री-पुल्लिंगाचे काही प्रत्यय मात्र दोन्ही शाखांनी आपापले विकसित केले असा त्याचा अर्थ होईल. हे सर्व विवेचन मानीवाच्या स्वरूपाचे आहे तरी, मराठी आणि तमिळमधील या प्रत्ययांची मुळे पद्धतशीरपणे शोधून काढल्यावर निश्चित सिद्धांत करणे शक्य होईल.

३.४ क्रियापदांचा रूपविचार

क्रियापदांची रूपे हे भाषेच्या रूपिकांचे प्रधान अंग असते. मराठीतली ही रूपे संस्कृत– प्राकृत– अपभ्रंश या रूढ मार्गानेच व्युत्पादित करण्यात आलेली आहेत. मूळ धातू, त्याला लागणारे पुरुषवाचक, काळवाचक आणि विविध अर्थवाचक प्रत्यय यांची घटना संस्कृतच्या आधाराने करताना अनेकानेक युक्तींचा अवलंब करावा लागतो. त्यामध्ये एकसूत्रता दिसत नाही. मराठी धातूचे मूळ कधी धातुबीजावरून, कधी धातु-साधितावरून तर कधी क्रियारूपावरून काढले जाते. पुरुषवाचक प्रत्ययांच्या संस्कृत, प्राकृत आणि मराठी रूपामध्ये साम्याचा किंचित धागा असतो. ' साम्य ' या एका मापाशिवाय अधिक तर्कसंगती त्यांत स्पष्टपणे दिसत नाही. काळवाचक प्रत्ययांपैकी,

भविष्यकाळी ल ची संस्कृतवरून फोड होत नाही. भूतकाळाच्या बाबत धातुसाधितांवर अवलंबून राहणे भाग पडते.

या एकाच बाबतीत मात्र ब्लोक यांनी दक्षिणी भाषांच्या प्रभावाचा ओझरता उल्लेख केला आहे.

> संस्कृतमधील नामविधेय वाक्यांमुळें धातुसाधितांचा अधिकाधिक उपयोग होणे क्रमप्राप्त झालें; म्हणजे दिसावयाला नामरूपें, पण अर्थ क्रियापदाचा अशा या रचनेचा विशेष हा कीं जीं क्रियापदें प्रचारांतून जाऊ लागली होती त्यांच्या जागीं हीं नामरूपें येऊं लागलीं. हीं धातुसाधितें –त, –तव्य, –तवत्, हे प्रत्यय अंतीं येणारी असत... (त, –तव्य यांचीं) रूपें अजूनपर्यंत शिल्लक राहिलीं आहेत आणि याचें कारण असे की अलीकडील भाषांत भूतकाळ आणि विध्यर्थ (किंवा भविष्यकाळ) यांचा अर्थ असलेली अनेक रूपें त आणि तव्य यांनी झालेल्या धातुसाधितापासून झालेली आहेत...
>
> वर्तमानकालवाचकाचा हा जो नवीन उपयोग होऊ लागला त्याला जी अनुकूल कारणें झाली त्यांत दोन प्रामुख्याने दिसतात. एक...आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे ती ही की द्राविडी क्रियापदाचें रूप म्हणजे मुख्यत्वें-करून धातुसाधिताला तृतीयपुरुषी सर्वनामाप्रमाणे लिंगवचन असलेल्या सर्वनामप्रत्ययांनीं युक्त असे असते. (१ २८६–८८).

अधिक खोलात जाता असे दिसेल की या उद्धृतात आलेले तीनही मुद्दे मराठीतल्या क्रियापदांची सिद्धी दक्षिणी भाषांतून करून देतात. आणि ती सिद्धी अधिक सरळ आहे. उदा० (संस्कृत) धातु – धातुसाधित : (मराठी) नामरूप – नामधातू असा संस्कृत ते मराठी प्रवास करण्यापेक्षा सरळ, (दक्षिणी) नामधातू : (मराठी) नामधातू अशी दक्षिणी–मराठी जुळणी आपल्याला दिसते. तोल्काप्पियातील शब्द अधिकरणातल्या पुढील सूत्रांमध्ये नाम-धातु-अभेद सांगितला आहे :

१५५. सर्व शब्द वस्तू दर्शवितात.

१५८. शब्द म्हणून म्हणतात ते नामशब्द आणि क्रियाशब्द असे दोन प्रकारचे, असे जाणते सांगतात.

१९८. क्रियाशब्द (विनै) म्हणतात त्याला विभक्ती नसते; तो काळ मात्र दर्शवितो, काळ-वाचकासह येतो.

२०१. काळ-सूचक शब्दाने (क्रियाविशेषणाने वगैरे) किंवा क्रियाशब्दाने

नियमानुसार काळ दर्शविणारी सर्व क्रियापदे तीन प्रकारांत मोडतात : उन्चवर्गी, अवर्गी आणि उभयवर्गी.

उदा० तमिळ वाळ्-तल् म्हणजे असणे, जगणे, वाढणे वगैरे. यातल्या वाळ् लाही व्यवस्था असा वेगळा अर्थ आहे. -कै हा भाववाचक प्रत्यय लागून वाळ्क्कै = जीवन. वाळ्-तल् चे प्रयोजक वाळ्त्तु-तल् = आशीर्वाद देणे, अभिनंदणे. यातल्या वाळ्त्तु चे नामशब्दस्वरूप त्याच्या प्रत्ययावरून दिसते. 'जय हो' या अर्थी 'वाळ्क्क' असा घोष करतात. (वाढावे, मोठे व्हावे या अर्थी.) काळवाचके वाळ् ला लागून क्रियारूपे होतात. धातुसाधितांमधला म्हणून जो त उद्धृतात सांगितला आहे तो तमिळमध्येही आहेच. 'वाळ्न्त' हे 'वाळ्' चे धातुसाधित. याला 'अवन्' = तो असा प्रत्यय लागून वाळ्न्तवन् = जगलेला असे धातुसाधित सर्वनाम होते. पण ही केवळ म्हणण्याची रीत झाली. 'तो जगला' असाही याचा अर्थ असल्याने तोच शब्द क्रियाशब्दही आहे. 'ते वाढणार.' किंवा 'वाढणारे ते' [ते हे तो चे अ० व०] या अर्थी 'वाळ्वार्' असे भविष्यकाळी तृ० पु० ए० व० रूप होते. उदा० शेतीविषयीच्या एका कुरळांत म्हटले आहे : 'उळुतुण्डु वाळ्वारेऽ वाळ्वार्...नांगरे जगणारे जगणार !' अशाच धातुरूपातून 'पोऽ = जाणे यावरून पोऽवार् = जाणारे' त्यावरून 'पोबारा = पलायन' हा मराठी शब्द आला.

याहूनही अधिक साम्य मराठीतल्या पुरुषवाचक प्रत्ययांच्या बाबतीत दिसते. नामांच्या लिंगविचारात आपण पाहिले की तमिळमध्ये लिंगवाचक प्रत्यय हे तृतीयपुरुषी सर्वनामांचे अवशेष आहेत. अगदी तसेच, क्रियापदांचे सर्वकाळी पुरुषवाचक प्रत्यय हे त्या भाषेत पुरुषवाचक सर्वनामांचे अवशेष आहेत. धातूच्या साधित रूपाच्यापुढे ते लागतात आणि त्या भाषेचे चिकटू स्वरूप सार्थ करून दाखवतात. याच व्यवस्थेचा दुसरा परिणाम म्हणजे, कर्ता नसला तरी (संस्कृतप्रमाणेच) क्रियापदाचा पुरुषवाचक अर्थ स्पष्ट होत असतो.

आता तमिळ आणि मराठी वर्तमानकाळी प्रत्ययांची तुलना करू. संदर्भासाठी तोल्काप्पियातली याविषयीची सूत्रे प्रथम घेऊ :

२०२. उन्चवर्गाच्या प्रथमपुरुषी अनेकवचनी रूपांमध्ये अम् आम् एम् एऽन् आणि कुम् डुम् तुम् रुम् हे प्रत्यय असतात.

२०३. कु डु तु रु एन् एऽन् अल् हे सात प्रत्यय लागलेले क्रिया-शब्द प्रथमपुरुषी एकवचनी असतात.

२०५. अन् आन् अळ् आळ् हे चार तृतीयपुरुषी एकवचनाला लागणारे प्रत्यय आहेत.

२०६. अर् आर् प हे तीन तृ० पु० अ० व० प्रत्यय होत.

२११. विभाग [लिंग] दर्शविणाऱ्या तीन प्रत्ययांतील आ, काव्यात ओ होतो.

२१६. अ आ व हे तीन अवर्गाचे तृ० पु० अ० व० प्रत्यय आहेत.

२१७. तु रु दु हे तीन अवर्गाचे तृ० पु० ए० व० प्रत्यय होत.

२२३. इ ऐ आय् हे तीन उच्चवर्ग आणि अवर्ग दोघांच्याही द्वितीय-पुरुषी एकवचनाचे प्रत्यय होत.

२२४. इर् ईर् मिन् हे उच्चवर्ग आणि अवर्ग या दोघांच्याही द्वितीय-पुरुषी अनेकवचनाचे प्रत्यय आहेत असे आगते सांगतात.

प्राचीन तमिळमधले हे प्रत्यय मराठीतल्या प्रत्ययांशी ताडून पाहता येतात. यातले काही प्रत्यय आपल्याला लोकभाषेत सापडतात. उदा० तु हा प्र० पु० ए० व० प्रत्यय 'मी जातु, मी हसतु' अशा रूपांमध्ये आपल्याला लोकात ऐकू येतो. 'मी जातो-जातों' ही नागर रूपे आहेत. म् किंवा न् अंती असलेले प्रत्यय मराठीत अनुस्वारान्त होऊन वापरात होते. आम्– आं हा प्र० पु० अ० व० प्रत्यय. त्याचाच वरीलपैकी २११ सूत्रानुसार ओं होऊन तो 'जातों' या रूपात प्रमाण मराठीत आहे. अ या प्रत्ययाचा विनियोग मराठी शब्दाचे अन्त्य स्वरान्तव्यंजन दीर्घ उच्चारण्याकडे होतो हे नपुसक-लिंगाच्या प्रत्ययांमध्ये आपण पाहिलेच. त्यामुळे 'कुत्रऽ सुकतऽ' यात शेवटी वरचे सूत्र २१६ नुसार अ हा प्रत्यय मानता येतो.

आता ग्रंथभाषेशी तुलना करू. त्यासाठी तुळपुळे यांच्या ग्रंथातील यादव-मराठीची तालिका, उदाहरणासह वापरू (२ २८१) येथे तुलना फक्त तमिळ आणि मराठी प्रत्ययांचीच करावयाची आहे.

		यादव-मराठी	तमिळ		उदाहरण
प्रथम :	ए० व०	एं ईं एँ	एन् एऽन्	[एं, एंऽ]	पाहें
	अ० व०	ओं ऊं औं	आम् – ओम्	[ओं]	
			कुम् डुम	[ऊं]	धरूं
द्वितीय :	ए० व०	अस असि इसि एसि सि	इ ऐ आय्	[= सि]	आइकसि पाहेसि

[इ = सि हे समीकरण दक्षिणी भाषांतल्या आद्य च । स । चा लोप होतो असा जो नियम आहे त्याच्यावरून अतिदेशाने.]

	अ० व०	आ आं	इर् ईर् मिन्	रालां

तृतीय :	ए० व०	ए ई ऐ	अन् आन् अल् आल् तु र ई
	अ० व०	अति इति एति ति	अर् आर् प अ आ व

ही तुलना पाहिल्यावर अगदी उघड अशी जी साम्यस्थळे आहेत ती सहज दिसून येतात. या ना त्या संस्कृत रूपावरून मराठी रूपांची सिद्धी दाखवण्याची भाषिकांची रूढ पद्धत लावून तमिळ धातुपाठाची मराठी क्रियापदांशी तुलना केली तर इतर काळांच्या प्रत्ययांमध्ये अशी साम्ये दाखवता येतील. येथे आणखी दोनच गोष्टींचा उल्लेख करू. 'यादव-मराठीतील वर्तमानकाळाच्या रूपांचा अर्थ संदर्भानुसार वर्तमान, भूत किंवा भविष्य असा कोणताही होतो' असे तुळपुळे म्हणतात (२ २८२). याच्याशी तोल्काप्पियातील पुढील दोन सूत्रांची तुलना करावी :

(शब्द) २४७. भूत आणि भविष्य काळांची रूपे एकमेकांच्या जागी वापरल्यास ठीक वाटतील.

२४८. वर्तमानकाळही असा बदलून वापरण्यास अडथळा नाही.

काळदर्शक प्रत्ययांची बंधने दृढ नव्हती हे यावरून कळते. किंबहुना तमिळमध्ये लकारान्त जे धातुरूप आहे ते अशा कामी फारच उपयोगी पडते. मराठी भविष्यकाळात ल येतो, स चा कोठे मागमूस नाही ही गोष्ट संस्कृताधार क्रियापदरूपे मूळ मानण्याच्या बरीच विरोधी आहे. त्या भविष्यकाळाची उकल, तसेच ल् कारान्त भूतरूपांच्या अस्तित्वाची फोड, या लकारान्त तमिळ रूपावरूनच उत्तम प्रकारे होईल. उदा० चेय् > चेय्यल् = करणे. वा > वरल् = येणे यावरून 'आम्' प्रत्ययान्त अनुज्ञार्थी काळ प्राप्त होतो : 'नान् वरलामा ?' = 'मी येऊ का हो ?' त्याचप्रमाणे –तल्, –त्तल् हे तर धातु-रूपांचे भेदक प्रत्यय आहेतच.

तमिळ आणि मराठी क्रियापदांमध्ये मूलभूत साम्ये आहेत असे यावरून दिसून येईल. 'मी करेन' यांसारख्या रूपातला एन हा भविष्यदर्शक प्रथमपुरुषी प्रत्यय सरळ एऽन् या तमिळ सर्वनामाचा आणि प्रत्ययाचा अवतार वाटतो. पुरुषवाचक प्रत्यय सर्वनामांचे अवशेष आहेत हा निष्कर्ष एकूणच मराठी व्याकरणाला फार उपयोगी ठरेल.

आता संस्कृत आणि मराठी यांच्यामधली जी भाषेची अवस्था भाषिकांनी मानली आहे तिचा दक्षिणी भाषांशी संबंध तपासून पाहू.

म...५

३.५ अपभ्रंश आणि तमिळ

तुळपुळे यांनी ' अपभ्रंशाचा वारसा ' या मथळ्याच्या अधिकरणात ' यादव मराठीचा अपभ्रंशाशी दुवा जोडून दाखविण्यासाठी ' भाषेच्या पंचांगाला अनुसरून प्रमाणे दिली आहेत. त्यांचा इत्यर्थ ते सांगतात :

> आतापर्यंतच्या विवेचनावरून मराठी व अपभ्रंश यांच्यातील जन्यजनक-संबंध स्पष्ट होईल. विशेषतः ध्वनिव्यवस्था आणि रूपव्यवस्था ही जी भाषेची प्राणभूत अंगे ती मराठीने अपभ्रंशापासून घेतली. (२ ६३)

त्यांनी दिलेली प्रमाणे आपण दक्षिणी भाषांच्या संदर्भाने तपासली तर असे दिसते की ' अपभ्रंश 'ऐवजी ' तमिळ ' हे भाषानाम घातले तरी ती बहुतेक सारी सिद्धच होतात ! मराठीच्या मुळाशी जायचे तर अपभ्रंशाच्याही मागे किंवा मुळाशी गेलेच पाहिजे. त्या दृष्टीने या प्रमाणांची तमिळवरूनची सिद्धी आपल्याला भूतकाळात आणखी मागे घेऊन जाते. या जिज्ञासू विचारानेच पुढे नमूद केलेली साम्ये लक्षणीय आहेत. तुलनेसाठी संदर्भग्रंथातले नोंदींचे क्रमांक कायम ठेवले आहेत.

(१) संस्कृत ऋ च्या अ, इ आणि उ या प्रक्रिया.

> – या शब्दांच्या व्युत्पत्तीच मुळापासून तपासायला पाहिजेत. बहुतेकांचे मूळ तमिळमध्ये जास्त सुलभपणे सापडेल. ऋ हा स्वर तमिळेतही नाही.

ध्वनिव्यवस्था : (२) अंत्य स्वरांचे ऱ्हस्वीकरण. संस्कृत अंत्य स्वरांच्या ऱ्हस्वीकरणाला प्रारंभ प्राकृतकाळी झाला...यादव – मराठीत अंत्य स्वराचे ऱ्हस्वीकरण असून त्याचा लोप होण्याला प्रारंभ झालेला आहे.

> –तमिळमधील स्वरान्त शब्दांतला अन्त्यस्वर नेहमीच ऱ्हस्व असतो. मराठी शब्दात त्यांचा लोप किंवा बदल होतो हे मराठी ध्वनिकाशी संबंधित आहे आणि त्याचे नियम असवता येतील.

(३) संस्कृतमधील संयुक्त स्वरांचा संक्षेप किंवा विश्लेष होणे. (ऐ > ए, औ > ओ अऊ).

> तमिळमध्ये असा विश्लेष शास्त्रमान्यच आहे. वर्ण अधिकारातील सूत्रे ५४ ते ५८ पहावी. ध्वनिकाचा हा नियम अइ = ए, अउ = ओ या स्वरूपात खगोलगी मांडता येईल.

(४) निकटवर्ती अ स्वरांचा संधी.

—अशा शब्दांची मूळरूपे तमिळवरून शोधली तर हा नियम पुन्हा तपासून घ्यावा लागेल.

(५) य- श्रुती आणि व- श्रुती.

— यांची अनेक उदाहरणे लोकभाषेच्या विभागांमध्ये दिलीच आहेत.

(६) नामे व्यंजनान्त न ठेवता स्वरान्त करणे.

— ही प्रवृत्ती तमिळमध्ये आहे. तमिळचा उच्चार तमिळु असाही होतो.

(७) द्विस्वरान्तर्गत व्यंजनलोप.

— उदा० लोक, भाषा प्रकरणातील नियम ५२ पहावा.

(८) आद्य व्यंजने अविकृत राखणे.

(९) कठोर व्यंजने मृदू करणे.

— दोन स्वरांमध्ये येणाऱ्या कठोर व्यंजनांचे मृदूकरण हा तर तमिळचा नियमच आहे.

(१०) य>ज श>स यांच्यासारख्या प्रक्रिया.

— या प्रक्रिया उत्तरी, दक्षिणी सर्वच भाषांतून आढळतात.

(११) स्वरभक्ती किंवा विश्लेष यांचे प्राबल्य.

— तोल्काप्पियात याचे नियमच दिले आहेत. लोकभाषेत तर हे सर्रास होत असतात.

(१२) विविध व्यंजनसंयोगांना होणारे विकार.

— यांच्या बाबतीत तमिळ - मराठी साम्ये याच प्रकारची आहेत.
रूपव्यवस्था : (२) पु. अकारान्त नामाच्या प्रथमेच्या अनेकवचनी
प्रत्ययाचा लोप अपभ्रंशाप्रमाणेच आहे. (सं. पुत्राः > प्रा. पुत्ता > अप.
पुत्त > म. पूत)—व्युत्पत्ती, ध्वनिक आणि रूपिक यांच्या मिश्र पण पूर्व-
निश्चित उपयोजनाचे हे एक चांगले उदाहरण आहे. पुत्र या शब्दाचा मूलार्थ
संस्कृतवरून मिळत नाही हे प्रसिद्धच आहे. निरुक्तात (१२ १०९)
तीन ' व्युत्पत्ती ' आहेत :

पु = पुरु. त्रः = त्रायते जो सर्वपरी आईबापांचे रक्षण करतो तो.

नि + पृ = पिंड देणे. या पृ धातूपासून पुत्र शब्द झाला असेल. मुलगा पितरांना पिंड देतो म्हणून.

पुत्रः = पुत् + त्रः । पुत् हे एका नरकाचे नाव आहे. त्या नरकापासून पुत्र आईबापाचे रक्षण करितो.

ही सर्व स्पष्टीकरणे, सहेतुक काढलेली अशी आहेत. नरक, पिंड वा कुटुंब या संकल्पना समाजात उद्भवण्याच्या आधीच हजारो युगे आयांना मुलगे होत होते. तद्वाचक शब्द नक्कीच काही वेगळ्या अर्थाचा असला पाहिजे.

द ३५११ पुतु नवीन.

पुत्तन् नवीन व्यक्ती किंवा वस्तू

यातल्या पुत्त वरून पूत, पुता हे सार्थ शब्द आले असले पाहिजेत. अर्थातच ' पुत्राः ' हे रूप आणि त्याला आरंभस्थान धरून काढलेली अनुमाने जरूर नाहीत.

(८) यादव-मराठीतील अनेकवचनी अनुनासिकाचे मूळ अपभ्रंशातील तृतीया, षष्ठी व सप्तमी यांच्या सानुनासिक अनेकवचनी रूपांत आहे.

—लिंगविचार या भागात अनेकवचनाचे प्रत्यय दिलेच आहेत. त्यांच्यावरून या अनुनासिकाचा सरलबोध होतो; विभक्तिरूपांवरून मूळ रूपाकडे असा उलटा प्रवास करावा लागत नाही. याशिवाय, तमिळ बोलीभाषेतले एक साम्य सांगण्यासारखे आहे. लेखभाषेत अनेकवचनाचा प्रत्यय-कळ् असा आहे; तरी बोलीत मात्र —ङ्क असाही तो प्रत्यय लावला जातो. मनितन् = मनुष्य, मनितङ्क = मनुष्ये. यात अनुनासिकाचे अस्तित्व आहे.

(१२) मराठीतील संख्यावाचक, क्रमवाचक व अंशवाचक विशेषणांचे अपभ्रंशातील त्या त्या प्रकारच्या विशेषणांशी विलक्षण साम्य आहे.

—मराठीतला मुद्दल [= पहिले] हाच शब्द मुदलात तमिळ आहे.

(१३) यादव-मराठीतील विशेष्यनिघ्न (विशेष्याप्रमाणे चालणाऱ्या) विशेषणाची प्रथा अपभ्रंशोद्भव आहे.

—" मुळात तमिळ विशेषणशब्द हे तु० पु० अ० व० गुणनामशब्द होते. आधुनिक भाषेत त्यांची पुरुष-लिंग-वचन लक्षणे लोपली, रूपबदलही नाहीसा झाला आणि फक्त गुणवाचकता राहिली. उदा० प्राचीन पेरिय = मोठ्या वस्तू; आता पेरिय = मोठे. ' —आन्द्रानोव. तमिळ व्याकरण.

क्रियापदे : (२) (५) अपभ्रंशात वर्तमान, (क्वचित्) भूत व भविष्य हे तीन काळ आज्ञार्थ व विध्यर्थ याप्रमाणे एकूण पाच रूपे आहेत. धातुसाधिते वापरून क्रियापदाचे रूप साधण्याची पद्धती मराठीने अपभ्रंशापासूनच घेतली.

—या दोन्ही बाबी तमिळमध्ये अशाच आहेत.

(४) प्रयोजकार्थी रूपांचा अव प्रत्ययही अपभ्रंशद्वाराच सिद्ध होतो.

— तमिळमध्ये '-व 'ने प्रयोजके साधतात. निर = भरणे. निरवु = भरविणे. म्हणजे, प्रत्यय अव नसून व असावा.

शब्दसिद्धी (२) यादव मराठीत भाववाचक नामे ज्या प्रत्ययांनी सिद्ध होतात त्यापैकी —एँ —इव —ई —पण आणि—पे हे प्रत्यय मूळचे अपभ्रंश होत.

—ऐ—अन्त भाववाचके तमिळमध्ये असतात. प्पै, प्पु हेही भाववाचकाचे प्रत्यय आहेत. त्यांचा संबंध मराठी प्रत्ययाशी जुळतो.

(३) नादानुकारी शब्द व्यापक प्रमाणावर बनवण्याची प्रथा अपभ्रंशातून आली. मात्र अपभ्रंशातील तिचा अतिरेक मराठीत नाही.

—मराठीतले अनेक नादानुकारी शब्द तमिळमध्ये तसेच्या तसे आहेत.

द ९३० कटकट द १४०५ कुचुकुचु.

(४) यादव मराठीने द्विरुक्त शब्दांचे प्रकरण बव्हंशी अपभ्रंशातून घेतले.

—हे प्रकरण तमिळमध्ये फार मोठ्या प्रमाणावर आहे. आणि ते शब्द मराठीत तसेच आले आहेत. द २५४९ तळतळ = तळपणे. द ३१७९ पटपट— द ३९७८ मिणुमिणु = कुलकुलणे.

(५) नामधातू व क्रियानामे तयार करण्याची प्रथा अपभ्रंशाच्या द्वाराच आली.

—या प्रथेचा उदय तमिळमधला आहे हे मागे सांगितलेच आहे.

(६) यादवमराठीने स्वरसंधी विकल्पाने करण्याचा गुण अपभ्रंशापासून घेतला.

—तमिळमध्ये स्वरसंधी सुलभतेला अनुसरून होतात. संस्कृतप्रमाणे काटेकोर नियमांनी होत नाहीत. पुलिक्कु + आक = पुलिकाक [वाघासाठी.]

ही साम्ये अगदी सहज दिसणारी आहेत. ज्या बाबी येथे विचारात घेतल्या नाहीत त्यांचेही मूळ तमिळसारख्या दक्षिणी भाषांमध्ये सापडेलच पण त्यासाठी थोडी जास्त स्पष्टीकरणे द्यावी लागतील : उदा० संकेतार्थी रूपे वगैरे.

मराठीचे मूळ शोधण्याच्या प्रयत्नात अपभ्रंशाशी न थांबता अपभ्रंश आणि दक्षिणी भाषा यांच्या तुलनेच्या वाटेने प्राचीनतर काळात जाता येईल हे निश्चित.

३.६ देश आणि काल

दोन भाषा किंवा भाषाकुळे यांचे परस्परसंबंध किंवा परिणाम निरखताना त्यांच्या प्रदेशिक जवळिकेला भाषिकात बरेच महत्त्व देण्यात आले आहे. एकाली दृष्टीने पाहता हे योग्यच आहे. आज ज्या दोन प्रदेशांत दोन वेगळ्या भाषा बोलणारे लोक राहतात ते एकमेकांना लागून असले तर सीमाप्रदेशातल्या लोकांच्या भाषेवर या जवळिकेचा परिणाम होतो आणि तो जेवढ्या मानाने प्रभावकारी असेल त्या मानाने दोन्ही भाषा बोलणाऱ्या लोकांच्या प्रदेशांत पसरतो. येथे भाषा, लोक आणि प्रदेश या तीन वेगळ्या संहती धरल्या आहेत. यातून भाषा आणि प्रदेश यांचे अतूट संबंधित्व नसते हे मुख्यत सुचवायचे आहे. कारणही सरळ आहे. भाषा लोकांची असते; लोक प्रदेशाशी विशिष्ट काळी निगडित असले तरी सर्वकाळी असत नाहीत, त्यामुळे ते स्थलांतर करतील तशी भाषा स्थलांतर करते. अमुक प्रदेशातल्या लोकांनी स्थलांतर केले नाही तरी तमुक प्रदेशातले लोक आपली भाषा घेऊन येऊन अमुकांच्या भाषेवर परिणाम घडवून आणू शकतात.

हे सर्व, भाषिकांनी मानलेले आहे. पण त्याचा वापर मात्र सर्वदा सुसंगत रीतीने झालेला नाही. मराठीची जननी संस्कृत भाषा बाहेरून आली हे मान्य; पण दक्षिणेकडून कन्नडचा काय प्रभाव पडला असेल तेवढाच...संस्कृत गंगथडीवरून भीमथडीला आली आणि मधल्या मुलखातल्या काही भाषांचे साम्य मराठीशी नसून किनारपट्टीच्या कोंकणीशी आहे याने भाषिक तत्त्वांना बाध येत नाही; पण मराठीचा आणि तमिळचा संबंध कसा असेल ? त्यांच्यामधे तर कन्नडसारख्या भाषा आहेत !...आर्यलोक आपली भारतयुरोपीय भाषा घेऊन निघाले आणि पृथ्वीच्या गोलाचा सहावा-आठवा भाग उत्तुंग पर्वतांना पार करून नानाविध नैसर्गिक अडचणींना तोंड देऊन भारतात आले; पण पुढे विंध्यासारखा टिचभर पर्वत त्यांना दुर्लंघ्य टरला त्यामुळे दक्षिणेत त्यांचा शिरकाव झाला नाही.

अशा परस्परविरोधी संकल्पनांमुळे भाषिकांच्या प्रतिपादनात अनेकदा निष्कारण अडचणी निर्माण झाल्या आहेत. उदा० ऋग्वेदातले आणि नंतरच्याही संस्कृतातले दक्षिणी शब्द दाखवून देणारे प्रा० बरो यांच्याही मते उत्तरी आणि दक्षिणी भाषांचा संपर्क कोणत्या प्रदेशात झाला हे टरविणे फार कटीण आहे. हीच अडचण मांडताना ' संस्कृत आणि द्रविड भाषा ' या लेखात ब्लोक म्हणतात :

> पहिले म्हणजे ब्राहुईच्या भूगोलिक एकांडेपणाची मीमांसा अनेक प्रकारांनी करणे शक्य आहे...
>
> (१६ ३६)

बलुचिस्तान आणि दक्खन यांच्यातले सारे अंतर आपण कल्पनेने भरून काढले तरी त्यांच्यातला स्वाभाविक दुवा सिंधुमुखाजवळचे किनारप्रदेश आणि गुजरात यांच्यातूनच असणार; काही आक्रमणे प्रत्यक्षात खरोखरच त्या मार्गाने झाली आहेत. पण पंजाबची पटांगणे आणि गंगेचे खोरे हे जे संस्कृतचे परात्पर प्रदेश ते अशा नवरचित अखंडित पट्टीच्या बाहेरच राहतात, आणि हे मुलुख भारतयुरोपीयांच्या स्वारीआधी द्रविडेतर भाषांनी व्यापलेले होते असे समजण्यास प्रत्यवाय राहत नाही. ध्वनिकाचा जो धर त्याने या मानीवाला आधार मिळतो असे दिसते. (१६ ३७)

दुसऱ्या बाजूने, भाषिक माहिती नीटपणे वापरण्याबाबत काही जरूर त्या खबरदाऱ्या पाळल्या गेलेल्या नाहीत. तुलनेसाठी निवडण्यात आलेली द्रविड भाषा बहुधा नेहमीच तमिळ राहिली आहे; अनेक कारणांमुळे ती साऱ्या बोलींपैकी विशेष ज्ञात आहे. वैदिक काळापासून आजवेळेपर्यंत तमिळ फार थोडी पालटली आहे हे मानले तरी या द्रविड बोलीचा मुलूख वेदिक संस्कृतीच्या प्रदेशापासून सर्वाधिक दूर आहे ही वस्तुस्थिती उरतेच. ह्या एका तत्त्वावरसुद्धा ती तुलाभ्यासाला घ्यायची अखेरीची भाषा असायला हवी होती. (१६ ३८)

वस्तुतः सामान्यद्रविड भाषेचे रूप तमिळमध्ये अगदीच निकृष्टपणे दिसून येते. (१६ ३९)

या उद्धृतात अबाधित मानलेली पण खरी नसलेली तत्त्वे ही : भाषांचा परस्पर परिणाम आक्रमणानेच घडून येतो; प्रदेशिक सलगता भाषिक सलगतेला जरूर आहे; ध्वनिकावरून भाषिक लोकांचा इतिहासही ठरवता येतो. त्यांचा परिहार असा : खुद्द ब्लोक यांनीच गंगेपासून कावेरीपर्यंतच्या संस्कृतिक एकतेचा उल्लेख केला आहे; भारत–युरोपीय भाषांमध्ये समानता आहे तरी दोन टोकांमध्ये प्रदेशिक अंतर प्रचंड आहे; मर्यादित वावराच्या निरखणाने काढलेल्या भाषिक सिद्धांतांवरून पूर्वगृहीत इतिहास मात्र सिद्ध होत असतो.

तूर्तच्या विषयाच्या अनुषंगाने पाहिले तर महाराष्ट्र आणि मराठी भाषा हा या भाषा–संस्कृति–संगमाविषयीच्या अडचणींवरचा तोडगा आहे असे दिसून येईल. पैकी भाषेच्या सर्व अंगांनी पाहता, रूढ भाषिकाच्या अगदी विरुद्ध, मराठी भाषेत दक्षिणी अंश पुरेपूर आहे हे आपण पाहिलेच. ' देश 'तत्त्वाच्या अनुरोधाने महाराष्ट्रही या विज्ञानिक परीक्षेला उतरतो हे आपल्याला दिसेल.

एकाद्या प्रदेशाचा प्रागितिहास ठरविताना ग्रामनामांचा उपयोग करतात. ' द्रविड महाराष्ट्र ' या ग्रंथकात महाराष्ट्रातल्या छोट्या छोट्या गावांच्या नावांपासून ते पार

देवनामांपर्यंत दक्षिणी मूलसंस्कार किती स्पष्ट आहे ते दाखविले होते. याच विषयाचा आणखी विशानिक ऊहापोह ' भारतीय संस्कृतीतल्या चुकल्या दुव्याचा शोध ' या इंग्रजी प्रबंधात केला आहे. त्यात मुख्यतः मराठी ग्रामनामांच्या ताम्रपट–शिलालेख आदि साहित्यात ज्या संस्कृत–प्राकृत छाया आहेत त्यांना मूळ समजून अर्थ करणे कसे योग्य नाही हे दाखविले आहे. या छाया आणि ' अपभ्रंश ' आदि भाषांमधली शब्दरूपे यांच्या, मागेच मागे गेले पाहिजे तरच त्यांचे मूळार्थ खरेखुरे कळतील. या छाया-रूपांवरून, त्यांच्या किंवा रूढ मराठी नावांच्या संस्कृताधार व्युत्पत्तींवरून, इतिहास शोधणे हे अशक्य आणि चुकीचे ठरणार आहे, त्यांतून निघणारा इतिहास केवळ मूळची गृहीते सिद्ध करून दाखविण्याचे समाधान करणारा असेल. अशा वर्तुळाकार इतिहासाचे एक साधे पण चांगले उदाहरण स. आ. जोगळेकरांच्या गाथासप्तशतीच्या प्रस्तावनेत आहे. विशेषतः भाषाभ्यासावरून सिद्ध झालेल्या आर्यांच्या भ्रमणाविषयीच्या मानीवावर आपला बराच इतिहास–प्रागितिहास आधारलेला आहे, त्यानुसार जोगळेकर म्हणतात :

> दक्षिण या शब्दाच्या अर्थाबद्दल संशय नाही. ज्यांच्या परिभ्रमणांचा प्रवाह प्रथम पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात होता त्यांनी दक्षिण दिशा व उजवी बाजू यांचा समन्वय करावा हे साहजिक आहे. (१५ १६१)

दिशा–नामे ही प्रथम येतात, परिभ्रमणे नंतर. शिवाय परिभ्रमणात, चालणाराचे तोंड नित्य एकाच दिशेला कसे राहणार ? पूर्वेला सूर्य उगवतो त्यामुळे तिला पुढची म्हटल्यावर सगळे स्पष्ट होते. तो वंश परिभ्रमण करू लागला का एकाठायी स्थायिक झाला याच्याशी त्याचा संबंध नाही. पण अशी स्पष्टीकरणे आणि असे इतिहास सिद्ध होऊ लागतात !

यादव–मराठीच्या संबंधात तुळपुळे यांनी केलेला ग्रामनामांचा विचार या दृष्टीने पाहता, विशेष लाभदायक नाही. महाराष्ट्राच्या सगळ्या विभागांतली ग्रामनामे दक्षिणी आधाराने नेमकी उमगतील, ' सगळ्या ' या शब्दाला फार महत्त्व आहे, कारण त्यामुळे तुरळ्या संपर्काचे जे मानीव आहे त्यापेक्षा कितीतरी खोल अशी अंतरंगप्रक्रिया, या भाषांची म्हणा की त्यांची प्राचीन प्रागितिहास स्वरूपे बोलण्यात वापरणारांची म्हणा, आपल्याला समजून येते.

अर्थातच निरनिराळ्या विभागीय बोलींना भाषिक तत्त्वांच्या प्रकाशात हीच विधाने लागू पडली पाहिजेत. किंबहुना अशा बोलींचा खोलवर अभ्यास झाला तरच प्रमाणभाषेचा इतिहास नीट कळू शकेल. बोलींच्या अभ्यासाअभावी प्रमाणभाषेचा संबंध दुसऱ्या प्रमाणभाषेशी जोडण्याने कसे दोष उत्पन्न होतात ते आपण पाहिलेच आहे. तुळपुळे यांनी याचसाठी यादव–मराठीची तुलना वऱ्हाडी, नागपुरी, इत्यादी बोलींशी करून आपल्या विवेचनाला बळकटी आणली आहे. मात्र हे सरळच दिसते की, या बोली

तुलनेसाठी घेण्याचे कारण इतकेच की त्यांच्याविषयीचे प्रकाशित अभ्यास उपलब्ध आहेत. या उपलब्धीच्या मर्यादेचा परिणामही आहे. या बोलींमध्ये प्रमाण-कोशाबाहेरचा जो शब्द अभ्यासकाला दिसेल तो त्या बोलीचा खास शब्द म्हणून गणला जातो. उदा० वावर हा शब्द शेत या अर्थी वऱ्हाडी बोलीत किंवा तास (नांगराचे) हा शब्द नागपुरी बोलीत दाखवले आहेत. ते दोन्ही अगदी पुणे जिल्ह्यातल्या बोलीतही ग्रामीण भागात ऐकायला मिळतात. म्हणजे ते सामान्य मराठी शब्द आहेत, वऱ्हाडी किंवा नागपुरीच फक्त नाहीत.

मराठीचे मूळ शोधण्याचा आपला सारा प्रपंचच लोकभाषेवर आधारलेला आहे. त्या लोकभाषेत दक्षिणीचा वावर आपल्याला आढळला. कोंकणी, वऱ्हाडी, नागपुरी याही बोलींना हे विधान पूर्णपणे लागू पडेल. त्यामुळे या बोलींमधले जे शब्द प्रमाणभाषेच्या जाणत्यांना अनोळखी वाटतात आणि यादव-मराठीत मात्र आढळतात त्यांच्यावरून यादव-मराठीचे दक्षिणीमूलत्वच आपल्या प्रत्ययाला येते.

भाषेच्या लेखरूप साधनसाहित्यावर भरवसून राहावे लागल्यामुळेच मराठीच्या जन्माचा काळ आपण हजारबाराशे वर्षांमागे नेत नसतो. याचा अर्थ इतकाच असतो की आजच्या प्रमाण भाषेचे आणि / किंवा बोलीभाषेचे रूप ज्या लेखसाधनांतील भाषेशी जुळण्याइतपत आहे ती हजारबाराशे वर्षांचीच आहेत. भाषा त्यांहून जुनी आहे हे खासच. ती किती जुनी आहे हे इतिहासिकांऐवजी प्रागितिहास प्रमाणांनी ठरवावे लागेल. भाषेतून लाभणाऱ्या अंतर्गत पुराव्याचा विचार केला तर शब्द, रूप इत्यादी अंगांनी जाता येईल तितके मागे जावे. शब्दांमधल्या संकल्पना तपासल्या, त्यांच्या ध्वनींचा शोध घेतला तर सनपूर्व दुसऱ्या शतकातील तमिळ ग्रंथ तोल्काप्पियम् याच्या-पर्यंत तरी आपण पोचतोच. खुद्द या ग्रंथाने, यास्काच्या निरुक्ताने किंवा पाणिनीच्या अष्टाध्यायीने लोकभाषा (वळक्कु) आणि काहीशी बनीव अशी ग्रंथभाषा (चेय्युळ्) यांच्यात भेद केलाच होता. याचा अर्थ असा की लोकभाषांचे मूळ आणखी मागे जाऊनच आपल्याला शोधावे लागेल.

या कामी मग, नुसते भाषिक पुरणार नाही. नुसते भाषिक, लेखसाधनांवरून अनुमाने काढण्यासही पुरत नाही हे आपण पाहिलेच. पण प्राचीन लोकभाषेचा, सध्याच्या किंवा जुन्या काळच्या भाषेवरून अंदाज बांधायचा तर, मिथ्यांचा अभ्यास, मानविकाची तत्त्वे, सध्याच्या आदिमजातींचा तुलाभ्यास अशा अनेक गोष्टींचे साह्य घ्यावे लागते. त्यातून भाषेच्या मूलभाषेचे आकलन करून घेण्याची कल्पना सोडली पाहिजे. 'भाषेचे मूळ' समजून घेणे हे मात्र शक्य आहे. या ज्ञानात मग पूर्वापरतेचा मुद्दा फारसा महत्त्वाचा राहत नाही. मराठी भाषेच्या – मराठमोळीच्या – काळाच्या संदर्भात, तमिळचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शेक अभ्यासक कमिल इस्वेलेबिल यांच्या उद्गारांनी

समारोप करणे उचित होईल. १९६८ मध्ये मद्रासला भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय तमिळ – अध्ययन परिषदेतल्या चर्चेत ' तमिळ ही प्राचीनतम भाषा आहे काय ? ' या प्रश्नावर ते म्हणाले :

> कोणतीच भाषा दुसऱ्या कोण्या भाषेहून वयाने मोठी नसते. प्राचीन किंवा कमी प्राचीन म्हणतात ते असते त्यांचे ज्ञात. आपल्याला वाङ्मयी किंवा कोरीवलेखी ज्ञाते उपलब्ध असतात. ती एका भाषेच्या बाबतीत जास्त जुनी आणि दुसरीच्या बाबतीत कमी जुनी असतील. अखेर आपण अशा पायरीवर येतो की एक दुसऱ्याहून अधिक जुनी आहे असे आपण म्हणू शकत नाही. गंभीर विद्वत्चर्चेत असल्या विचाराला जागा नसते.

अशा सावधपणाने इतकेच सांगता येईल की : मराठी भाषेविषयीच्या ज्ञाताचे बाबर उत्तरी आणि दक्षिणी या दोन्ही भाषांच्या ज्ञातांपर्यंत विस्तारता येते. या ज्ञातांची जननी जी लोकसंस्कृती तिच्यातल्या काही परंपरांचे मूळ खगोल गणितावरून सनपूर्व ३००० (तीन हजार) पर्यंत पोचते. अशा परंपरांचे निदर्शक शब्द मराठीतही आहेत. मराठी भाषेचे मूळ असे येथपर्यंत नेता येते.

३.७ मराठीचा दुवा

आधुनिक भाषिकाचे सिद्धांत प्रस्थापित म्हणून स्वीकारले गेले नव्हते तोवर मराठी भाषेचे स्वरूप मिश्र असल्याबद्दल भाषिकांना शंका नव्हती. मराठीचा पहिला विस्तृत आधुनिक शब्दकोश मोल्स्वर्थचा. त्याच्या सन १८५७ च्या सुधारून वाढवलेल्या आवृत्तीला डॉ. विल्सन यांनी ' टिपणे ' या नावाची जी प्रस्तावना जोडली आहे तिच्यात ते म्हणतात :

> अरबी आणि फारसी शब्दांखेरीज ... दोन भिन्न मूलतत्त्वे मराठी भाषेत आहेत : सिथियन (किंवा तुराणी) आणि संस्कृत. भाषाशास्त्री ती दोन्ही सहज ओळखून त्यांत फरक करू शकतो.
>
> मराठीचा आजचा प्रदेश पाहता, तिच्यातले सिथियन तत्त्व अधिक प्राचीन आहे. विशेषतः समाजाच्या खालच्या वर्गात, आणि सामान्य जीवनव्यवहारात, ते अजूनही पुष्कळ वापरात आहे.

हे सिथियन–तुराणी तत्त्व दक्षिणी भाषांचेही मूलतत्त्व असावे असे एक मानीव त्याच सुमारास १८५६ मध्ये प्रकाशित झालेल्या ' द्रविड भाषांचे तुला–व्याकरण ' या ग्रंथात काल्डवेल यांनी मांडले होते. तरी मराठी आणि दक्षिणी भाषांचा संबंध तपासून पाहावा हे झाले नाही. याचे कारण किंवा त्या कारणाची एक सोयिस्कर भूमिका विल्सन यांच्याच प्रस्तावनेतील पुढील उल्लेखात मिळते :

> सिथियन तसेच तुराणी शब्दही मराठीत ओळखू येतात ते त्यांच्या ध्वनींपेक्षा, त्यांच्या रूपांमुळे. दक्षिण हिंदुस्थानातील भाषांमध्ये असलेल्या तुराणी शब्दांहून ते खूप वेगळे आहेत; त्या भाषांची व्याकरणे आणि कोश मराठीवर थोडाच प्रकाश पाडू शकतात; आणि त्या सर्व एकाच भाषाजातीतल्या असल्या तरी उघडच वेगळ्या कुळांमधल्या आहेत, निराळ्याच तुराणी आक्रमणाचा परिणाम आहेत; त्या आक्रमणाचा शोध, भाषाशास्त्री आणि वंशशास्त्री यांच्या जोडप्रयत्नाने अजून व्हायचा आहे.

म्हणजे, मानीव वेगळे असले तरी शोधाची आद्य गृहीते तीच होती. संस्कृतवादी मानीव दृढमूल होत गेले तसतसे विल्सन यांचे विचार अनुल्लेखिनही राहू लागले. त्यांची छाननी होणे दूरच राहिले.

आता आपण निरखणाचे वावर वाढवून, मराठीत असलेल्या दक्षिणी तत्त्वाचा थोडासा शोध घेतला आहे. याउलट मराठीची जवळजवळ आमूलाग्र फोड केवळ उत्तरी भाषांवरूनही करण्यात आली आहे. तपशिलाच्या ज्या बाबींची अशी फोड होऊ शकत नव्हती त्या शंकास्थळे म्हणून तरी राहिल्या किंवा त्यांची स्पष्टीकरणे ओढूनताणून तरी आणली गेलीच. ज्या भाषेचा विचार असा दोन टोकांकडून होऊ शकतो ती साहजिकपणेच त्या टोकांना जोडणारी रेषा होते, त्या दोन मानलेल्या भाषाकुळांचा दुवा होते. भूगोलावर महाराष्ट्र तशी भाषांमध्ये मराठी ' मध्ये महाभारतम् ' उभी टाकते.

या दुव्याचे भाषाभ्यासात नेमके महत्त्व काय ? सुरुवातीलाच दिलेला दृष्टांत उचलून ' हा दुभाषिक लेख आहे ' असे म्हणता येईल. त्याच्यामुळे त्या दोन भाषांचे परस्परसंबंध उलगडायला मदत होईलच; त्या दोन भाषांवरही आणखी प्रकाश पडू शकेल. त्यासाठी तिचे ' लोकभाषा ' स्वरूप उपयोगी पडेल. प्रमाणभाषा जेवढी बनीव तेवढा तिचा उपयोग कमी प्रमाणात होईल.

अंगुली या संस्कृत-मराठी तमिळ शब्दाचा अर्थ आपण पाहिलाच आहे. तमिळमध्ये प्रचारात असलेला शब्द मात्र विरल् असा आहे. या ' सं-म-त ' कुटुंबातच विरळ असाही शब्द आहे. यांचा काही संबंध आहे का ? विरल् या शब्दाच्या मागेपुढे असलेले बीजशब्द असे :

द ४४३४	विरवु	एका जागी येणे, साधणे, एक होणे.
द ४४३८	विरि	प्रसारणे, पसरणे, फैलणे, उघडणे, खुले = मोकळे करणे, चीर पडणे.

म्हणजे या तीन शब्दांमध्ये अर्थिक संबंध असला पाहिजे असे विचारांती वाटते. बोटे ही तळहाताशी सांधलेली, एकमेकांपासून दुरावलेली आणि मूठ उघडणारी किंवा हात पसरणारी

असतातच. ' बोटे विरळ होणे ' असेही आपण म्हणतोच. विर्– म्हणजे फुटणे, एक होणे आणि ' आ ' हा तमिळ नकारार्थक प्रत्यय; त्यांवरून विरान हे धातुसाधित – दुरावलेले या अर्थी – हे लक्षात घेता ' विराणी ' ही विरहिणी चे मराठी रूप नसून म्हणारी मराठमोळी आहे असे दिसते. विर्– च्या अर्थवत्तेचे हे आणखी एक प्रमाण.

अर्थात अंगुली आणि विरल् हे एकाच वस्तूच्या दोन लक्षणीय गुणधर्मांचे वाचक शब्द निरनिराळ्या लोकभाषांतून या सं–म–त समूहात प्रविष्ट झाले. संस्कृत भाषा अशा समानार्थी शब्दांनी पोतडी भरण्याच्या बाबतीत प्रसिद्धच आहे. पण प्रमाणभाषा तमिळही या बाबतीत कमी नसावी. लोकभाषांमधले शब्द प्रमाणभाषेत विविध रूपांत येतात याचे सूत्रच तोल्काप्पियने दिले आहे :

(शब्द)–४००. चेन् तमिऴ् (उत्तम–तमिळ देश) मध्ये मोडणाऱ्या बारा देशांत, एकच अर्थ असलेल्या वेगवेगळ्या शब्दांना तिचै च्चोल् (दिशाशब्द = दिगंतरीचे शब्द) म्हणतात.

' उदाहरणार्थ, पाण्ड्य देशात आ [गाय] एरुमै [म्हैस] यांना पेट्रम् असेही म्हणण्याचा प्रघात आहे ' असे टीकाकार सांगतो. याच्या पुढचेच सूत्र वटचोलि [= उत्तरी भाषा, संस्कृत] शब्दांबद्दल आहे :

४०१. वटचोल् म्हणजे संस्कृत शब्द, संस्कृत वर्णांऐवजी तमिळ वर्णांच्या वेषात तमिळ शब्द होऊ शकतील.

४०२. तमिळ वर्णांतरात मोडतोड झाली तरी वगळण्याची जरूर नाही.

शब्दसंग्रहाबद्दल अशी दुहेरी उदार दृष्टी प्राचीन काळापासूनच आहे. त्यामुळेच सं–म–त संगमात किंवा त्यातल्या एकेका भाषेतही शब्दांचा तुलाभ्यास होऊ शकेल. आजच्या तमिळमध्ये वापरात नसलेले पण प्राचीन तमिळशी संलग्न असलेले अनेक शब्द मराठीत आहेत (उदा० शेती). त्यामुळे तमिळ शब्दांचे कालभेदी विश्लेषण करण्यासही मराठी लोकभाषेचा उपयोग होऊ शकेल.

संस्कृत भाषेबद्दलही असेच म्हणता येईल. तोल्काप्पिय प्रमाणेच पतंजलीचे महाभाष्य ' दिगंतरीच्या शब्दांचा ' उल्लेख करते :

> आणि या अतिशय मोठ्या शब्दप्रयोग क्षेत्रात, ते ते शब्द त्या त्या ठायी विशिष्ट अर्थाने उपयोगात असतात – जसे, कम्बोजांमध्येच ' शवति ' गति या अर्थाने बोलण्यात असतो; आर्य त्याचेच रूप शव [प्रेत] या अर्थाने बोलतात. सुराष्ट्रांमध्ये हम्मति, पूर्वेच्या आणि मधल्या लोकांमध्ये रंहति, तर आर्य मात्र गम् चाच प्रयोग त्या अर्थी करतात. विळा या अर्थी पूर्वेच्या लोकांत दाति तर उत्तरेच्या लोकांत दात्र म्हणतात.

यातल्या शवति–शव–ज.णे यांच्यात काही अर्थिक संबंध आहे काय ? असावा. साव-गणींच्या संदर्भात तमिळ चा– । सा– । मरणे हा शब्द आपण पाहिला. त्या शब्दाशी तुल्यशब्द म्हणून कोशात संस्कृत शव चा उल्लेख आहे. ' चा ' या तमिळ चिन्हाने । जा । या मराठी उच्चाराचाही निर्देश होतो. जाणे = मरणे हा अर्थ मराठीत आहेच. येथे तो गत्यर्थक नसेल; झाले–आले = संपले यातल्या अर्थाचा असेल.

३.८ असंस्कृतांतून संस्कृत

लोकभाषेचा दुवा मात्र येथेच संपत नाही. भारतीय भाषिकातल्या एका सनातन प्रश्नाला तो स्पर्श करून जातो. तो प्रश्न ' संस्कृत भाषेचे मूळ काय ? ' हा होय. दुसऱ्या शब्दांत– भारतीय भाषांपैकी आधीची कोणती, नंतरची कोणती ? किंवा कोणत्या भाषेने कुणाचे किती ऋण घेतले, उसनवारी केली किंवा उचलेगिरी केली ? अर्थच्छटांनी गुणात्मता दाखवणाऱ्या या तीन शब्दांची योजना येथे सहेतुकच केली आहे. या विज्ञानिक प्रश्नाला भावनिक स्वरूप कसे दिले जाते ते त्यांवरून कळते.

आसेतुहिमाचल साऱ्या भारतीय भाषा संस्कृतातून उद्भवल्या हे मानीव अनेकांनी सिद्धांतरूपच मानले आहे. पण त्याच्या उलटही मते मांडली गेली आहेतच. विशेषतः शब्द–व्युत्पत्तींच्या वावरात अशा कल्पकतेला चांगला वाव असल्याने तसे प्रयत्न अधून-मधून होतच असतात. त्यांना भाषिकाबाहेरची इतरही कारणे असतात. जोतीराव फुल्यांनी मारतोंड वरून मार्तंड ची उत्पत्ती सुचवली होती. हा अशातला एक प्रकार. पण हे आजकालच होत आहे असे नाही. नीलकंठ शास्त्री यांनी याचे एक उदाहरण दिले आहे :

> श्लोकवार्तिकात प्रख्यात मीमांसक कुमारिल (काळ : सनाचे आठवे शतक) म्हणतो, अन्त्य व्यंजनाचा स्वर जोडून आर्यांनी म्लेंच्छ शब्दांना संस्कृत बनवले. त्याची उदाहरणे : चोर् ओदनन् इत्युक्ते चोरपदवाक्यं कल्पयन्ति । [चोर् = भात, त्याचे चोर अशा पदाचे वाक्य बनवतात.] अतर् अतर एव पन्थाः [अतिर् = रथाच्या हेलकाव्याने हलणे. तोच ' पन्थ ' झाला] पाम्प पाप, मल (सत्य) माता; वयिर् (उदर) वैरी – सर्वस्य क्षुधितस्य अकार्यप्रवर्तनात् । [पाम्पु = साप, मल् = सामर्थ्य, फलन–ता; वयिर् = पोट. वयिर् वरून वैरी, कारण भुकेलेला कोणीही वाईट कार्याला प्रवृत्त होतो.] पार्सी, बर्बर, ग्रीक आणि रोमन मध्येही असे शब्द सापडतील असे तो पुढे सांगतो. यातले अधिक पार चुकीचे आहे पण कुमारिलाचा काळ पाहता, टिप्पणीची झेप लक्षणीय आहे. (२२ १०)

किमान ' चोर 'च्या बाबतीत मराठीची साक्ष काढण्यासारखी आहे. भात (चोर्, चोरु) मागणारा वर आणखी ' मोर् ' (ताक) मागू लागतो या अर्थाची तमिळ म्हण

'चोरावर मोर' या मराठी म्हणीत रूपांतर पावली आहे. असे असले तरी व्युत्पचिरचनेचे हे प्रयत्न मर्यादित स्वरूपाचे, फार थोड्या शब्दांवर आधारलेले आणि काहीसे अभिनिवेशाने भरलेले होते.

महाराष्ट्रात डॉ. केतकरांनी याबाबत घेतलेली भूमिका दुर्लक्षित राहिली आहे. समाजांच्या व्यापक अध्ययनावरून काढलेली भाषिक प्रमाणे लावून त्यांनी असे मानीव मांडले की असंस्कृत लोकभाषांवर संस्कार करून संस्कृत भाषा जन्माला आली. प्राचीन महाराष्ट्र : शातवाहनपर्व (केतकर १९३५ २१) या ग्रंथात ते म्हणतात :

> अगस्त्यसूक्तांत दिसून येणाऱ्या दाक्षिणात्य वैशिष्ट्यामुळें वैदिक आणि मूळ महाराष्ट्रीय अशा लोकांचें ऐक्य अगस्त्यकालांत वऱ्हाडांत स्थापन होत असले पाहिजे, आणि वैदिक भाषा आणि अत्यंत प्राचीन महाराष्ट्रभाषा यांच्या मिश्रणास सुरवात त्याच कालांत झाली असली पाहिजे. (२१ १९)
> अगोदर संस्कृत आणि मागाहून त्यांचे प्राकृत भाषांतर या तऱ्हेची वाङ्मय विकासाची काल्पनिक मांडणी सोडून देऊन स्थानिक भाषांतील ग्रंथ अधिक श्रद्धाबुद्धीने पाहिले पाहिजेत. (२१ ४२५)
>
> संस्कृत भाषा कोणत्यातरी ठिकाणच्या प्राकृतापासून तयार झाली आणि ती हळूहळू तयार झाली. (४३०)
>
> ... ती कोठील स्थानिक भाषेवर संस्कार होऊन तयार झाली हेही आज सांगता येत नाही. (४३१)
>
> प्राकृत भाषांचा द्रविड भाषांवर झालेला परिणाम केवळ मौर्यकालीन नसून त्याच्या पूर्वीच्या अनेक शतकांचा असला पाहिजे. खि. पू. २००० या कालीं किंवा त्याच्याही अगोदर आर्यद्रविड संबंध उत्पन्न झाला असणे शक्य आहे... (४३५)
>
> ब्राह्मीलिपीच्या काळाहून देखील प्राचीन काळीं आर्यद्रविड संबंध असलाच पाहिजे असे इतर पुराव्यावरून वाटतें. त्या काळचीं स्मारकें आज जरी सापडत नसलीं तरी उद्यां सापडतील अशी प्रस्तुत लेखकास दृढ आशा आहे... आणि लिपिशास्त्राचा त्याचप्रमाणें भाषांचा नवीन इतिहास आपणांस उपलब्ध होईल; (४३५)
> (जाड टसा पुरविलेला.)

मराठी या भाषेत दक्षिणी शब्दादिकांच्या, संस्कृतीत तमिळादिच्या, देश-ग्रामांच्या नावांत तमिळत्वाच्या अशा अनेक रूपांनी 'त्याकाळची स्मारके' आपल्याला आता सापडली आहेत, आणखी सापडणे सहज शक्य आणि अवश्य आहे. या भाषांचा नवा संमत इतिहास उपलब्ध होण्याचा हा पाया होऊ शकेल.

३.९ ऊर्ध्वमूल अश्वत्थ

संस्कृत–मराठी–तमिळ या भाषांचे, मराठीला मधला दुवा मानणारे नवे सं–म–त भाषिक सिद्ध करतांना समन्वय करणे जरूरच आहे. समन्वयासाठी प्रथम भेद नेमके काय आहेत हे पहावे लागेल. येथे संस्कृत आणि तमिळ या दोन्ही बाजूंच्या व्याकरणपरंपरेचा एक लक्षणीय आधार कामी येतो. पाणिनी आणि तोल्काप्पियनार् या दोघांनीही पूर्वीच्या व्याकरणांचा पूर्ण अभ्यास केला होता असे भाष्यकारांनी उल्लेख करून ठेवले आहेत. दोघांनीही ऐंद्र व्याकरणाचा (म्हणजे नव्या शब्दांत भाषिकाचा) अभ्यास केला होता अशी नोंद आहे. या दोन्ही भाषाप्रवाहांना सांधणारे काही सूत्र आद्य व्याकरणकारांनी मानले होते याविषयी मग शंका रहात नाही. हे दोन व्याकरणाचे (किंवा भाषिकाचे) ग्रंथ एका लोकभाषेचे प्रमाणकारक, लोकभाषेला (वळवक्कु) ग्रंथभाषेचे (चेय्युळ्) स्वरूप देऊ पाहणारे होते असे मानले तर त्यांच्यातला भेदक भेद स्पष्ट होतो. तो पुष्कळ अंशी यास्क आणि शाकटायन यांच्यातल्या भेदासारखा आहे. सर्व शब्द धातूंपासून होतात हे यास्काचे मत शाकटायनाच्या विरोधी होते. त्याचप्रमाणे धातूंवरून सर्व शब्द सिद्ध करणारी पाणिनीची अष्टाध्यायी आणि क्रियाशब्द धरून सर्वच शब्द मुळात नामे असतात हे सांगणारे तोल्काप्पियम् यांना या अनुरोधाने दोन छावण्यात कल्पिता येईल. तसे केल्यास शब्दव्युत्पत्तींच्या विषयातला अति महत्वाचा एक भेद समन्वयाच्या कक्षेत आला असे होईल.

या मानीवाच्या पुष्ट्यर्थ 'दूध' या लोकभाषेतल्या शब्दाचा विचार करू. धातुमूल व्युत्पत्ती मानणाऱ्या संस्कृत दुग्ध चा अर्थ 'दुहलेले, धार काढून मिळवलेले' असा होतो. त्यातला मूळ धातू दुह् कल्पिला गेला आहे. दुहिता म्हणजे मुली धार काढीत असत असा सांस्कृतिक इतिहासही त्याच्याशी जोडलेला आहे. परंपरेने असे मानलेले दिसत नाही. 'दोग्धा गोपालनंदनः' 'राधा गौळण करिते मंथन' यांमध्ये हा श्रमविभाग वेगळ्याच प्रकारे विहित करून ठेवला आहे. ते असो. दुह् > दुग्ध अशी व्युत्पत्तीची परंपरा आहे हे नक्कीच.

आता, दूध दूद दुदु अशा अनेक प्रकारांनी उच्चारल्या जाणाऱ्या या शब्दाची तमिळमूल व्युत्पत्ती पाहू. यात दु–तु हे मूळ दिसते. त्याचा अर्थ :

द २६८५ तु (-प्प-,-त्त-; बहुधा नकारार्थी रूपात वापरतात.)
खाणे. नाम : अन्न, अनुभव
तुप्पु आस्वाद (उपभोग), आस्वाद्य वस्तू, अन्न, तूप
कन्नड, प्राकृत तुप्प तूप
द २७८५ तूतै मातीचे लहानसे भांडे, छोटेसे माप

(मलैयाळम्) तूत दुधाचे भांडे, पेला
(तेलुगु) तुत्त मातीचे छोटे भांडे
(कोलमी) तुत्ता मातीचे भांडे

यांवरून दिसते की अनेक लोकभाषांमध्ये तु या नाम-क्रिया-शब्दावरून आलेला शब्द प्रचारात आहे तो दूध ला जवळचा आहे. एवढेच नाही तर त्याच्यावरून आलेले शब्द दूध संबंधी इतर शब्द-संकल्पनाच स्पष्ट करतात.

या ठिकाणी नाम-उद्‌भव शब्द आणखीही मूलभूतपणे सार्थ दिसतो. दोहन, धार काढणे ही क्रिया मानवाच्या संस्कृतीत गेल्या दहा हजार वर्षांत आलेली असेल. अन्न म्हणून दूध मात्र अनादि काळापासून त्याला माहीत आहे, नव्हे प्रत्येकजण जन्मल्यापासून त्याच्यावर तर जगत असतो. अर्थात तु- या ध्वनीवरून आलेल्या लोकभाषेतल्या अन्नवाचक शब्दांचे संस्कारित रूप- संस्कृत रूप- दुग्ध, त्याची उपपत्ती तु वरून लावण्याऐवजी दुः-दुह् यांच्यावरून लावली गेली असा याचा अर्थ होतो. इतकेच प्रचारातला तमिळ शब्द पाल् (= दूध) याचे धातुसाधित पालूर. त्यावरून मराठी पांढरा आणि संस्कृत पांडुर हे 'दुधी' या अर्थाचे शब्द आले आहेत असे दिसते. आतापर्यंत लावलेल्या पद्धतींनी आपण आणखीही पुढे जाऊ शकतो. येथे त्याची खास गरज नाही. तत्कालीन रूढ प्राकृते आणि / किंवा लोकभाषा यांच्यावरून संस्कृत शब्द-घटना सिद्ध करणे शक्य आहे, धातुमूल आणि नाममूल व्युत्पत्ती हा या दोन भाषिक-धारांमधला खरा भेद आहे एवढ्यापुरताच येथे प्रपंच केला.

सं-म-त किंवा वटमोळि-मराटमोळि-मोळि या भाषात्रिकूटाच्या या संयुक्त अध्ययनातून वटमोळी आणि अन्य मोळी एकाच विशाल वटवृक्षाच्या अगणित खोडांसारख्या प्रतीत होतात. वडाच्या पारंब्या फांद्यांमधून निघून जमिनीत जाऊन मूळ धरतात आणि नव्या वृक्षांची उभारणी करतात. कालांतराने यातला मूळ वृक्ष कोणता, शाखा कोणत्या, मुळे कोणती याचा निर्णय कठीण होतो; सगळेच वृक्ष मात्र एकमेकांना जीवनरस देत असतात. अशा वृक्षाला गीतेतल्या ऊर्ध्वमूल अश्वत्थाचेच वर्णन लागू पडेल. ज्ञानेश्वरांनी ते जे केले आहे ते या सं-म-त वृक्षालाही अनुरूप आहे.

आणि अधि फांकली डाळें । तिये चि होति मूळें ।
तेयातळि पघळे । वेलि पाली ॥ १५.१४४ ॥
परि येरां रुखावारिखा । तळि मूळें वरि शाखा ।
तैसा न्हवे म्हणौनु लेखा । नेए कव्हणा ॥ १५.१४७ ॥

'मराठी भाषेचे मूळ' शोधण्याच्या या प्रयत्नाचा समारोप ज्ञानेश्वरांच्या त्या मऱ्हाटिया बोलांनी करणेच उचित होईल.

भारतीळे सरस्वति । था वः सर्वा उप ब्रुवे ।

व्युत्पत्तिकोश

-

ब्लोक यांच्या ग्रंथातील शब्दकोशातल्या अ आणि ह या दोन वर्णांनी सुरू होणाऱ्या मराठी शब्दांच्या दक्षिणी भाषांवर आधारित व्युत्पत्ती येथे दिल्या आहेत. मराठी प्रमाणशब्द ठळक टाइपात, पुढे (असल्यास) मराठी बोलीशब्द ठळक टाइपात, 'द' युक्त संख्येने द्रविड–व्युत्पत्ति–कोशातला नोंदीचा अंक किंवा 'त' युक्त संख्येने तमिळ कोशातला पृष्ठांक, पुढे साध्या टाइपात दक्षिणी शब्द, तो शब्द तमिळ नसल्यास ज्या भाषेतला असेल तिचे कंसात नाव, पुढे दक्षिणी शब्दाचा अर्थ, शेवटी समर्थक विवेचन असा क्रम आहे. क्वचित मराठी शब्दाचा अर्थ शेवटी दिला आहे. तो अर्थ किंवा स्पष्टीकरण '–' या चिन्हानंतर येते. एकाच भाषेतल्या शब्दांच्या मध्ये विरामचिन्हे पण भिन्न-भाषिक शब्दांच्या मध्ये मोकळ्या जागा अशी व्यवस्था आहे. संस्कृतवरूनच्या व्युत्पत्ती दिल्या नाहीत. ब्लोक यांनी घेतलेले सर्व शब्द येथे कमीअधिक नमूद केले आहेत. ज्यांच्या दक्षिणी व्युत्पत्ती किंवा उपपत्ती लागल्या नाहीत ते नुसतेच नोंदले आहेत. 'मूळ' म्हणजे येथे प्रस्तुत ग्रंथ.

अऊत **आउत औत** द २८३ आ गाय, सांबरी, म्हैस. त २०१ आ आंडिल बैल. द ५३४ उत्ति जोडीचा गडी, प्रतिस्पर्धी. –दोन जित्रापे लावून ओढले जाते ते अऊत.

अंक द ८ (अ) अङ्कै तळहात. –बोटांवर संख्या मोजण्याच्या आद्य प्रथेवरून.

